

# श्रीरंगलीलामृत

वे. श्रीकृष्ण दीक्षित सोमयाजी सेलुकर महाराज विरचित-

संपादन : श्री. दिवाकर दुनाखे

प्रकाशक–

सुहास वासुदेव देशपांडे
अध्यक्ष
श्रीनिजानंद रंगनाथस्वामी
आणि
संतकवी श्रीधरस्वामी स्मारक ट्रस्ट,
नाझरे, ( ता. सांगोला, जि. सोलापूर. )

• सर्वाधिकार प्रकाशकाचे स्वाधीन •

मुद्रक–

ब. आ. फडणीस
ज्योति प्रिंटींग प्रेस,
३७०, मेन रोड,
सोलापूर–४१३००७.

## ∴ प्रकाशकाचे प्राक्कथन ∴

रामदास पंचायनातील एक प्रमुख घटक व राजयोगी प. पू. श्रीरंगनाथ स्वामी ( नाझरेकर ) निगडीकर यांचे सत्‌शिष्य सोमयाजी वै. वा. ह. भ. प. श्रीकृष्ण दीक्षित, सेलूकर महाराज यानी गुरुवरील प्रेमाने व कृतज्ञता बुद्धीने लिहिलेले ओवीबद्ध चरित्र–श्रीरंगलीलामृत ग्रंथ– या नावानें शके १८८५ मध्ये प्रकाशित झाले होते. त्यावेळीं वै. वा. ह. भ. प. शंकरराव ढोकीकर यांनी सेलूकर महाराजांचे आज्ञेवरून या ग्रंथाचा विस्तार केल्याचा त्यात उल्लेख आहे. अनेकजणांनी हा ग्रंथ पुनर्मुद्रित करावा अशी मागणी केली. तसेच सेलूकर महाराजांचे अग्निहोत्र व यज्ञयागाचे कार्य पुढे चालविणारे त्यांचे सुपुत्र ह. भ. प. रंगनाथकृष्ण उर्फ बाबूरावजी कुलकर्णी सेलूकर यांच्या प्रेरणेमुळे व सक्रीय प्रोत्साहनामुळे हा ग्रंथ आज भाविक भक्तांपुढे अगदी नव्या स्वरुपांत व मुद्रण दोषरहित करुन ठेवण्याचे भाग्य या समितीस लाभत आहे. श्रीरंगनाथस्वामींचे शिष्य–भक्तगण व सेलूकर महाराजांचे अनुयायी आजही या ग्रंथाचें पठण मोठ्या श्रद्धेने व भक्तिभावाने करतात. त्यांना हा नव्या स्वरुपांतील ग्रंथ आवडेल असा विश्वास वाटतो.

श्रीरंगनाथस्वामींच्या या पद्यमय चरित्रांतील सर्व मजकूर जशाच्या तसा प्रथमावृत्तीवरुन घेतलेला असून त्यांत कोणताही फेरफार केलेला नाही. स्वामींच्या चैतन्यमय व दिव्य अशा या चरित्रात त्यांचा आदर्श, देवभक्ती, देशप्रेम, आध्यात्मिक प्रवृत्ती इत्यादिंचा प्रभाव जाणवतो. योगीपुरुष हे जाणून बुजून कोणते चमत्कार करीत नाहीत अथवा दाखवीत नसतात; तर ते प्रसंग–घटनेनुरुप त्यांच्या हातून आपोआपच घडतात, हें या चरित्रावरुन स्पष्ट होईल. ऐतिहासिक निकष व संदर्भ अशा चमत्कारांच्या बाबतीत लावता येत नसतात.

या ग्रंथाचे संपादन सोलापूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. दिवाकर दुनाखे यानी अत्यंत मेहनत घेऊन केले आहे. तसेच त्याचें मुद्रण अत्यंत त्वरेने, चोख व निर्दोष होईल याकडे त्यानी व या पुस्तकाचें प्रकाशक व आमचे स्नेही श्री. बाळासाहेब फडणीस यांनी लक्ष दिले म्हणूनच हा ग्रंथ आम्ही इतक्या अल्पवधीत प्रकाशित करु शकलो. ह्या ग्रंथ प्रकाशनासाठी अनेकांचे साहाय्य या समितीस झालेले आहे. त्या सर्वांचा नामनिर्देश करणे जरी शक्य नसले तरी प्रकाशनाची प्रेरणा देऊन त्याबाबत सतत पाठपुरावा करणारे सुप्रसिद्ध संतकथा–लेखक श्री. दा. का. थावरे, ग्रंथ छपाईसाठी लागणारा कागद स्वखर्चाने पुरविणारे धर्मज्ञ श्री. बाबूराव गायकवाड यांचे आम्ही ऋणी आहोत. नेत्राला आल्हाद देणारे, कलात्मक व आकर्षक असे बहुरंगी मुखपृष्ठ करुन दिल्याबद्दल सोलापुरांतील आर्टिस्ट श्री. जगन्नाथ चव्हाण यांचेही आम्ही आभारी आहोत. सुबक छपाई करणारे ज्योति प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. बाळासाहेब फडणीस व त्यांचें कर्मचारी यांचीही समिती आभारी आहे. याशिवाय इतरही अनेक साहाय्यकर्त्यांचे आम्ही आभारी आहेत.

या समितीचे पहिले प्रकाशन– "परमार्थ बोध" हे श्रीरंगनाथस्वामीविरचित, स्फुट काव्य रसिकांनी व भक्तांनी जसे आवडीनें वाचले व संग्रही ठेवले तसेच हे दुसरे प्रकाशनही खुद्द श्रीरंगनाथ स्वामींचे पद्यमय चरित्र असल्यामुळे त्यांना आवडेल व हा ग्रंथही ते आवडीनें वाचतील व संग्रहीही ठेवतील अशी आशा आहे.

–प्रकाशक

## सोमयाजी परमपूज्य श्रीकृष्ण ( उर्फ किसन महाराज ) दीक्षित सेलूकर यांची

# .... जीवनगाथा ....

भारतीय संस्कृतीची जपणूक कशामुळे झाली या प्रश्नाचे उत्तर देणे जरी सोपे नसले तरी थोडा विचार केला तर त्याचे थोडे उत्तर सांपडते. अनादि कालापासून ऋषी-मुनींनी वेदप्रणीत धर्म आचारांत आणण्याचा दिव्य संदेश दिला व तो प्रत्यक्ष अंमलात आणला. त्यांच्या ऋणांतच सर्व मानवजात आहे. कारण वेदोपदिष्ट जो सत्यसनातन धर्म हाच विश्वाचे कल्याण करणारा धर्म आहे. अशा दृढनिष्ठेतून त्यांचे आचार, विचार सर्वसामान्याना पुढे आदर्श म्हणून त्यानी ठेवले. वेदाने आखून दिलेला जीवनमार्ग अनुसरणे हें प्रत्येक मानवाचे कार्य आहे. वेद अपौरूषेय असून ते परमेश्वराचे निःश्वास आहेत. त्यामुळे त्यांच्याबद्दल कुठलाही किंतु न बाळगता जगाच्या कल्याणासाठी सांगितलेले यज्ञयागादि आचार मानवाने चालू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।' या उक्तीप्रमाणे ज्या ज्या वेळी सत्यसनातन धर्माचा लोप झाला, त्या दिव्य जीवनप्रणालीला मरगळ आली, त्या त्या वेळीं भगवंतानी गीतेत सांगितल्याप्रमाणे ही मरगळ दूर करुन सत्यसनातन धर्माचे पुनरुत्थान केले आहे. युगायुगातून अशा धर्म संरक्षकांचा जन्म झालेला आपण पाहतो. केरळांत जन्म घेऊन आसेतुहिमाचल भ्रमण करणारे श्रीमद् आद्य शंकराचार्य हे

सत्यसनातन धर्माचे रक्षण करणारे चालते–बोलते विद्यापीठ होते. या धर्मकार्यात ज्ञानेश्वर–तुकाराम–नामदेव या संतमंडळींचा वाटा फार महत्वाचा आहे. शिवाजी महाराजांचे धर्मसंरक्षणाचे कार्य कोण जाणत नाही ? त्यांच्या कालातच समर्थ पंचायतनाने केलेले कार्य आजही यथाशक्ति चालू आहे. या पंचायतनातील राजयोगी श्रीरंगनाथस्वामी निगडीकर यांचाही शिष्य परिवार फार मोठा होता. त्यांच्या प्रेरणेने व आशिर्वादाने अनेकानी सत्यसनातन धर्माची ही पताका उंच ठेवण्यासाठी त्याग, परिश्रम केले आहेत.

त्यापैकीं पूर्वींच्या मोगल राज्यांतील व आताच्या मराठवाडा भागांतील लातूर या शहराजवळ सेलू ( औसा ) या गावीं वेदमूर्ती एकनाथ पंढरीनाथ कुलकर्णी व त्यांच्या धर्मपत्नी भागिरथीबाई या शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन ब्राह्मण दाम्पत्याचे कुळी एका तेजस्वी बाळाचा जन्म चैत्र शुद्ध ९ (रामनवमी) शके १८०१ इ. स. १८७९ या पवित्र दिवशी दुपारी रामजन्मकाळावरच झाला. तेच पुढे श्रीकृष्ण ( किसन महाराज ) दीक्षित सेलूकर या नावाने ते प्रसिद्धी पावले. मोठ्या झालेल्या प्रत्येक व्यक्तीवर त्यांच्या मातापित्यांचे संस्कार झालेले दिसतात. किसनमहाराजांचे वडील वेदमूर्ती एकनाथ–यांना भाऊ म्हणत असत– हे वेदविद्यापारंगत होते. त्यानी काशीला दोन तप राहून वेदाध्ययन केले. त्यामुळे त्यांची वेदप्रणीत धर्मावर नितांत निष्ठा होती. त्यांनी अत्यंत श्रद्धेने स्वतःच्या घरांत वेदमंत्रघोष व यज्ञयागादि कर्मे सतत चालू ठेवली. त्याचा संस्कार बाल श्रीकृष्णावर झाला नाही तरच नवल ठरले असते. बालपणा–पासून वेदमातेच्या पवित्र संस्कारांत वाढलेल्या किसनमहाराजाना बाल्यावस्थेतच अपूर्व असा परंतु पूर्व संचितामुळेंच एक योग जुळून आला. तो म्हणजे श्रीरंगनाथस्वामी निगडीकरांच्या कुलांतील त्याकाळीचे



सद्‌गुरु केशवबुवा निगडीकर या न्याय व मिमांसाशास्त्रावर प्रभुत्व असलेल्या प्रासादिक वाणीच्या उपजत देणगीमुळे देहभाव विसरुन कीर्तनरंगी रंगणाऱ्या व आत्मस्वरुपांत तल्लीन झालेल्या या अधिकारी पुरुषाचा अनुग्रह किसनमहाराजाना लाभला. मुळांतच विरक्त अशा किसनमहाराजाना केशवबुवासारख्या विरागी गुरुचे अनेक वर्षे मार्गदर्शन लाभले. त्याच कालांत त्यानी दत्तोपासना केली. भागवत ग्रंथाचे सतत वाचन, मनन, चिंतन केले. वेदमूर्ती एकनाथपंतांच्या वृद्धापकाळामुळें अवघ्या १५ व्या वर्षी म्हणजे इ. स. १८९४ ( शके १८१६ ) च्या सुमारास त्यांच्यावर वतनदारीची व कुटुंबाची जबाबदारी पडली. त्या कोवळ्या वयातही त्यांनी ती जबाबदारी पांच–सहा वर्षे म्हणजे इ. स. १९०० पर्यंत कौशल्याने सांभाळली. अर्थात त्यांच्या आध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रमांत कांही बदल झाला नव्हता.

संसारात राहूनच व्यवहार आणि परमार्थाचे आचरण करणाऱ्या किसनमहाराजांचे जीवनाला वळण देणारा प्रसंग ते औसा येथील दत्त मंदिरांत दर्शनास गेल्यावेळी घडला. प्रत्यक्ष दत्ताचा साक्षात्कार होऊन भागवत ग्रंथाची अखंड सात पारायणे करण्याचा आदेश त्याना मिळाला. किसनमहाराजानी कुणालाही न कळवता भागवताची सात पारायणे करण्यासाठी संत गोरोबाकाकांच्या पवित्र वास्तव्याने पुनीत झालेल्या व तेरणा नदीच्या पावन परिसरांतील महादेवाच्या मंदिरात तीन–चार महिने ठाण मांडले. त्या शांत निवांत स्थानी महाराजांची सात पारायणे यथासांग पार पडली आणि त्याची फलश्रुती स्वतः शंकराने दृष्टांत देऊन गोदावरी नदींच्या परिसरांतील कर्मभूमी निवडून तेथे वेदधर्मप्रणीत यज्ञ संस्थेचा प्रचार-प्रसार करण्याचा आदेश दिला. इ. स. १९०० ते १९०३ च्या दरम्यान या सर्व घटना घडत असतांना महाराजांचा

विवाह त्यांच्या मातोश्रींचे इच्छेनुसार औसा येथील पाठक घराण्यांतील उपाध्ये नारायणदेव यांची सुशील व सुसंस्कार लाभलेली कन्या रुक्मिणीशी झाला. विवाहात जरी महाराज सामील होते तरी त्यांच्या अंतर्यामी खूप खळबळ माजली होती. त्याचे कारण म्हणजे पूर्वजन्मीच्या कर्माची जागृती त्यांच्या ठायी झाली होती. त्यांचे गुरुकुल निगडीकर. त्या कुलाचे आद्य संस्थापक राजयोगी श्रीरंगनाथस्वामी निगडीकरांनी किसनमहाराजांकडे कृपावलोकन करुन त्याना त्यांच्या पूर्वसंचिताची व अपूर्ण राहिलेल्या त्यांच्या कार्याची आठवण करुन दिली. अतिसंवेदनाशील बनलेल्या महाराजांच्या मनाने श्रीरंगनाथस्वामींचा आदेश शिरोधार्य मानला आणि त्यानी या पुढील आपल्या जीवनाची दिशा मनाशी निश्चित करुन टाकली.

प्रथम त्यानी राजकृपेने लाभलेल्या कुलकर्णीपणातून मुक्तता करुन घेतली. घरांत असलेली गर्भश्रीमंती व त्याचा उपभोग घेणाऱ्या गृहसौख्याच्या त्याग केला. सर्वसंग परित्याग करुन पूर्वजन्मीच्या पुण्याईवर व त्या जन्मांत यज्ञयागादि कर्मे करण्याची अपूर्ण राहिलेली इच्छा अपूर्ण ठेऊन तो जन्म सोडावा लागला होता, याची जाणीव श्रीरंगनाथस्वामी निगडीकरानी दृष्टांतातून देताच त्यानी स्वतः व त्यांच्या सुशील पत्नी यांनी घरदार सोडून तीर्थाटनाचा कार्यक्रम आखला व १९०२ ते १९०५ या कालांत त्यानी तो पूर्ण केला. त्याकाळी तीर्थाटन खूप अवघड होते. पण ते सुरळीतपणे पार करुन हे दाम्पत्य सामाजिक जीवनाचे अपूर्व दर्शन जवळून घेऊन, प्रत्यक्ष अनुभवून परत आपल्या गावी येऊन तेथे पहिला यज्ञ–महारुद्रस्वाहाकार यज्ञ–केला व आपल्या विहित कार्याचा शुभारंभ केला. नंतर त्यांनी श्रौत अग्निहोत्रवृत्तीने आजन्म राहण्याचा निश्चय केला. या दीक्षेनंतर त्याना सर्वजण 'दीक्षित' म्हणू लागले. वयाच्या २७ व्या



वर्षी म्हणजे १९०६ च्या सुमारास घेतलेल्या दीक्षित वृत्तीने राहून त्यानी पुढे दर्शपौर्णिमेस चातुर्मास याग, अग्निष्टोम, ज्योतिष्टोम, स्वर्गसम इत्यादी यागाची पूर्तता केली. त्यानंतर त्यांनी गोदावरीच्या तीरी प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या भाविक जनतेच्या उपस्थितीत 'सोमयाग' संपन्न केला. त्यावेळी या यज्ञात लाखो लोकांना अन्नदान व यज्ञप्रसाद मिळाला. सतरा दिवस चाललेल्या या यज्ञांत काशीकडील विद्वान याज्ञिकांनी भाग घेतला होता. त्या सर्व काळात किसनमहाराजाना आपल्या गुरुचे–श्रीरंगनाथस्वामी निगडीकरांचे–अस्तित्व जाणवत होते. त्यांच्या कृपा प्रसादाने सोमयागात कुठलेही न्यून राहिले नव्हते.

**न गुरोः परतरंशास्त्रं । न गुरोः परदैवतं ॥**
**न गुरोरधिकं लोके । तस्मात् गुरुमुपाश्रयेत् ॥**

या वचनाप्रमाणे किसनमहाराजानी श्रीरंगनाथस्वामींसारख्या अधिकारी गुरुची मानसपूजा करुन गुरुस्थानी बसविले. त्यांच्या प्रेरणेने–आशिर्वादाने त्यानी पुढे अनेक यज्ञयाग केले व भारतीय परंपरेचे व संस्कृतीचे त्यांतून त्यानी उत्थापन केले. यज्ञक्रियेतून उद्‌भूत होणाऱ्या दिव्य सामर्थ्याचा, त्यातून मिळणाऱ्या दैवी संपत्तीचा त्यानी समाजाला उपयोग करुन दिला. विश्वदेवाची यज्ञकर्माने पूजा बांधून त्यानी व्यापक देशहित, समाजहित, धर्महित साधण्याचा फार मोठा प्रयत्न केला. या धर्माचरणाने राहून त्यांनी दोन अपत्यांना जन्म दिला. त्यापैकी पहिले अपत्य म्हणजेच सध्या त्यांचेच कार्य चालविणारे व श्रीनिजरंगकृपेने जन्मले म्हणून ज्यांचे नांव रंगनाथ असे ठेवले आहे ते होत.

आपल्या आदर्शाप्रमाणे व विहित ध्येयानुसार किसनमहाराजानी आपल्या हजारो शिष्यांना यज्ञकर्माद्वारे सात्विक शिकवण दिली व त्यांच्यामार्फतही वेदमातेची अखंड सेवा केली. स्वत: गृहस्थाश्रम धर्म, श्रौत अग्निहोत्रासाठी वैराग्यशील आचरण, शुचित्व, संयम व क्षमावृत्तीचे पालन करुन दैवी गुण–संपत्तीचे महान् दर्शन समाजाला घडविले. त्यामुळे किसनमहाराजांचे व त्यांच्या पतिनिष्ठ, धर्मनिष्ठ पत्नीचे जीवन शिवमय, ब्रह्ममय झाले. या दाम्पत्याने जणू शिव व शक्तिचीच भूमिका या पृथ्वीवर वजावली.

निरनिराळ्या ठिकाणी त्यांचा शिष्यपरिवार पसरलेला आहे व त्यांचेच कार्य करीत आहे. सोलापूरला सोमयाजी श्रीकृष्ण दीक्षितांचें ( किसन महाराज ) अनेक वेळा येणे झालेलें आहे. येथेही त्यांचे अनेक शिष्य होते-आहेत. गणपती घाटावर श्रीसच्चिदानंद मठातील वेदमूर्ती कै. चंद्रशेखरशास्त्री शिरसीकर हे वेदविद्यापारंगत व यजुर्वेदावर निष्ठा ठेवून दर वर्षी यजुर्वेद पारायण, यज्ञयागादि करणारे एक सच्छील व्यक्तिमत्व होते. त्यावेळी किसनमहाराज सेलूकरांचे आगमन सोलापुरांत होई. त्यांच्या प्रेरणेने येथील गणपती घाटावर अनेक छोटे मोठे याग झाले आहेत. त्यानिमित्त महाराजांचा मुक्काम असे. त्यावेळी येथील सुप्रसिद्ध जोशी घराण्यातील वेदशास्त्रसंपन्न कै. पंढरीनाथ गोविंद जोशी व त्यांच्या सत्वशील धर्मपत्नी कै. रुक्मिणीबाई यांचेकडे ते येत असत. रुक्मिणीबाईच्या ठायी सात्विक प्रवृत्तीमुळे जगदंबादेवीचे ठाण होते. त्यांचे दर्शन घेऊन व देवीचा आशिर्वाद घेऊन येथील यज्ञयाग संपन्न झालेले



आहेत. अशाच तऱ्हेच्या महाराजांच्या शिष्या भागम्मा व चंद्रम्मा शिष्या होत्या. तेर–ढोकी येथील कै. शंकरराव पाटील ( 'महाभारत' ओवीबद्ध लिहिणारे व श्रीरंगलीलामृताचा विस्तार करण्यांत यांचा हातभार लागला आहे. ) जनार्दनपंत कुलकर्णी बाभुळगांवकर वगैरे शिष्यानी किसनमहारजांचे नांव उज्वल केलें आहे.


"श्रीरंगलीलामृत" हा पद्यमय ग्रंथ किसनमहाराजांनी सुमारे १९३४–३५ च्या सुमारास लिहिला व स्वत:च्या गुरुचे ऋण अल्पांशाने फेडण्याचा प्रयत्न केला आहे. यामधील घटना व प्रसंग त्यांना जशा भावल्या व त्यानी त्या ऐकल्या तशा लिहिल्या आहेत. त्यातील ऐतिहासिक व्यक्तिचा उल्लेख येणे अपरिहार्य आहे. कारण श्रीरंगनाथस्वामी निगडीकर हे समर्थ पंचायतनापैकीं एक प्रमुख घटक होते. परंतु त्या सर्व घटना ऐतिहासिक निकषावर तपासून पाहिल्या नाहीत. त्या ग्रंथात जशाच्या तशा घेतल्या आहेत. या ग्रंथाची भाषा ओघवती आहे व प्रसंग साक्षात् उभे करण्याची शक्ती शब्दांत आहे. किसन महाराजांवर श्रीरंगनाथस्वामींची पूर्ण कृपा असल्यामुळे व ते स्वत:ही प्रतिभावान असल्यामुळे या ग्रंथाची निर्मिती ते करु शकले. त्यामागे त्यांची सद्गुरुवरील भक्ती व निष्ठा ही तर आहेच; याशिवाय त्यांच्या कार्यावरील प्रेम व समाजधारणेस लागणारी मूल्ये त्यांनी कशी जोपासली हेही दाखविण्याचा हेतू आहे.

ह्या ग्रंथाची प्रत लिहून तयार करण्यासाठी नाझरे येथील देशपांडे कुटुंबियांची मदत झाली आहे. तसेच ह्या ग्रंथाचे संपादन करण्याची जबाबदारी माझ्यावर नाझरे येथील समितीनी सोपविली; ती मी यथाशक्ती पार पाडण्याचा प्रयत्न केला आहे. ही माझी सेवा श्रीरंगनाथस्वामी व श्रीकिसनमहाराज यांचे चरणी समर्पित केली आहे.।

दिवाकर दुनाखे
" दूर्वांकूर "
३०३, लक्ष्मी पेठ,
दमाणी नगर, सोलापूर.



श्री निजानंद रंगनाथ स्वामी महाराज निगडीकर



सोमयाजी परमपूज्य
श्रीकृष्ण तथा किसन महाराज दीक्षित
सेलूकर

## ॥ अध्याय १ ला ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

### ॥ श्री रंगलीलामृत ग्रंथ प्रारंभः ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री रुक्मिणीपांडुरंगायनमः ॥
॥ श्री कुलदेवतायैनमः ॥ श्री लक्ष्मीनारायण प्रसन्नोस्तु ॥

॥ ॐ नमोजी श्रीरंगा । विश्वव्यापकाभवभंगा । लीलावतारी नटभृंगा । जगदोद्धारा जगदीशा ॥ १ ॥ मायातीता परम पुरुषा । करुण सागरा विश्वेशा ।

गोवर्धन धारी पूर्ण परेशा । अगाध महिमा तुझा असे ॥ २ ॥ संत हृदय निवासा । कृपार्णवा राजहंसा । शेषशायी लक्ष्मी विलासा । निर्विकल्पा अगोचरा ॥ ३ ॥ सगुण रूपा निर्गुण रूपा । अविनाशा अरूपा । महावतारी चित् स्वरूपा । जगद्वंद्या जगन्मूर्ती ॥ ४ ॥ लीलावतार घेशी अनेक । काय वर्णावे तै कौतुक । ब्रह्माही शिणला देख । ठाव न कळे तयासी ॥ ५ ॥ गणेश रूपी अवतारलासी । सकल विघ्नाते निर्विघ्न करिसी । ऋद्धि सिद्धि ठेवूनि दासी । खेळ दाविसी मायेचा ॥ ६ ॥ मूषक वाहन प्रेमे दाऊनी । मोदक भक्षी आवडी करुनि । दूर्वांकुर शोभे मुगुटावरुनी । स्वच्छंदे वर्तसे ॥ ७ ॥ भक्तिप्रेमे तुझास्तव करिता । सकळ कामना सिद्ध होय तत्वता । सद्भावे वंदुनी तुज आता । इच्छित हेतू सिद्ध करी ॥ ८ ॥ शारदा रुपे प्रगटलासी । बुद्धिचा विकास करिसी । मायारूपे खेळ खेळसी । न कळे हरी पार तुझा ॥ ९ ॥ नमन सरस्वती वरदायिनी ॥ चौदा विद्या वाग्विलासिनी । ग्रंथारंभी तव चरणी । प्रार्थितसे दास हा ॥ १० ॥ भक्त दर्शनाची बहू आस । मच्छरुपें अवतरलास । दैत्यांचा केलासि नाश । नमन तुला सद्भावे ॥ ११ ॥ कच्छरुपें अवतरला श्रीहरी । पृथ्वी धरिली पृष्ठांवरी । बुडत होती सागरी । तूंचि तारिली अधोक्षजा ॥ १२ ॥ इंद्रासि होता शाप । लय पावले वैभव अमूप । त्याचे हरिले सर्वताप । अघटित लीला दाविली ॥ १३ ॥ देव आणि दैत्य मिळोन । समुद्राचे केले मंथन । वराह रूप धरून । दाढें पर्वत धरियेला ॥ १४ ॥ चौदा रत्नें काढिली सुंदर । शक्रादिक हर्षले फार । अमृत देखोनि धांवती असुर । युद्ध भयंकर करताती ॥ १५ ॥ मग त्वा केले लाघव । मोहिनी रूपें केली भाव । देव दानव तोषविले सर्व । नाटक दाविले सकाळिकां ॥ १६ ॥ भक्तामाजी शिरोमणी । प्रल्हाद नामे सद्गुण खाणी । संकटी तारिला धावोनि । नाम महिमा गाताची ॥ १७ ॥ हिरण्यकश्यपु पिता दुष्ट । पुत्रासि दिधले अमित कष्ट । नृसिंह रूपें त्याचे पिष्ट । करुनि रक्षिले भक्तासी ॥ १८ ॥ बळी राजा दानशूर । बडिवार वाढला अपार । दैत्य जाणूनि धुरंधर । वामन रूपे प्रगटला ॥ १९ ॥ त्रिपाद मागुनि भूमिदान । पाताळी ठेविला नेऊन । द्वारपाल रूपे भगवान । तिष्ठत राहिला प्रेमभरे ॥ २० ॥ क्षत्रिय झाले उन्मत्त । परस्परासी करिती आघात । देखोनि त्यांचे गर्वा हरित । परशराम रूपे

प्रगटला ॥ २१ ॥ जमदाग्नी ऋषिवर्य श्रेष्ठ । ब्रह्मकर्मी अति वरिष्ठ । परि एक दोष तो क्रोधाविष्ठ । आधीन होउनि राहिला ॥ २२ ॥ तयाचे उदरी जन्म घेतला । क्षत्रियांचा गर्व हरिला । स्वमातेचा वध केला । लीला दाविली जनाते ॥ २३ ॥ सुष्टाचे केले पालन । दुष्टाचे केले निर्दाळण । स्वधर्म स्थापिला जाण । लोक आचरिती आनंदे ॥ २४ ॥ रामावतारीचे कौतुक । पितृ आज्ञा पाळिली देख । असुर निर्दाळिले अनेक । सूर मुक्त करूनिया ॥२५॥ चतुर्दश वर्षे सेवीवन । मुनिजन केले पावन । पवित्र केले दंडकारण्य । एक पत्नी व्रत पाळिले ॥ २६ ॥ सीता शुद्धीचे कारण । रावणकुळ विध्वंसन । महान् भक्त हनुमान । चिरंजीव केला स्वप्रेमे ॥ २७ ॥ राज्यी स्थापिला बिभीषण । सन्मार्गी लाविले सकळजन । भरत शुद्ध-भाव पूर्ण । पावन केला निजानंदे ॥ २८ ॥ कृष्णावतारी खेळ अनेक । व्रजवासी करिती कौतुक । गोरस चोरी जगन्नायक । प्रेम लीला दाविली ॥ २९ ॥ गृहस्थाश्रमी पूर्ण । आचरून रक्षिले गोधन । दुष्टांचे केले हनन । भक्त पांडव रक्षिले ॥ ३० ॥ सख्यभक्ति अर्जुने केली ॥ गीता बोधे माया हरिली । स्वधर्माते प्रवर्तली ।

बुद्धि तत्काळ तयाची ॥ ३१ ॥ दश अवताराचे मुख्य गूज । कृष्ण अवतारी दाविले सहज । लीलावतारी अधोक्षज । भक्त संकटी तारिले ॥ ३२ ॥ बौद्धावतारी दाविली मात । उभा कटीवरी ठेवी हात । प्रेमे भक्ताची वाट पहात । तिष्ठत राहिला निशिदिनी ॥ ३३ ॥ आता नमूं कुलदेवता । मल्हारी म्हाळसा कांता । तुळजादेवी जगन्माता । श्री व्यंकटेशा पांडुरंगा ॥ ३४ ॥ नमन माझे श्री अवधूता । तिमिर हारका अवयव रहिता । प्रथमारंभी गुणवंता । श्री दत्तात्रया तुज नमो ॥ ३५ ॥ नमन माझे संत भक्त । सर्वदा जे जीवन मुक्त । त्यांचे दर्शनी त्वरित । महापापे उद्धरती ॥ ३६ ॥ महान् महान् भक्त शिरोमणी । वर्णिता शिणली वाणी । नाम घेता मुक्तची प्राणी । ऐसे महात्मे अगणित ॥ ३७ ॥ वसिष्ठ व्यास कपिलमुनि । शुक शौनकादिक ब्रह्मज्ञानी । याज्ञवल्क्य अग्रगणी । ब्रह्मवेत्ता अपूर्व ॥ ३८ ॥ दत्त अंगिरस गौतम । विश्वामित्र श्रेष्ठ परम । स्मरता तुटे जन्म मरण । तुझेच हे अवतार ॥ ३९ ॥ गतायुगी असंख्य भक्त । कलियुगी जालंदरनाथ । मच्छिंद्र गोरख मीननाथ । तुझेच अवतार श्रीहरी ॥ ४० ॥ गहिनीनाथ अडभंगनाथ ।

चौरंगीनाथ नागनाथ । जगप्रसिद्ध हे नवनाथ । भक्ति महात्म्य वाढविती ।। ४१ ।। ज्ञानेश्वर निवृत्तिनाथ । सोपान मुक्ता एकनाथ । नामदेव विसोबा समर्थ । नाम महिमा गाताती ।। ४२ ।। रामदास तुकाराम रंगनाथ । जयराम केशव स्वामी समर्थ । आनंदमूर्ती पुण्य पवित्र । नमन माझे साष्टांगे ।। ४३ ।। सद्भावे तुज शरण येता । हरिली मायीक व्यथा । मी तूं पण नाठवे तेथां । चित्स्वरूपा मिळविसी ।। ४४ ।। अनंत ब्रह्मांड नायका । चैतन्य मूर्ती अव्यक्ता । त्रिगुणावतारी व्यक्ता । परात्परा अससी तूं ।। ४५ ।। स्थावर जंगम व्यापका । अंत न कळे ब्रह्मादिका । सृष्टी स्थिती संहारका । अगुण रूपा अगोचरा ।। ४६ ।। वर्णिता शेष भागला । गुण गाता ब्रह्मा थकला । वेदही नेती नेती वदला । स्तब्ध राहिलो सकळही ।। ४७ ।। लक्ष्मी तव पायाची दासी । नारद तुंबर मिनले रूपासी । संत सनकादिक प्रेमासी । गाऊनी झाले स्वरुपी लीन ।। ४८ ।। ऐसे तुझे पवाडे । ब्रह्मादिक जाहले वेडे । मीच मशक बापुडे । काय गाऊं थोरवीते ।। ४९ ।। तूंची कर्ता तूंची अकर्ता । तूची वदता तूंची वदवितां । तूंची प्रेरता तूंची लिखिता । पंढरीनाथा पांडुरंगा ।। ५० ।।

लीला करिशी अनेक । अवडंबर दाविले मायिक । भुलवुनी पाडिले सकळिक । भ्रमुनी गेले संसारी ।। ५१ ।। असार संसार नेणती कोण । माया मोहे गांजिले जन । स्वार्थ लोलुपी गेले गोवून । विसरले आत्महित ।। ५२ ।। मुक्त करीगा पांडुरंगा । तोडुनि काढी भवभंगा । कैवारी तूंची श्रीरंगा । ब्रीद राखी सत्वरी ।। ५३ ।। अजाणपणे घडले अन्याय । कृपा करी पंढरीराय । भीमातीर निवासी धावे माय । रक्षी बालका झडकरी ।। ५४ ।। नमो श्री सद्गुरुमाय । हृदयी धरुनि तुझे पाय । भवसिंधू तरणोपाय । तुझ्या कृपे सहजचि ।। ५५ ।। तुजवीण मी प्रार्थू कोणा । दासाची का नये करुणा । सद्गुरु मूर्ती यादव राणा । तारी तारी दीनदासा ।। ५६ ।। सद्गुरू कृपेची साऊली । सग्दुरू बोधाची माऊली । सग्दुरू पतितांचा वाली । पावन करी जगदीशा ।। ५७ ।। भव कर्दमी रुतलो जाण । ओढुनी काढी धाऊन । विषय षड्रिपु जाण । टोचिताती सर्व काळ ।। ५८ ।। सग्दुरु उपदेशामृत । चाखिता प्राणी होय मुक्त । मस्तकी ठेवी अभय हस्त । दीनदासा उद्धरी ।। ५९ ।। तूं तव कनवाळू दीनांचा । थोर उदार मनाचा । अव्हेर करूं नको बालकाचा । हीच प्रार्थना वारंवार ।। ६० ।।

सद्भावे बोबडे बोल । बालका वदवी लडिवाळ । नाना रंगी खेळे खेळ । अगा सद्गुरुराया ।। ६१ ।। मंद बुद्धी अति अज्ञान । तुझ्या कृपेचे महिमान । वाचेसि स्फूर्ती देऊन । लीला कौतुक दाविसी ।। ६२ ।। माय माझी सद्गुरु खाणी । हृदयी प्रगटली येवोनी । तोडिली भवभय जाचणी । कृपावलोकने करूनिया ।। ६३ ।। गुरुराया तुजसारिखा । कोण उपकारी जगी देखा । तोडुनी भवबंध निका । दाविसी निजस्वरुपा ।। ६४ ।। जन्म जन्मांतरी जनी । माय बापे असती दोन्ही । परि सद्गुरु न भेटे आणि । नरदेहावाचोनी ।। ६५ ।। नरदेहाचा महिमा । भागवती कथिला प्रेमा । शुक मुखे गरिमा । परीक्षितीसी सांगतसे ।। ६६ ।।

### – श्लोक –

दुर्लभो मानुषो देहो देहिनां क्षण भंगुरः ।
तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुंठं प्रिय दर्शनं ।।

टीका :– दुर्लभ नरदेह जाणा । परि क्षणैक जाण मना । वैकुंठ प्रिय गुरुराणा । चरण त्याचे सेवावे ।। ६७ ।। ज्या गोत्री जन्मलो स्पष्ट । ऋषी गार्ग्य तो श्रेष्ठ । माता पिता पूर्वज समस्त । ग्रंथारंभी नमिली ।। ६८ ।। गुरु परंपरा मूळपीठ । वर्णन करवी ग्रंथ । रंगलीलामृत अद्भुत । चरित्र ऐका सादर ।। ६९ ।। सदानंद रंगमूर्ती । ग्रंथ करणे आज्ञापिती । वाचेसी देउनि स्फूर्ती । लेखन करिती स्वहस्ते ।। ७० ।। स्वस्ति श्रीरंग लीलामृत ग्रंथ । मंगलाचरण ईशस्तवन प्रेमभरित । सहजरंग कृष्णदास कृत । प्रथमोध्याय गोड हा ।। ७१ ।।

श्री निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु । श्री सद्गुरु नाथार्पणमस्तु ।।

।। इति श्रीरंगलीलामृतग्रंथ प्रथमोध्यायः समाप्तः ।।

# ॥ अध्याय २ रा ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥



॥ ॐ नमोजी श्रीरंगा । नट नाटक विश्वभंगा । करुणा सागरा चिद्‌गंगा । नमन तुला साष्टांगे ॥ १ ॥ तूंचि निर्गुण निराकार । जगदाकार पूर्णवतार । विश्वरूपा परात्परा । वंदन तुला सद्‌भावे ॥ २ ॥ श्री गुरुराया दीन दयाळा । मायातीता पूर्ण कृपाळा । न वर्णवे तुझी अगम्य लीला । ब्रह्मादिका अतर्क्य जे ॥ ३ ॥ तूंचि स्नेहाळू तूंचि कृपाळू । पतित पावना तूंचि दयाळू ।



विश्वनाटका अति कनवाळू । न वर्णवे पार तुझा ॥ ४ ॥ निजानंद रंगराजा । भक्त कैवारिया महाराजा । लीलावतारी अधोक्षजा । द्यावी मती गायना ॥५॥ तूंचि तारक तूंचि प्रेरक । मायारूपी नटसि अनेक । सकळ कलिमल दोषांतक । महाराजा गुणवर्या ॥ ६ ॥ काय वर्णू तुझी थोरवी । जगच्चालका माया लाघवी । दासासी मति द्यावी बरवी । लीलागुण वर्णावया ॥ ७ ॥ मी तव मंदमती अज्ञान । मम हृदयी देऊनी स्फुरण ॥ वाचेने वदवी लीलागुण । कौतुक करिसी स्वानंदे ॥ ८ ॥ काय वर्णावे तुझे पवाडे ॥ जे कां भरले वाडे कोडे । मी एक मशक बापुडे । अजाणते बालक ॥ ९ ॥ परि मजसी जैसे आज्ञापिले । पाहिजे कार्य हे जाहले । कृपा दृष्टिने वदविले । तेचि परिसा सज्जनी ॥ १० ॥ कलियुगासी प्रारंभ झाला । अधर्मीचा सुकाळ जाहला । अनीती मार्ग अवलंबिला । सकळ जनी ॥ ११ ॥ माता पिता गुरु यांचा । द्वेष करिती साचा । अपमान करिती वचनाचा । किंतु न वाटे कोणासी ॥ १२ ॥ गोमातेचा छळ करिती । स्वधर्माते नागविती । द्विजांची हेळसांड करिती । सद्‌भावना नसे कोणासी ॥ १३ ॥ यज्ञ यागादिक कर्मे जाणा । श्रद्धा नसे

त्यावर कोणा । कुकर्मे वर्तती नाना । अधर्म ऐसा वर्तला ॥ १४ ॥ स्नान संध्या न करी कोणी । ब्राह्मण गेले माजुनी । स्त्रीच्या प्रेमाहुनी । प्रेम नसे इतरत्र ॥ १५ ॥ परस्परासी कटु शब्द वर्तती । मर्मभेदी भाषण करिती । सज्जनांचा उपहास करिती । निंदा करिती अवघ्यांची ॥ १६ ॥ अवहेलना वडिलांची करिती । देवादिकांचा उपहास करिती । नाना तऱ्हेचे विकल्प योजिती । समाजस्वास्थ नासे की ॥ १७ ॥ तर्क वितर्क शास्त्राचा करिती । ऋषी मुनीची कुचेष्टा करिती । वेदपुराणे थोतांड म्हणती । गर्वोन्मादे करूनिया ॥ १८ ॥ कनक आणि कांता यांचा । अभिलाष धरिती साचा । आपपर न ओळखिती सर्वांची । हीन दशा जाहली ॥ १९ ॥ ऐशी जाहली अवनती । पाप वाढले बहुति । जाणोनिया ऐशी स्थिती । विचार करिती सुरवर ॥ २० ॥ शक्रादिक सर्व मिळोन । एके स्थानी जमले जाण । देखोनि अधर्म पूर्ण । मनी विचार करिताती ॥ २१ ॥ सन्मार्गा लागावे सकळजन । हरिभजनी रंगवावे पूर्ण । उपाय योजावा कवण । चिंता ग्रस्त जाहले ॥ २२ ॥ तव अमरेंद्रे योजिली युक्ति । आराधिला उमापती ।

म्हणे स्वामिया प्रती । उपाय सांगा झडकरी ॥ २३ ॥ त्रिनेत्र म्हणे त्यांसी । आळवावे लक्ष्मीपतीसी । त्याचे आज्ञे सहजेसि । कार्य साधेल जाण पा ॥ २४ ॥ सर्व देव मिळोन । इंद्रादिक उमारमण । वैकुंठा गेले जाण । महाविष्णुसी भेटती ॥ २५ ॥ क्षेम आलिंगन सर्वांसी । देऊनी स्थानापन्नासी । देखोनिया सुसमयासी । कारण काय पुसतसे ॥ २६ ॥ इये कळविली वार्ता । उपाय सांगा जी स्वामी आता । जेणे होय कार्य सफलता । हेचि विनंती स्वामीसी ॥ २७ ॥ लक्ष्मीरमण बोले त्याना । सामर्थ्यवान योगीराणा । स्तवुनि अत्रिनंदना । कार्य प्रसंगी योजावा ॥ २८ ॥ यावरी सर्व सुरवर मिळोनि । पातले अनुसूयात्मज भुवनी । सप्रेमे नमन करुनी । स्तवन करिती सद्भावे ॥ २९ ॥ जयजयाजी महाराजा । गुरुवर्या ब्रह्मराजा । पुरवी आमुचिया काजा । हीच विनंती स्वामीसी ॥ ३० ॥ स्वामीनो कृपाळू होऊन । अज्ञान श्रम निरसुन । सन्मार्गी लावी सकळ जन । गुरुराया त्रैमूर्ती ॥ ३१ ॥ आपणाविन श्रेष्ठ नसे कोणी । अधर्म वाढला मृत्यु भुवनी । धर्म स्थापना करी जाऊनी । हीच प्रार्थना सदयासी ॥ ३२ ॥ ऐकुनिया मंजुळ वाणी ।

बोलता झाला दत्तात्रयमुनि । वसिष्ठासह जाऊनी । कार्य साधितो आपुले ॥ ३३ ॥ श्रीकाशी क्षेत्रात जाण । सदानंद नामे ब्राह्मण । अवतार मी घेतो जाण । शिष्य रामानंद वसिष्ठ ॥ ३४ ॥ काषाय वस्त्र परिधान । संन्यास दीक्षा घेऊन । आनंद सांप्रदाय चालवून । स्वधर्म रक्षु जाणपां ॥ ३५ ॥ या परि करुनिया शांतवन । मार्गस्थ केले शक्रादिक जाण । काशी क्षेत्री येऊन । सदानंद नामे प्रगटले ॥ ३६ ॥ हीच कथा अनुपम्य । या ग्रंथी वदविली जाण । श्रोते होऊनि सावधान । एकाग्र चित्ते परिसावे ॥ ३७ ॥ आनंद सांप्रदायाचा । इतिहास पूर्वीचा । वर्णिला यथामति वाचा । जैसा वदवी श्रीगुरुराया ॥३८॥ महाक्षेत्र वाराणसी भुवन । जी कां श्रेष्ठ कैलासाहुन । पुण्य पवित्र पाप नाशिनी । सर्वांमध्ये श्रेष्ठ जी ॥ ३९ ॥ जिच्या दर्शने प्राणी सनाथ होती । महा आधी व्याधी दूर पळती । जिच्या स्नानें पातके भस्म होती । काय वर्णू महिमा तो ॥ ४० ॥ नवखंडाहुनि अधिक । जेथे वसे कैलास नायक । सकल तीर्थांमाजी मुख्य । ऐसे महात्म तियेचे ॥ ४१ ॥ सप्रेम वाराणसीची करिता वारी । तुटली त्याची जन्ममरण फेरी । मुक्तचि जाणा तो निर्धारी । मोक्षाचा

अधिकारी होय तो ॥ ४२ ॥ त्या काशीक्षेत्रामाजी जाण । सदानंद नामे पंचगौड ब्राह्मण । श्रीशंकराचे अनुष्ठान । सद्‌भावे जाण करितसे ॥ ४३ ॥ मनी हेतू हाचि धरिला । उमानाथे द्यावे दर्शनाला । पावन करुनिया दासाला । अनुग्रह कृपा करावी ॥ ४४ ॥ या इच्छे करुनिया जाण । तप करी तो ब्राह्मण जाणुनि त्याचा निश्चय पूर्ण । प्रगट जाहला तेधवा ॥ ४५ ॥ सदानंदासी बोले गिरिजारमण । तव तपश्चर्यें झालो प्रसन्न । इच्छित मागे वरदान । मन कामना पूर्ण करी ॥ ४६ ॥ पाहुनि पिनाकपाणीसी । आनंद जाहला द्विजासी । साष्टांगे करुनि नमनासी । कथिता झाला निज हेतू ॥ ४७ ॥ महाराज करुणासागर । कृपार्णवा राजहंसा उदार । कृपा करुनि बालकावर । तव अनुग्रह मज दीजे ॥ ४८ ॥ याच इच्छे करुनी जाण । मांडिले आहे अनुष्ठान । हेचि देई वरदान । आणिक नलगे मज कांहीं ॥ ४९ ॥ ऐकूनी सदानंदाचे वचन । बोलता जाहला पंचवदन । दक्षिण दिशे जाई जाण । मनकामना पूर्ण होय ॥ ५० ॥ शत पावले मार्ग क्रमण करी । गुरुदेव दत्त नाम उच्चारी । ध्वनी उमटता माझारी । हेतु सकळ पुरतील ॥ ५१ ॥ तेथे तूं करी वास्तव्य ।

प्रत्यक्ष भेटेल दत्तराय । मन कामना पुरतील सर्व । अनुग्रह तुज मिळेल ॥५२॥ यापरि कथूनि अज्ञापन । अंतर्धान पावला उमारमण । सदानंदे ही खूण जाणून । दक्षिण दिशे गमन करी ॥ ५३ ॥ शत पावले मार्ग क्रमण करी । गुरुदेवदत्त नामे गर्जना करी । उत्तर न येताचि सत्वरी । पुढे मार्ग चालतसे ॥ ५४ ॥ या परि क्रमिता काही दिन । पातला दंडकारण्य । कल्याण नामे भुवन । योगीराज पातला ॥ ५५ ॥ शत पावले ओलांडिली । गुरुदत्त म्हणोनी गर्जना केली । तो अकस्मात ध्वनी उमटली । ऐकुनी मनी संतोषे ॥ ५६ ॥ मनासि वाटले समाधान । फळले आजी तपःसाधन । दृढ घालुनि आसन । गुहा करुनि बैसले ॥ ५७ ॥ ऐसा क्रमिला काळ कांही । दत्त प्रगटले ते समयीं । ध्यानस्थ होता पाही । शेष रुपे अवतरले ॥ ५८ ॥ सदानंद करी प्रार्थना । मनोरथ पूर्ण व्हावे नारायणा । सगुण रुप मन कामना । सन्निध आता प्रगटावे ॥ ५९ ॥ अनंत रुपे नटसी जाण । स्थावर जंगमातीत पूर्ण । तूचि भक्ता मनमोहन । भक्त हृदयी निवासा ॥ ६० ॥ भक्तकाम कल्पद्रुमा । शंख चक्र गदा पद्मा । सहा हात त्रिशिरे परमा । सगुण रुपा दावावी ॥ ६१ ॥ याच रुपे



देई दर्शन । श्रीशंकरे वर दिधला जाण । इच्छित हेतु साधेल म्हणून । तव ध्यानी बैसलो असे ॥ ६२ ॥ जाणुनि भक्तिभाव पूर्ण । अत्रीनंदनरुपे प्रगटून । सदानंदासी नारायणे । दर्शन दिले तात्काळ ॥ ६३ ॥ देखोनि त्रिदेवात्मक । नमन करी भावपूर्वक । उद्धरि दासा अलौकिक । तवकृपा मज व्हावी ॥ ६४ ॥ संतोष मनी होऊन । अनुग्रही सदानंदा लागुन । कृपेने द्रवले अंतःकरण । वरदवाणी वदतसे ॥६५॥ मी तुज उपदेशीले । ते व्रत पाहिजे चालिले । परंपरा चालवी वहिले । आनंद सांप्रदाय या नामे ॥ ६६ ॥ काषाय वस्त्र सदानंदासी । श्रीगुरु देती निज करेसी । संन्यास आनंद सांप्रदायासी । चालेल म्हणूनी वर देती ॥ ६७ ॥ सदानंद घाली लोटांगण । कृतार्थ झालो आजि पूर्ण । सनाथ केले दासालागुन । जन्ममरण चुकविले ॥ ६८ ॥ पुनरपि करी नमन । तुटला बोल सुटले मौन । सद्गदित झाले अंतःकरण । नेत्री बाष्प वाहताती ॥६९॥ भाग्य आले उदयासी । पावन केले बालकासी । अनाथ नाथा दीन राशी । उद्धार केला स्वामीया ॥ ७० ॥ धन्य माझे जीवित । धन्य माझे मायबाप होत । शंकरे कृपा केली

सत्य । परब्रह्म ठेवा दाविला ॥ ७१ ॥ अदृश्य झाले श्रीगुरुदत्त । सदानंद मूर्ती ध्यानस्थ । आपपर नाठवे तेथ । देहभाव विसरला ॥ ७२ ॥ येणे परि तीन सप्तकेपर्यंत । ध्यानस्थ राहिला सदानंद भक्त । अवचित होऊनी सावध चित्त । पुन्हा ध्यानस्थ होतसे ॥ ७३ ॥ तया कल्याण स्थाना माझारी । गुहा करुनि अवसरी । एकांत स्थळा माझारी । राहिला सदानंद योगी राणा ॥ ७४ ॥ पुढे वर्तले अपूर्व । श्रोती परिसावे सर्व । पुढील अध्यायीचे लाघव । रसाळ निरूपण श्रवण कीजे ॥ ७५ ॥ जगद्‌मूर्ती रंगनाथ । स्वये करविता झाला ग्रंथ । मज ठेवुनी निमित्तमात्र । कथालेखन लिखीतसे ॥ ७६ ॥ सहज पूर्ण निज रंगनाथ । कृपेची साऊली बापमाय । मज दीनासी तारक होय । नमन तया साष्टांगे ॥ ७७ ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । सदानंद चरित्र महापवित्र । सहज रंग कृष्णदासकृत । द्वितियोध्याय गोड हा ॥ ७८ ॥

॥ श्री सद्‌गुरु नाथार्पण मस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ द्वितीयोध्यायः समाप्तः ॥

## ॥ अध्याय ३ रा ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सद्‌गुरुरंगातीतायनमः ॥

॥ जय जय सद्‌गुरु निजमाऊली । करी कृपेची साऊली । कामक्रोध भये निमाली । तव नामे गर्जता ॥ १ ॥ तव नाम करी पावन । पुनरावृत्ती नसे जाण । कोटी योगाचे घडे पुण्य । ऐसे पुरावे बोलती ॥ २ ॥ सद्‌गुरु भेटी झाल्यावरी । अपरोक्ष ज्ञाना नसे ऊरी । स्वस्वरूपा ऐक्य करी । दिव्य दृष्टी देऊनी ॥ ३ ॥ ऐसा तूं कृपाळू गुरुराया । आतां तरसी जड उद्धाराया । अनन्य

भावे तुझ्या पाया । गुरुराया नमन माझे ॥ ४ ॥ मी मूढ पायी खळे । मज कैचे ज्ञान असले । तव नाम कृपा बळे । बोलेन प्रेमा ग्रंथार्थी ॥ ५ ॥ गताध्यायी कथन । सदानंदे चरित्र जाण । पुण्य कथा करी दहन । कलिमल दूषणाचे ॥ ६ ॥ सदानंद यती कल्याणी । राहे दत्तानुग्रहे करुनि । संन्यास मार्ग येथूनी । आनंदे सांप्रदाय चालिला ॥ ७ ॥ निबिड स्थळ अति गहन । तेथे गुहा केली निर्माण । सभोवती वृक्ष दाटी जाण । एकांत स्थळ निर्मिले ॥८॥ अखंड लावी योगसमाधी । ब्रह्मानंदी निजात्मबोधी । कोणासीच नसे उपाधी । निजात्मरंगी तल्लीन ॥ ९ ॥ तया ग्रामाचे नगरवासीजन । कोणाचा संपर्क नसे जाण । सर्वही असती अजाण । ठाऊक नसे कोणासी ॥ १० ॥ येणे परि सदानंद योगीराज । अव्याहत चालवी क्रम काज ॥ रात्रंदिन समाधी सहज । नियम प्रेमे चालवी ॥ ११ ॥ इकडे वर्तली नवल कथा । सावध परिसिजे श्रोता । आनंद सांप्रदाय तत्वता । पुढे कैचा चालला ॥ १२ ॥ तया काशी नगरात । रामानंद नामे ब्राह्मण राहत । उद्विग्न होऊनीया चित्तात । ध्यान करी शंकराचे ॥ १३ ॥ तेणे तपश्चर्या आरंभिली कडकडित । प्रसन्न व्हावा



त्रिनेत्र । याच कारणे निश्चित । अखंडित आराधिला ॥ १४ ॥ देखोनि त्याचा सद्भावो । प्रसन्न झाला महाबाहो । इच्छित मागे वर हो । रामानंदा द्विजवर्या ॥ १५ ॥ सावध होऊनी पाहात । आनंदभावे प्रणिपात । लोटांगणे आनंदित । प्रेमभावे पूजीला ॥ १६ ॥ स्तुती करी कर जोडुन । जयजयाजी पंचवदन । विरुपाक्षा त्रिशूल धारणा । गंगाधरा सदाशिवा ॥ १७ ॥ हीन दीन मंद मती । उद्धार करी उमापती । ऐसी ऐकुनि विनंती । पंचवदन बोलतसे ॥ १८ ॥ रामानंदा झडकरी । सदानंदाचा शोध करी । दक्षिणे कल्याण नगरी । तेथे तुवा रहावे ॥ १९ ॥ शरण जाई सदानंदा । तुज नेईल मोक्ष पदा । दीक्षा घेऊनी आनंदा । गुरु सांप्रदाय चालवी ॥ २० ॥ आज्ञा वंदूनी शिरी । निघाले मुनि सत्वरी । मार्ग क्रमीत कल्याणनगरी । गुहे समीप पातले ॥ २१ ॥ देखोनि स्वामी सदानंद । मनी जाहला ब्रह्मानंद । भाग्योदय अगाध । पूर्व ठेवा सापडला ॥ २२ ॥ जोडुनी दोन्ही कर । प्रणिपात करी वारंवार । कृपा बळे सत्वर । रक्षी आता सत्वरी ॥ २३ ॥ श्रीशंकरे आज्ञापिले । होतील हेतू पूर्ण कथिले । कृपा दृष्टी अवलोकिले । पाहिजे स्वामी दासासी

॥ २४ ॥ मनी इच्छा अनावर झाली । चित्तासी तळमळ लागली । कृपाळुबा सद्गुरु माऊली । वरदहस्त ठेवी माथा ॥ २५ ॥ अज्ञान पंकी बुडुनि गेलो । स्वहिताते नागवलो । कर्माकर्मी जखडलो । सोडवी दासा दयाळुबा ॥ २६ ॥ म्हणूनी घाली लोटांगण । मस्तकी दृढ धरिले चरण । बाप कृपाळू सदानंद पूर्ण । प्रेमालिंगन दिधले ॥२७॥ परम स्नेहे तया वेळे । उपदेशिती गुरु कृपाळे । अज्ञानभ्रम मावळे । रामानंद समाधिस्थ ॥ २८ ॥ अद्वैत झाले पूर्ण । हारपले मी–तूं–पण । ब्रह्मानंदी लय लावुन । झाला तन्मय तत्काळ ॥ २९ ॥ ऐसे क्रमिती काल अगाध ॥ स्वस्वरुपी अखंड स्तब्ध । आत्मानात्म विचार प्रबोध । गुरुशिष्य ऐक्यरुपी ॥ ३० ॥ तयागावी लिंगधारी । सद्भाविक राजा राज्य करी । पतिव्रता स्त्री निर्धारी । तया झाला एक पुत्र ॥ ३१ ॥ शुक्लेंदुसमान वाढला । अति सौख्य माय बापाला । शोडष वर्षे तयाला । विवाह झाला तयाचा ॥ ३२ ॥ पुत्र पौत्रा समवेत । आनंदे राजा राज्य कार्यक्रमत । तो आला विपरीत । तया राजयाला ॥ ३३ ॥ कांही काळ तयासी । लोटता एके समयासी । नवज्वरे पतनासी । पावता झाला पुत्र तो ॥ ३४ ॥ सकळ लोक



हळहळ । करिती तेव्हा कोल्हाळ । जाहला दुःख कल्लोळ । माय बापासी ॥३५॥ माता पिता आक्रंदती । दुःखावेगे मूर्च्छित होती । सकल जन समजाविती । हाहाःकार जाहला ॥ ३६ ॥ सकल नगरवासी जन । शोक मग्न झाले दीन । आठविती पुत्राचे गुण । धाय सर्व मोकलती ॥ ३७ ॥ असो जातिधर्मा प्रमाणे । विमान करिती प्रेता करणे । घेऊन जात नगरा अन् । तया प्रेतासी ॥ ३८ ॥ दक्षिण दिशेसी झाडी । अपार असे कडोविकडी । जन पातले लवड सवडी । तया स्मशानी घेऊनि ॥ ३९ ॥ स्मशानी प्रेतासि ठेविले । दुःखानळे व्यापुन गेले । विसर्जन कार्य करूं लागले । लगबगीने सर्वही ॥ ४० ॥ स्मशाना सन्निध झाडी अमूप । तेथे गुहा केली होती साटोप । यतीवर्य उभयता करिती तप । कोल्हाळ त्यानी ऐकिला ॥ ४१ ॥ तेथे सद्गुरु सदानंद । राहती योगी आनंद । रामानंद शिष्य अगाध । महाज्ञानी जाणपा ॥ ४२ ॥ तया दोघांचे ध्यान । तीन सप्तके परिपूर्ण । नंतर विसर्जन । समाधी करिती ॥ ४३ ॥ तव कानी शब्द पडिला । एकाएकी हाहाःकार जाहला । रूदन करिती वृद्धा बाला दुःखाग्नीत सकळ ॥ ४४ ॥ सदानंद रामानंदासी । आज्ञाकरिती निश्चयेसी ।

पाहून येई त्वरेसी । शोकाकुल हे जन ॥ ४५ ॥ रामानंद शीघ्र उठून । येऊनी पाहती सकलजन । ध्यानी समजले वर्तमान । तया राजपुत्राचे ॥ ४६ ॥ उभे राहून स्मशानी । सद्‌गुरु चिंतन करुनी । विभूतीसी चर्चा करे करुनी । तया प्रेतासी ॥ ४७ ॥ अघटित वर्तले नवल परी । परब्रह्म मूर्ती महाधिकारी । विभुती नव्हे संजीवनी परी । अगाध करणी तिने केली ॥ ४८ ॥ प्राण आला शवासी । मुनी गेले आश्रमासी । त्यांचे मागे वेगेसी । शव तेही पावले ॥ ४९ ॥ महायोगी सदानंद । स्वस्वरुपी स्वानंद । ब्रह्मात्मैक्यपूर्ण बोध । मनोमयी पाहती ॥ ५० ॥ समाधिस्थ सदानंद । पाहुनिया रामानंद । प्रेत मस्तकी वरद हस्त । ठेविला तेक्षणी ॥ ५१ ॥ तोही झाला समाधिस्थ । रामानंदही अत्यद्‌भुत । निमग्न योगानंदात । त्रिसप्त दिन तेधवा ॥ ५२ ॥ इकडे राजा काय करी । समस्तासी आज्ञा करी । होणार न चुके कदाकाळी । प्रेत स्मशानी घालावे ॥ ५३ ॥ राजा पाहे प्रेताकडे विलोकोन । तव ते तेथे न दिसे जाण । मनी झाला उद्विग्न । चिंता बहु करितसे ॥ ५४ ॥ तव बोलती जन । प्रेत गेले उठोन । काषाय वस्त्रे परिधान । जटा शोभे शरीरी ॥ ५५ ॥ येऊनिया तयाने ।



उठविले प्रेताकारणे । पश्चिम मार्गे क्रमून । दोघेही गेले ॥ ५६ ॥ ऐकुनी ऐसी मात । आनंद झाला चित्तात । योगायोग अपूर्व होत । प्रभूची करणी अगाधचि ॥ ५७ ॥ आजपर्यंत नाही जाहले । किंवा नयनी नाही देखिले । विचित्र योगे नवल वर्तले । काय झाले समजेना ॥ ५८ ॥ जना परिसुनि ऐसी वाणी । राजा संतोषला मनी । झाडी अति गहन पाहोनि । तोडा म्हणे आताची ॥ ५९ ॥ कोण ऐसे समर्थ असती । प्रेतासी पुनर्जन्म देती । अवश्य दर्शन घ्यावे निगुती । इच्छा बहू वाढली ॥ ६० ॥ ईशरुपे अवतरले । कीं भाग्य आमुचे उदया आले । पूर्वपुण्य आजी फळले । अपूर्व केली नवलाई ॥ ६१ ॥ दूतासि सांगे अज्ञापन । झाडी तोडी अवश्य करून । पुत्र दात्याचे घेऊं दर्शन । तरीच समाधान मनासी ॥ ६२ ॥ राजाज्ञा जाणून । झाडी तोडीली अति गहन । तीन सप्तके दिन । क्रमोनि विवरा पातले ॥ ६३ ॥ तव देखिला योगिराज । महाज्ञानी तेजःपुंज । रामानंद शिष्य अगाध । स्वपुत्रासी पाहिले ॥ ६४ ॥ अत्यानंदे लोटांगण । प्रेमभावेसि करिती जन । सन्मुख राजा उभा राहोन । वारंवार प्रार्थीतसे ॥ ६५ ॥ महापुरुषा तपोधना । पावन झालो तव दर्शना । कृपा केली मज

दीना । पुत्रदान दिधला ।। ६६ ।। दुष्काळिया जेवी मिष्टान्न । कीं कृपणासी जैसे धन । वांझेसी झाले पुत्ररत्न । तैसे केले स्वामीया ।। ६७ ।। की अंधासी नेत्र आले । चातका जैसे घन वर्षले । महारोग्यासी दिव्यांग दिले । तैसे केले स्वामीया ।। ६८ ।। एक पुत्र होता जाण । परी दैवे नेला हिरोन । तुम्ही कृपाळू माऊली जाण । पुत्रदान दिधले ।। ६९ ।। आपल्या उपकाराची उतराई । जन्मोजन्मी मज नच होई । काय वर्णू आपली नवलाई । म्हणुनि चरणी लोटला ।। ७० ।। देखोनि त्याचा सद्भावो । आनंद झाला यतिरावो । समाधान करुनी रावो । काय वदते झाले ।। ७१ ।। स्वामी म्हणे पुत्रासी । गृहा जाई त्वरेसी । संतोषवी माता पित्यासी । गृहस्थाश्रम सुखे करी ।। ७२ ।। ऐकोनिया गुरुवचन । सद्गतीत झाले अंतःकरण । म्हणे मायोपाधी निरसुन । तव पदी राहीन मी ।। ७३ ।। नको मज गृहसंसार । प्रार्थना करितसे वारंवार । तव भजनी राहे मन स्थीर । हेचि देई दयाळा ।। ७४ ।। प्रापंचिक राग अनावर । मोहिनी घाली वरचेवर । विषय षड्रिपु बेजार । करिती बहू गुरुवर्या ।।७५।। अनायासे अपूर्व लाभ झाला । पूर्व सुकृत उदयाला । मुनिवर्या या बालकाला ।

अव्हेरु नका विनवित ।। ७६ ।। संतोषुनी गुरु माऊली । कृपा दृष्टी अवलोकिली । मायिक व्यथा निरसीली । राजपुत्राची तात्काळ ।। ७७ ।। प्रसन्न होऊनि तव अवसरी । वरदहस्त ठेवीत शिरी । म्हणे प्रपंच सुखे करी । हरि भजनी मन असो दे ।। ७८ ।। न्याये करी प्रजा पालन । स्वधर्म संरक्षी प्रेमान । अतीत अभ्यागत पूजन । नेमेनिष्ठा चालवी ।। ७९ ।। सद्वर्तन ठेवी निरंतर । सत्याचार करी अंगिकार । हरिनामी जयजयकार । प्रेमानंदे नित्य करी ।। ८० ।। पित्राज्ञेचा अव्हेर न करी । मातेची आज्ञा बंदी शिरी । दुराचारी यांचे खंडन करी । स्वधर्म स्थापी स्वानंदे ।। ८१ ।। ऐकोनि गुरुमुखाची मात । आनंद झाला बालकांत । साष्टांग घालोनी दंडवत । प्रेमभावे निमाला ।। ८२ ।। नमस्कार प्रदिक्षणा करुन । भावे घाली लोटांगण । वारंवार प्रेमाने । गुरुमाऊली अवलोकी ।। ८३ ।। आज्ञा वंदुनि शिरी । नमिला रामानंद सत्वरी । जाऊनि पित्याचे चरण धरी । चला म्हणे ग्रामात ।। ८४ ।। सर्व लोका आनंद होत । धर्मादाय करी आनंदात । गृही जाऊनी त्वरीत । मातेलागी नमस्कारी ।। ८५ ।। आनंद झाला मातेसी । प्रेमे भेटे पुत्रासी । गुरु महिमा निश्चयेसी । वारंवार वर्णिती

॥८६॥ तयाची स्त्री पतिव्रता । सौभाग्य खाणी तत्वता । नमस्कारी प्राणनाथा । सासुश्वशुरादि समस्ता ॥ ८७ ॥ सद्गुरु राये कृपा केली । सौभाग्य कला वाढविली । हृदयी निष्ठा धरिली । श्रीगुरु भजनाची ॥ ८८ ॥ राये सोहळा केला थोर । याचक तोषविले अपार । तृप्त केले नारी नर । मिष्टाने घालुनी ॥ ८९ ॥ सदा गुरु आज्ञा वंदुनी शिरी । पुत्रे नेमे केला सत्वरी । जी जी कर्मे कथिली सारी । श्रीगुरु सेवा न विसंबे ॥ ९० ॥ नित्य जाय गुहे समीप । प्रदक्षिणा करिती अमूप । ध्यानी भरुनी स्वरुप । श्रीगुरु भजन करिती ॥९१॥ आनंदी आनंद सकळासी । दुःख दारिद्र नसे कोणासी । दृढभक्ति मनासी । श्रीगुरुची जडलीसे ॥ ९२ ॥ निजानंद गुरु रंगनाथ । दासासी स्फूर्ती देत । स्वये वदविता ग्रंथ । कृपाळू निज माऊली ॥ ९३ ॥ स्वस्ति श्री रंग लीलामृत ग्रंथ । सदानंद रामानंद चरित्र अद्भुत । सहज रंग कृष्णदास कृत । तृतीयोध्याय गोड हा ॥ ९४ ॥

॥ श्री सद्गुरु नाथार्पण मस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ तृतीयोध्यायः समाप्तः ॥



## ॥ अध्याय ४ था ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवायः ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री सद्गुरुनाथायनमः ॥

॥ सद्गुरु महिमा अपार । मज न वर्णवे सत्वर । मनी आनंद फार । तव नाम गर्जनाचा ॥ १ ॥ सद्गुरु तूचि माय बाप । निज निष्ठा देई अमूप । ध्यानी मनी तव स्वरुप । राहे ऐसे करी आता ॥ २ ॥ सलोकता समीपता । स्वरुपता सायुज्यता । तुज वरुनि गुरुनाथा । ओवाळुनिया सांडाव्या ॥ ३ ॥ कर्म धर्म अभिमाने । नाडलो बहु प्रेमाने । जन्म मरणाचे धरणे । तव पदी

असोदे ॥ ४ ॥ अनंत जन्म होवो मज । तव कृपा तारील सहज । भजनी मती देई निज । अखंड रुपे तव नामी ॥ ५ ॥ तव नामाचा महिमा अपार । वेद वर्णिती साचार । मी मूढ अनाचार । महिमा काय वर्णितो ॥ ६ ॥ जाणत असता अग्नीत । काष्ट जैसे दग्ध होत । तैसे पापी मन शुद्ध होत । तव अनुग्रहे करूनि ॥ ७ ॥ सद्‌गुरु नाथा तव पदाची । महिमा वर्णावयाची । मती न चाले वेदांची । तेथे मी काय वर्णू ॥ ८ ॥ वेदांची क्रिया समस्त । यज्ञयागादि तपो व्रत । करिता ॐ तत्सत् । मनोमल चित्त शुद्धी ॥ ९ ॥ परि ती न दाविती स्वरूपा । ना चुकविती जन्मांतर खेपा । ऐसी नव्हे सद्‌गुरु कृपा । ऐक्य चैतन्य दाविती ॥ १० ॥ मग सवेची आली ज्ञानकळा । विश्वी विश्वंभर भरला । पिपिलिका ब्रह्मादि डोळा । दाखविसी गुरुराया ॥ ११ ॥ राहिले गुरु शिष्य पण । सभरा भरीत रूप चैतन्य । ऐसे योगी समाधाने । आत्मरुपे वर्तती ॥ १२ ॥ प्रारब्ध उर्वरित भोगिती । तेयीचा तो साक्षी निश्चिती । चैतन्य वद्रू निमिष्या ती । दृढ जागती स्वरूपी ॥ १३ ॥ ऐसि बोलती श्रुति । बृहदारण्य विख्याती । गुरुराया श्लोकार्थी । तुझा तूंची वदविसी ॥ १४ ॥



संमती श्रुति । योगरतोवा । भोगरतोवा । संगरतोवा ।
संगविहीनः । किंचित् ब्रह्मणी योजीत । चित्तं नंदती । नंदती नयत् ॥

टीका :– तो योग करुनि विख्यातु । अथवा विषयभोग लोलुपतु । पुत्रादि स्त्री सुखादीस्तु । अथवा या संगुया अलिप्त ॥ १५ ॥ परीक्षणभरी ब्रह्माची स्फूर्ती । किंचित विचार ज्याचे चित्ती । तो नापडे व्यासंगती अवर्ती । जन्म मरणाच्या ॥ १६ ॥ ऐसा तूं परब्रह्म साक्षात्कार । ऐक्य रुपी गुरु निर्धार । ध्यानी मनी निरंतर । तुझे तूंच दाखविसी ॥ १७ ॥ एऱ्हवी काष्टाची बाहुली । अज्ञाने परिपूर्ण भरली । तव कृपा आनंदे वधिली । म्हणूनि लाधली निज निष्ठा ॥ १८ ॥ जिकडे पाहे निज दृष्टी । तेथे तूं उभा समेष्टी । अतो जिज्ञासु यथार्थी । ज्ञान स्वरुपी तुझा तूंची ॥ १९ ॥ तुझ्या आज्ञाधारे । ब्रह्मी वर्ततसे रे । ग्रंथमिषे सत्वरे । गुरुराया चालविसी ॥ २० ॥ गताध्यायी कथन । राजपुत्र उठला तव कृपेने । यावरी कथा प्रयोजन । श्रीरंग आपण बोलवितसे ॥ २१ ॥ श्रीरंग मी तुमचा दास । भावे लीन पदास । कृपा करी दासास । पुढे चालवी ग्रंथ रचना ॥ २२ ॥ आनंदे पुत्रा समवेत । राजा गेला नगरांत । वाद्ये वाजती

अमीत । सोहळा जन करिताती ।। २३ ।। गुढिया पताका तोरणे । नगर शृंगारिले थाटानें । बंदीजन गर्जती प्रेमाने । आनंदी आनंद जाहाला ।। २४ ।। याचक बोलावुनि समस्त । द्रव्य देऊनि केले तृप्त । उणे कोणाशी पडू न देत । भांडार सर्व वेंचिले ।। २५ ।। श्री गुरुच्या कृपे करूनी । पुत्र जीवन आले परतुनि । सद्‌गुरु महिमा वर्णुनी । गीत गात प्रेमानंदे ।। २६ ।। नित्य घेई दर्शन । सद्‌भावे घाली लोटांगण । गुरु चरणी एक क्षण । न विसंबे कदाची ।। २७ ।। तयाचा पुत्र ही गुरुभक्त । गुरु सेवे नित्य रत । अखंड राही जागृत । श्री गुरु नाम स्मरणी ।। २८ ।। कांही काळ लोटला जाण । वृद्धावस्थे गांजिला पूर्ण । राज्य पुत्रा देऊनि जाण । तो ही मृत्यू पावला ।। २९ ।। पुत्रासी दुःख झाले फार । वडिलांचे आठवीत गुण अपार । मोहासी पडता विसर । मनी विचार तये केला ।। ३० ।। ऐश्वर्य संपत्ति नाशवंत । मोहाने प्राणी होय पतित । त्याग करावा निश्चित । विचार एक योजिला ।। ३१ ।। राज्य संपदा सोडुनी । श्री गुरुचे सेवे लागुनि । झिजवू काया ही म्हणूनी । उपाय एक योजिला ।। ३२ ।। धन संचय वडिलांचा बहुत । सत्कर्मी वेचावा म्हणत ।



साफल्य होईल जीवित । विचार हा ठरविला ।। ३३ ।। श्रीगुरु लागी जाण । कृष्णार्पण करावे धन । परि ते निःसंग योगी जाण । वैराग्यशील गुरु राजा ।। ३४ ।। सुवर्ण मृत्तिकासमचि त्यासी । अव्हेर करितील धनासी । म्हणुनि खेद वाटे चित्तासी । भार्येलागी पुसतसे ।। ३५ ।। तव ती सद्‌गुणखाणी पतिव्रता । महासाध्वी चतुर तत्वता । जाणूनि पतिच्या भावार्था । काय वदती जाहली ।। ३६ ।। आपले ठायी झाला हेत । सत्‌शिष्यासी हेचि उचित । साधून घ्यावा परमार्थ । धन सर्व वेचुनियां ।। ३७ ।। सद्‌गुरु राया दीनदयाळू । भक्त वत्सल अति कृपाळू । अज्ञान तिमिर स्नेहाळू । काय महिमा वर्णू मी ।। ३८ ।। सद्‌गुरु वसती अरण्यात । झाडी असे अपरिमित । शीत उष्ण ताप होत । मठ तेथे बांधावा ।। ३९ ।। मठ बांधावा विस्तीर्ण । सर्व सोयी योजुन । कारागीर कुशल आणून । बांधकाम करावे ।। ४० ।। ऐकोनि पत्नीचे गुज । आनंदला भक्तराज । विचार काढला सहज । अति उत्तम सर्वाहुनि ।। ४१ ।। कारागीर पाचारिले । सर्व साहित्य जमविले । मुहूर्त पाहून चांगले । आरंभ केला मठासी ।। ४२ ।। द्रव्य वेचुनि अपार । कार्य संपविले समग्र । हर्षला तो

राजवर । गुरु सेवा घडली मज ।। ४३ ।। तो अद्‌भुत झाली नवल कथा । श्रीगुरुची अतर्क्यता । सावध परिसिजे श्रोता । लीला दाविती जनासी ।।४४।। मठ जो का पूर्ण झाला होता । सुर्योदय होताचि तत्वता । संपूर्ण गुप्त झाला समस्ता । कांही खूण दिसेना ।। ४५ ।। आश्चर्य वाटले सकळांसी । काय समजेना कोणासी । मठाची गति झाली कैसी । विपरीत करणी झाली हे ।। ४६ ।। राजासी कळले वर्तमान । मठ गुप्त झाला म्हणोन । चित्ती विषाद वाटला जाण । अपराध कांही तरी घडलासे ।। ४७ ।। मग पूर्व तयारी करून । पुन्हा मठ बांधिला जाण । तो होताची संपूर्ण । गुप्त होतसे तात्काळी ।।४८।। ऐसे तीन वेळा जाण । मठ बांधिला संपूर्ण । परि तो जाय गुप्त होऊन । द्रव्य सर्व वेचले ।। ४९ ।। द्रव्य नाही राहिले । अकिंचन पदरी आले । परी मठ कार्य न जाहले । खिन्नता बहू वाटली ।। ५० ।। काय आतां करुं प्रयत्न । श्री गुरुसी जावे शरण । वृत्तांत सर्व निवेदुन । आज्ञेप्रमाणे वर्तावे ।। ५१ ।। श्री गुरुसी न विचारता । कार्य केले ते गेले वृथा । पश्चातापे तत्वता । शरण रिघे श्रीगुरुसी ।। ५२ ।। जोवरी द्रव्याभिमान होता । नाही आठविले श्री गुरुनाथा ।

झडून गेली अहंममता । शरण रिघाला तात्काळ ।। ५३ ।। दुरुनि देखे श्रीगुरु माऊलीसी । लोटांगण घाली आदरेसी । जोडोनि बद्धांजलीसी । नमन करी साष्टांगे ।। ५४ ।। तये काळी गुरुमाऊली । नेत्री तयाने देखिली । नेत्री प्रेमाश्रूंनी दाटली । देह भान विसरला ।। ५५ ।। पश्चातापे दाटला । शब्द न फुटे वाचेला । म्हणूनि स्तब्ध राहिला । नयनी टकळी लागली ।। ५६ ।। श्रीगुरु सदानंद । प्रेमे बोलती शब्द । क्षेम की तव गृही आनंद । स्त्री पुत्र धनासी ।। ५७ ।। वचन परिसुनि गुरुचे । देहावरी आला साचे । प्रेमळ वदतसे वाचे । श्री गुरुसी तेधवां ।। ५८ ।। यावरी बोले गुरुसुत । तुमचे कृपे आनंदात । परी मम मनोरथ व्यर्थ । झालेसे गुरुवर्या ।। ५९ ।। गुरु आज्ञेविण कार्य केले । त्याचे प्रायश्चित्त योग्य आले । क्षमा करी दासासी माऊली । म्हणुनी चरणी लागला ।। ६० ।। द्रव्य मदानें उन्मत्त झालो । अहंकाराच्या नादी लागलो । स्वमतानें कार्य करुं लागलो । परि झाले विपरीत ।। ६१ ।। गुरु म्हणती काय झाले । किमर्थ काय वदसी वहिले । काय इच्छित योजिले । होते झडकरी सांग पा ।। ६२ ।। तव बोले राजकुमर । मठ बांधावा केला विचार । द्रव्य

वेचिले अपार । मठा कारणे ।। ६३ ।। मठ संपूर्ण झाला । आनंद बहु चित्ताला । परि श्रीगुरु आज्ञा नसता मला । कार्य सर्व बिघडले ।। ६४ ।। मठ पूर्ण होताचि जाण । ताबडतोब अदृश्य झाला जाण । चित्ता लागली तळमळ पूर्ण । खेद बहुत जाहला ।। ६५ ।। यापरी तीन वेळा घडले । मठ बांधणे पूर्ण होताचि वेळे । गुप्त झाले तात्काळे । द्रव्य सर्व नष्ट झाले की ।। ६६ ।। घरी कांही द्रव्य नाही । इच्छा राहिली मम हृदयी । सांगा स्वामी निश्चयी । यासी काय करावे ।। ६७ ।। म्हणुनि चरणी लागला । कृपा करावी दासाला । पुरवावे हेतुला । हेचि मागणे श्री गुरुराया ।। ६८ ।। प्रसन्नवदने तयासी । श्रीगुरु सांगती उपाय त्यासी । जाणुनि त्याचे इच्छेसी । कृपा कटाक्ष अवलोकुनिया ।। ६९ ।। मठ बांधण्याचा हेतु झाला । श्रीहरि पुरवील इच्छेला । उपाय सांगतो एक त्याला । त्याप्रमाणे करी बा तू ।। ७० ।। गृही जाऊनी त्वरेसी । स्त्रीचे आणावे मांगल्यासी । चौहाटी वेंचुनिया त्यासी । द्रव्य सत्वरी आणावे ।। ७१ ।। हे जरी करिसी साधन । इच्छित होईल परिपूर्ण । मठ कार्य होईल जाण । हेत तुझे पुरतील ।। ७२ ।। आज्ञा वंदोनि शिरी । साष्टांगे



प्रणिपात करी । तेथुनि निघाला सत्वरी । गुरु आज्ञा घेऊनि ।। ७३ ।। विश्वास गुरु वचनासी । गृही जाऊन भार्येसी । वृत्त कथिता झाला तिजसी । श्रीगुरु वचनाचे ।। ७४ ।। तव कंठीचे मांगल्य आहे । वेंचून द्रव्य आणु लवलाहे । मठ कार्य करु गुरु आज्ञा हे । देई झडकरी मजसी ।। ७५ ।। ऐकूनिया पतिवचना । हर्षांकित झाली राजांगना । म्हणे भाग्य उदेले जाणा । धन्य झाले अजि मी ।। ७६ ।। धन्य सती पतिव्रता । पती आज्ञेमधे तत्परता । पति आज्ञा नुल्लंघी तत्वता । महासाध्वी ती एक ।। ७७ ।। पति दैवत । पति म्हणे जे जीवप्राण होत । पतिच्या ठायी सर्व चित्त । भूलोकी श्रेष्ठ ती एक ।। ७८ ।। जी पतीची अवहेलना करी । दुर्वचने भाषण करी । ती स्त्री केवळ दुराचारी । अधोगती तिजलागी ।। ७९ ।। पती आज्ञा मानी प्रमाण । पति वचनी वेचि प्राण । काय वर्णावे तिचे गुण । त्रैलोक्यामध्ये वंद्य जी ।। ८० ।। असो ऐशा रिती तो साध्वी । पतिवचनी परिसुनि सद्भावी । आनंद मनोभावी । वंदन करुनि बोलतसे ।। ८१ ।। महाराज मी अर्धांगी जाण । स्वामित्व आपले असे पूर्ण । आपली जी इच्छा जलदीनें । घ्यावे करुनि कार्यासी ।। ८२ ।। आज

सुदिन सुमंगल । परम भाग्यें लाभला केवळ । श्रीगुरुसेवा सफल । होईल ऐसे वाटतसे ।। ८३ ।। परम प्रीति करून । मांगल्य देई आवडीने । पती चरणी अर्पून । कार्य करा म्हणे वेगी ।। ८४ ।। पत्नीच्या घेऊन मांगल्याते । परम स्नेहे आला धावत । तत्काळ गुरु चरणी अर्पीत । आज्ञे लागी तिष्ठला ।।८५।। श्रीगुरु म्हणे मांगल्येसी । विक्री करी वेगेसी । वेतन येईल तयासी । ते टाकी या कुंडात ।। ८६ ।। माणसे लावावी बांधावयासी । वेतन देईल सर्वांसी । हात घालुन धुनीसी । ज्याचे त्यानें द्रव्य घ्यावे ।। ८७ ।। ज्यानें जैसे कष्ट केले । तैसे त्यासी द्रव्य मिळेल । ऐसे सांगुनि तात्काळ । समाधिस्थ गुरुवर्य ।। ८८ ।। आनंद बहुत जाहला । मजूर संघ जमविला । आरंभ केला कार्याला । श्रीगुरु आज्ञा घेऊनि ।। ८९ ।। मात झाली नगरांत । लोक धावले असंख्यात । कर्मे करूं लागले.सर्वत्र । नित्य नियमानें मठाचे ।। ९० ।। अस्तमान होताचि जाण । वेतन मागती अवघेजण । गुरुसुत बोले उद्देशुन । कुंडातुनी घ्या वेगी ।। ९१ ।। ज्याचे त्यानी आपआपले । वेतन घ्यावे कुंडातले । जैसे ज्याने काम केले । मिळेल तैसे जाणपां ।। ९२ ।। श्रीगुरु लीला अघटित । कार्य वर्णावे ते कौतुक ।



योग्य ते प्रमाणे वेतन देख । सर्वांसी मिळाले ।। ९३ ।। ज्याने अधिक कष्ट केले । द्रव्य त्यास अधिक मिळाले । चुकार गुंडही ते वेळे । कमी वेतन तयासी ।। ९४ ।। हिशोब नित्य बरोबर । अधिक उणे लवमात्र । कोणासी नसे तिळभर । आश्चर्य सर्व करिताती ।।९५।। ऐसे षण्मास पूर्ण । मठ झाला संपूर्ण । महोत्सव ब्राह्मणभोजन । यथाविधि करितसे ।। ९६ ।। श्रीगुरुराज दया मूर्ती । शिष्याची देखोनिया भक्ति । सप्रेमे तया वचनोक्ति । अवश्य म्हणोनि वदतसे ।। ९७ ।। पुढील अध्यायी जाण । श्रीगुरु करतील मठावलोकन । ते सुरस कथा गहन । श्री रंगमुर्ती बोलवील ।। ९८ ।। निजानंद रंगनाथ । स्वये वदविता झाला ग्रंथ । स्वहस्ते करी लिखित । निमित्त मात्रे करुनियां ।। ९९ ।। स्वस्ति श्रीलीलामृत ग्रंथ । सदानंद चरित्र अद्भुत । सहजरंग कृष्णदास कृत । चतुर्थोध्याय गोड हा ।। १०० ।।

।। श्री रंगनाथ चरणार्पण मस्तु ।।

।। इति श्री रंगलीलामृत ग्रंथ चतुर्थोध्यायः समाप्तः ।।

# ॥ अध्याय ५ वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय: ॥

॥ श्री गणेशायनम: ॥ श्री सरस्वत्यैनम: ॥ श्री सद्गुरुनाथायनम: ॥

जयजयाजी श्रीगुरुराया । परम उदारा महाराजया । तुझेनि स्मरणे दोष विलया । जाती सर्वक्षणमात्रे ॥ १ ॥ त्वंपद तप्तद असिपद । तुझ्या कृपे हा बोध । होऊनि तुटे भवबंध । अगा सद्गुरुराया ॥ २ ॥ त्वंपदी भावना होऊन । तत्पदी जाय मिळोन । असिपदी रंगुन । तुज कृपेने होतसे ॥ ३ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष । चारी पुरुषार्थ प्रसिद्ध । एक कृपा तुझी अगाध धावत येती साक्षेपे ॥ ४ ॥ सलोकता आणि समीपता । स्वरुपता आणि सायुज्यता । या केवळ दासी तत्वता । तव कृपे पुढे होय पा ॥ ५ ॥ ऐसी तुझी अगाध शक्ति । देवादिकाहुन अधिक महति । काय वर्णू मी मूढ मती । कुंठित मती होतसे ॥ ६ ॥ जो जो वर्णावे तुझे गुण । वाचेसी पडतसे मौन । नेत्री प्रेमाश्रु दाटुन । हृदय स्फुंदन होतसे ॥ ७ ॥ असो आता द्यावे अनुसंधान । गताध्यायी झाले कथन । श्रीगुरुसी विनवुन । मठावलोकना निघाले ॥ ८ ॥ सत् शिष्य रामानंद जाण । समागमें घेतला प्रेमाने । राजपुत्र परिवार गण । निघाले तेही बरोबर ॥ ९ ॥ अवलोकिला समग्र । चित्ती आनंद झाला थोर । परत येऊनि गुहेवर । मृदुवचन बोलताती ॥ १० ॥ सर्वत्रासी दिधला निरोप । रामनंदासी पाचारिले समीप । प्रेमानंदे येतसे बाष्प । काय वदते झाले ॥ ११ ॥ माझे मनी हेतु आला । शिष्य स्थापूनि या स्थानाला । त्वा जावे काशीला । सत् शिष्या जाण पा ॥ १२ ॥ हीच आज्ञा मज तुजसी । पावन करी जगतासी । चालवी आनंद सांप्रदायासी । कीर्ती वाढेल महीवरी ॥ १३ ॥ ऐसे ऐकुनिया वचन । सद्गतीत झाले अंतःकरण । धाऊनि धरिले चरण । नका लोटू म्हणतसे

॥ १४ ॥ स्वामीच्या चरणाविण । पवित्र नसे अन्य स्थान । साडेतीन कोटी तीर्थे जाण । तुमचे चरणी वसताती ॥१५॥ मज काशीत काय कारण । निरंतर सेवीन चरण । भवबंध जाय निरसुन । तव सन्निध गुरुराया ॥१६॥ ऐसे ऐकुनी सदानंद । कृपे बोधी रामानंद । वैराग्यशील लोक प्रसिद्ध । उद्धरी तूं अनुग्रहे ॥ १७ ॥ नारीनर क्षत्रियासी । उद्धरावे मूढजनासी । आज्ञा माझी आहे ऐसी । धर्म स्थापना करावी ॥ १८ ॥ पूर्वीचा जो क्रम योजिला । विसर त्याचा कैचा जाहला । आठवुनिया निज हेतुला । कार्यभाग तो उरकावा ॥ १९ ॥ पूर्वीचा तूं वसिष्ठ । रामावतारी गुरु श्रेष्ठ । कृष्णावतारी गर्ग वरिष्ठ । अवतार धरुनि उद्धराया ॥ २० ॥ स्मृती करुनी पूर्वीची । इच्छा पुरवी देवाची । धर्म संस्थापना करी साची । नंतर येई झडकरी ॥ २१ ॥ ऐसे वदतां रामानंदासी । जागृती आली स्वकर्माची । अज्ञानत्व गेले विलयासी । मोह भ्रम निरसिला ॥ २२ ॥ बोधोनिया रामानंदासी । पद्मासने उत्तर मुखेसी । बैसले ध्यानी योगाभ्यासी । श्रीगुरुमुर्ती सदानंद ॥ २३ ॥ रुद्राभिषेक करून । प्रदक्षणा उपचार जाण । गुरुसी करिती समर्पण । यथाविधि जाण पा ॥ २४ ॥



समाधिस्थ जाहले सदानंद । चतुर शिष्य रामानंद । श्रीगुरु आज्ञेचा बोध । शिष्य एक शोधिला ॥ २५ ॥ तया कल्याण मठी जाण । अमलानंद नामे ब्राह्मण । मठी तया स्थापुन । आपण गेले काशीसी ॥२६॥ विश्वेश्वरा सन्निध । मठ स्थापला सिद्ध । भजन मार्ग अति शुद्ध । श्रुति स्मृती सांगतसे ॥ २७ ॥ परिवार वाढला बहुत । उपदेश करी जीवनमुक्त । हरी नामी गजर होत । प्रेमभावे करूनिया ॥ २८ ॥ इकडे कल्याण मठासी । अमलानंद यति संन्यासी । स्थापित केले निश्चयेसी । जगदुद्धार करावया ॥ २९ ॥ तया अमलानंदा–पासोन । परंपरा चालली जाण । कल्याण मठ संस्थापन । आनंद सांप्रदाय चालिला ॥ ३० ॥ आमलानंद सिद्ध शिरोमणी । वैराग्यशील ब्रह्मज्ञानी । आत्म बोधी जन लागोनी । परिवार त्यानी वाढविला ॥३१॥ त्यांचे शिष्य सहजानंद । यती ज्ञानी महासिद्ध । पूर्ण ब्रह्म अगाध । जो शुकेंद्र अवतरला ॥ ३२ ॥ सहजानंद महामुनी । तत्ववेत्ता अग्रगणी । शुद्ध सत्वाची खाणी । सहज स्थिती ब्रह्माची ॥ ३३ ॥ आबाल वृद्ध शिष्य जाण । गुरुचरणी असती लीन । गुरु वाक्य ते प्रमाण । ऐसी निष्ठा तयाची ॥ ३४ ॥ सर्वासी समदृष्टी पाहे ।

उपदेशामृते अघेवाहे । प्राणी जीवनमुक्तची होय । दर्शनमात्रे तयांच्या ।।३५।। तयांच्या शिष्यावळीत । नरनारी असंख्यात । भजन पूजना येती नित्य । स्वामी सेवा करताती ।। ३६ ।। विधवा स्त्री अन्नपूर्णा । सहजानंदाची शिष्य जाणा । एके दिवशी गुरु राणा । तिज प्रती बोलतसे ।। ३७ ।। तूं एकनिष्ठपणे सेवा करिसी । जेणे संतोष होय मानसी । सद्भावे भजन पूजनासी । नित्य करिसी नियमाने ।।३८।। पाहूनिया भक्तिभाव। पातिव्रत्यही अपूर्व। श्रीगुरुचे आज्ञेस्तव । कार्य एक करावे ।। ३९ ।। कोणी नाही मठात । मज जाणे त्वरित । तूं संन्यास घे निश्चित । चालवी पंथ गुरुगृहीचा ।। ४० ।। तव ती लागे चरणा । मी स्त्री आहे गुरुराणा । पदीं कैसे आरोहण । सांगा मी होऊ ।। ४१ ।। स्त्रीपासी नाही अधिकार । तुमचा आनंद संप्रदाय थोर । ब्रह्मचर्य संन्यास खडतर । विधवा मी आहे की ।। ४२ ।। ऐकुनिया तिच्या वचनासी । स्वामी संतोषले मानसी । अघटित दावी लीलेसी । महाराज समर्थ तो ।। ४३ ।। कृपा बळे श्रीगुरुनी । पाहिली स्त्री निजनयनी । छाटी परिधान करवुनी । पुरुष रूपा आणिले ।। ४४ ।। भयभीत पाहे मनी । स्त्री रुप गेले लपोनि । पुरुष

अवयव देखोनी । लोटांगण घाली गुरुसी ।। ४५ ।। कैसे झाले विपरीत । श्री गुरु असती समर्थ । कृपाबळे निमिषमात्र । अपूर्व लीला दाविली ।। ४६ ।। की श्रीकृष्णाने द्वारकेत । स्यमंतक मण्याच्या शोधात । जांबुवंती केली रुपवंत । तैसे केले श्रीगुरुनी ।। ४७ ।। स्त्री जन्मासी तिलांजली । देऊनि नर जन्म घालो । कृपा दृष्टी अवलोकिली । इच्छा मात्रे करोनिया ।। ४८ ।। धन्य धन्य श्रीगुरु । वेदासी न कळे पारू । त्याहुनि महिमा थोरू । श्रीगुरु लीलेचा ।। ४९ ।। धन्य महिमा श्रीगुरु प्रतापाचा । काय आश्चर्य बोलो वाचा । भाव पालटला मनाचा । श्रीगुरु दये करुनि ।। ५० ।। धन्य माझे जीवित । श्रीगुरु कृपे साफल्य होत । उद्धरले आजि खचित । तव कृपा बळे स्वामिया ।। ५१ ।। चरणी घाली लोटांगण । अश्रु न्हाणिले चरण । आजि झाले मी पावन । सद्गुरुराया समर्था ।। ५२ ।। माझी सेवा फळा आली । पूर्व पुण्याई उदेली । दोन्ही कुळे उद्धरली । तव कृपे गुरुवर्या ।। ५३ ।। पूर्वांग उत्तरांग । प्रायश्चित करिती सांग । काषाय वस्त्रे सवेग । देऊनि स्थापी मठासी ।। ५४ ।। नाम ठेविले पूर्णानंद । परिपूर्ण कृपा अभेद्य । समाधिस्थ सहजानंद । तया कल्याण

मठासी ॥ ५५ ॥ सत्स्वरुपी पूर्णानंद । गुरु कृपे करी आनंद । आत्मानुभवाचा बोध । अहर्निश घेत असे ॥ ५६ ॥ शिष्य परंपरा वाढली अपार । हरीस्मरणी करी गजर । सन्मार्गा लावी नारीनर । भक्ति महात्म्य वाढविती ॥ ५७ ॥ अमलानंद विख्यात । त्याचे मुखी संस्कृत । सदानंद ग्रंथ अद्‌भुत । त्यातील कथा हे जाणावी ॥ ५८ ॥ हे गुरु परंपरा वर्णन । आनंद सांप्रदाय जाण । पुढे रंगनाथ चरित्र गहन । त्याचा तोच वदवील ॥ ५९ ॥ रसाळ आहे निरूपण । श्रोती द्यावे अवधान । पुढीले अध्यायी जाण । रंगनाथ स्वये वदतसे ॥ ६० ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । सदानंद चरित्र अद्‌भुत । सहजरंग कृष्णदास कृत । पंचमोध्याय गोड हा ॥ ६१ ॥

॥ श्रीरंगनाथार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ पंचमोध्यायः समाप्तः ॥

## ॥ अध्याय ६ वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ ॐ नमोजी अवधूता । दत्तात्रय गुरुनाथा । तवहस्त ठेवी माथा । निजदासा उद्धरी ॥ १ ॥ पांडुरंग स्वरुपी तूची । भीमा तटी उभाची । भक्त निजरूप दाविसी । ऐक्य रुपी पंढरीशा ॥ २ ॥ आमुचे कुळी तुमची भक्ति । हेचि देई निजयुक्ती । श्रीगुरु प्रती अखंडचित्ती । द्यावीजी गोपाळा ॥ ३ ॥ भक्त काम कल्पद्रुम । ऐसे वाढले तुझे स्तोम । कृपार्णवा परम । सेवा घडवी

निरंतर ॥ ४ ॥ इच्छा मात्रे करुन । प्राणी जाय उद्धरुन । अघटित तुझे महिमान । अगा सद्गुरुराया ॥ ५ ॥ निमित्त मात्रे करुन । दासासी स्फूर्ती देऊन । प्रेमे करिसी ग्रंथ कथन । श्रीगुरु रंगराया ॥ ६ ॥ मागील अध्यायी कथन । आनंद सांप्रदाय श्रेष्ठ जाण । पूर्णानंद मठी स्थापून । अपार महिमा वाढविला ॥ ७ ॥ पूर्णानंद यतिवर्य । अगाध ज्ञानी गुरुवर्य । जगदोद्धाराचे कार्य । गुरु आज्ञे चालवीतसे ॥ ८ ॥ पुढे रंगचरित्र अति गहन । श्रोती होऊनी सावधान । रसाळ आहे निरुपण । एकाग्र श्रवण करावे ॥ ९ ॥ नाझरे ग्राम विख्यात । पुण्यपावन पवित्र । वसिष्ठ गोत्री बोपाजीपंत । यजुर्वेदीय ब्राह्मण ॥ १० ॥ वृत्ती कुलकर्णीपणाची । दातृत्व दयाशील साची । अखंड असे स्वधर्माची । तया रिती वर्ततसे ॥ ११ ॥ तयाची कान्ता पतिपरायण । बयाबाई नामे जाण । आचारशील पुण्यवान । पतिसेवी तल्लीन असे ॥१२॥ संपत्ति असे बहुत । परी संततीवीण व्यग्र चित्त । उदास वाणे वर्तत । पति पत्नी तेधवा ॥ १३ ॥ नवस सायास केले बहुत । परी संतानाचा लाभ न होत । खेद होत चित्तात । अखंड आळवी श्रीहरिसी ॥ १४ ॥ वर्तत असता

ऐश्या रिती । योग आला अवचिती । पूर्व पुण्य उदेले निश्चिती । बोपाजीचे तेधवां ॥ १५ ॥ कल्याण धामी पूर्णानंद यती । तीर्थ पहावया निश्चिती । सहज नाझरे ग्रामी येती । श्रीगुरु यतिराज ॥ १६ ॥ नयनी पाहुनी गुरुमूर्ती । बोपाजी आनंदले चित्ती । भेटुनिया श्रीगुरुप्रती । विनंती करते जाहले ॥ १७ ॥ विनवणी एक चरणासी । स्वामीनी चलावे गृहासी । पावन करावे दासासी । म्हणुनी प्रार्थना करितसे ॥१८॥ देखोनि त्याचा पूज्य भाव । आनंदले यतिराव । बोपाजीचे आग्रहास्तव । तात्काळ पातले गेही ॥ १९ ॥ अभ्युत्थान देऊनि गुरुसी । पूजीता झाला शोडषोपचारेसी । एकांत देखोनि समयासी । विनंती करी साक्षेपे ॥ २० ॥ स्वामीनी कृपादृष्टी करून । अनुग्रह द्यावा मजलागुन । म्हणूनि चरणी झाला लीन । श्रीगुरुच्या तेधवा ॥ २१ ॥ पूर्णानंदस्वामी यती । कृपाळू दयामूर्ती । देखोनि त्याची सद्भक्ति । अनुग्रह देते जाहले ॥ २२ ॥ उभयतासी ते वेळ । अनुग्रह दिला तात्काळ । पावन केले न लगे पळ । श्रीगुरु महिमा अघटित ॥ २३ ॥ सद्भावे घाली लोटांगणा । धन्य माझे भाग्य जाणा । योग आजिचा सुदिन । गुरुराये कृपा केली ॥ २४ ॥ प्रेमे घाली नमस्कार ।

उभे ठाकती जोडोन कर । संतती नाहीं आम्हावर । कृपा करी दयाळा ॥२५॥ संततीवीण सद्‌गती । शास्त्री वर्णिती अधोगती । श्रीगुरुराया कृपामूर्ती । इच्छा पूर्ण करावी ॥ २६ ॥ प्रसन्न झाले पूर्णानंद । म्हणे तुमचे घरी होईल आनंद । पुत्र होईल प्रसिद्ध । अवतरले श्रीहरी ॥ २७ ॥ बयाबाईसी सांगती । गायत्रीची करी भक्ति । तुलसी पूजन चित्ती । एकभावे करी तूं ॥ २८ ॥ ऐसे देऊनि वरदान । श्रीहरी गुरु निघाले तेथून । तीर्थे पाहुनि त्वरेने । कल्याण मठी पातले ॥ २९ ॥ आज्ञेप्रमाणे बयाबाई । निष्ठा पूर्ण गुरुचे ठायी । वर्तन ठेवी लवलाही । पुत्रेच्छा धरूनि ॥ ३० ॥ नेमनिष्ठा व्रत । गायीसी धान्य चारित । सद्‌भावे नित्य करीत । पुत्रालागी जाण पा ॥ ३१ ॥ गोमयातील धान्य वेचून । त्यावरि करी उपोषण । बारा वर्षे होता पूर्ण । स्वप्न तियेसी पडियेले ॥३२॥ पूर्णानंदे येवोनिया । श्रीफळे तीन दिधली तया । ओटीत घेती लवलाह्या । मनी विचार करितसे ॥ ३३ ॥ रिक्त हस्ते श्रीगुरुसी । नमस्कार करु मी कैसी । विचार करुनि मानसी । श्रीफल ठेविले गुरुपायी ॥ ३४ ॥ श्रीगुरु हास्य-मुखाने । बोले सतीसी वचन । हा प्रसाद मज लागुन । येईल जाण पतिव्रते

॥ ३५ ॥ याचा करी तूं प्रतिपाळ । म्हणूनि दिधले तात्काळ । ओटीत घेतले फळ । तिन्ही श्रीफळे ॥ ३६ ॥ ऐसा देऊनि दृष्टांत । लाघव करी श्रीगुरुनाथ । सतीचा देखोनि भावार्थ । मनोरथ पूर्ण केलासे ॥ ३७ ॥ जागी होऊनिया पहात । तव श्रीफळे जाण सत्य । पतीसी सांगे हर्षयुक्त । झाली जे स्वप्न–दशा ॥ ३८ ॥ श्रीगुरुराये कृपा केली । मनीची इच्छा पुरविली । कृपादृष्टी अवलोकिली । सेवा घेतली स्वानंदे ॥ ३९ ॥ स्वप्न म्हणे मिथ्या जरी । श्रीफलाचा प्रसाद सामोरी । भाग्यासी नाही उरी । आजि माझ्या ॥ ४० ॥ संतोषला बोपाजीपंत । म्हणे तुझी भक्ती अद्‌भुत । प्रसन्न झाले श्रीगुरुनाथ । वरप्रसाद मिळाला ॥ ४१ ॥ अति आदरे करून । व्रताचे केले उद्यापन । ब्राह्मण भोजन घालून । श्रीगुरु महिमा गाताती ॥ ४२ ॥ तो प्रसाद उभयतानी । ग्रहण केला आनंदानी । बयाबाई झाली गर्भिणी । सर्वजणा आनंद ॥ ४३ ॥ नवमास भरता पाही । पुत्र झाला ते समयी । यादवराव पाही । नाम ठेवीले तयाचे ॥ ४४ ॥ दिवसेंदिवस वाढी लागला । हर्ष होत मायबापाला । सकळ सुहृद जनाला । संतोष बहु वाटला ॥ ४५ ॥ पुढे दोन

वर्षा पाही । गरोदर झाली बयाबाई । तव चिन्हे वेगळी पाही । दिसो लागली सर्वांसी ॥ ४६ ॥ डोहाळे होत तिजसी । हरीभजन करावे अर्हनिशी । प्रापंचिक व्याप तिजसी । त्यागावा वाटतसे ॥ ४७ ॥ मेळऊनी सकलजन । करावे वाटे हरिकीर्तन । प्रेमे मन जाय गुंगून । हरिस्मरणी तेधवा ॥ ४८ ॥ उपदेश सांगे जनासी । व्यर्थ भुलता प्रपंचासी । आळवावे त्या दयाघनासी । बोध करावा वाटतसे ॥ ४९ ॥ संसाराचा पाश । तोडोनि टाकावे त्यास । एकांत देखोनी स्थानास । नामस्मरण करावे ॥ ५० ॥ डोहाळे होती या रिती । आश्चर्य सर्व जन करिती । म्हणती हे विपरीत स्थिती । दिसो लागली जाण पा ॥५१॥ असो नवमास होताचि पूर्ण । प्रसवली पुत्ररत्न । दैदीप्यमान राजीव नयन । बालक सुंदर दिसतसे ॥ ५१ ॥ आनंद जाहला सर्वांसी । प्रेमे करिती उत्साहासी । गुढिया तोरणे समारंभेसी । पुत्रोत्साह मांडिला ॥ ५३ ॥ जन्मताच बोले ॐ कार । आश्चर्य करिती नारीनर । ईश्वराचाच हा अवतार । दिसतसे जाण पा ॥ ५४ ॥ बोपाजी आनंदले चित्ती । धन्य धन्य श्रीगुरुमुर्ती । पावन केले या जगती । इच्छा पुरविली दासाची ॥ ५५ ॥ शास्त्री पंडीत मिळोन । जातक वर्तविती सकळ जन । म्हणती हरिभक्त पूर्ण । रंगनाथ नाम ठेविले ॥ ५६ ॥ जगदोद्धार करील । भक्ती माहात्म्य वाढवील । जनासी पावन करील । इच्छा मात्रे करुनियां ॥ ५७ ॥ बाळ लीला दावी बहुत । संतोषविती सर्वत्र । माता पित्याना हर्ष होत । कौतुक करिती सर्वही ॥ ५८ ॥ क्रमोनि गेली वर्षे दोन । बाळ क्रीडा करी आनंदोन । मायबाप हर्षती देखोन । लीला करी बहू परी ॥ ५९ ॥ माता बयाबाईसी । गर्भ राहिला तिजसी । प्रसवती झाली पुत्रासी । आनंद सर्व जाहला ॥ ६० ॥ विठ्ठल नाम तयाचे । ठेवीते झाले मुलाचे । लालन पालन सर्वांचे । प्रेमादरे करीतसे ॥ ६१ ॥ श्रीगुरु कृपेकरून । तीन पुत्र झाले जाण । बोपाजीस आनंद पूर्ण । श्रीगुरु चरण आठवीतसे ॥ ६२ ॥ श्रीगुरुराये कृपा करुन । संतान दिधले मज लागून । धन्य गुरुचे महिमान । वारंवार आठवीतसे ॥ ६३ ॥ पुढील अध्यायी कथा जाण । रसाळ आहे निरुपण । रंगलीला वर्णन । श्रोती सादर परिसावे ॥६४॥ स्वस्तिश्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंग कृष्णदासकृत । षष्ठमोध्याय गोड हा ॥ ६५ ॥

॥ श्रीरंगनाथार्पणमस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ षष्ठमोध्यायः समाप्तः ॥

# ।। अध्याय ७ वा ।।

।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।

।। श्रीगणेशायनमः ।। श्रीसरस्वत्यैनमः ।। श्रीरंगमूर्तयेनमः ।।

।। ॐ नमो श्रीगुरु अविनाशा । तिमिरहारका परेशा । सच्चिदानंद प्रकाशा । पूर्ण ब्रह्म स्वये तूची ।। १ ।। अनन्य भावे तुज शरण येता । सकळ कामना साधे तत्वता । बापुडचा भवसिंधूची कथा । मोक्ष हाता सर्वासी ।।२।। सकळ जीवाचा तारक ।। फोल केले अवडंबर मायिक । सद्भावे ठेवून चरणी मस्तक । तुज विनवीतसे ।। ३ ।। सद्गुरुराज मायराणी । ममहृदयी प्रगटोनी । करितसे ग्रंथ कथनी । प्रेम भावे करुनिया ।। ४ ।। असो गताध्यायी जाण । बोपाजीस झाले संतान । आनंदे झाला निमग्न । श्रीहरिचरण आठवीतसे ।।५।। तीन मुले गोजिरवाणी । क्रीडा करिती प्रेमे करुनी । हर्ष होत उभयता लागोनी । बाळलीला अवलोकिता ।। ६ । वडील मुलगा यादवराव । व्रतबंध केला सर्व । विद्याभ्यासास्तव । शिक्षण त्यासी दिधले ।। ७ ।। श्रीरंगराज याचे । व्रतबंध केले सर्वांचे । ब्रह्म कर्म शिक्षण तयाचे । यथाविधी करविले ।। ८ ।। लग्न झाले यादवरावाचे । सोहळा आदरे केला खर्चे । आनंदविले मन सकलांचे । याचकही तृप्त करुनिया ।। ९ ।। आतां लग्न करणे रंगोबाचे । ऐसे विचार दोघांचे । देखोनियां विचार वडीलांचे । मनी उद्विग्न झालासे ।। १० ।। माय-बापा सन्निध जाऊन । साष्टांगे करी नमन । बोलता झाला कर जोडून । नम्र वचन तेधवा ।। ११ ।। श्रीगुरुराये कृपा करून । तुम्हास प्रसाद दिधला जाण । एक श्रीफल गुरूस अर्पून । दर्शन घेतले असे कीं ।। १२ ।। दोन पुत्र तुम्हासी आहेत । मी तव गुरुसी अर्पित । असे असोनिया निश्चित । लग्न कोणाचे करीत असा ।। १३ ।। प्रभुचे पदी मी संलग्न । मायापाशे न व्हावे विघ्न । प्राणी जया

मोहून । विचारे हेचि ठरते कीं ॥ १४ ॥ असा संसार नाशवंत । नाना परीची विघ्ने होत । कुकर्मी वृत्ती सदा रत । हे तो अनुचित असे कीं ॥ १५ ॥ स्त्री पुत्र धनादिक व्याप । लटके वैभव अमूप । परमात्मा सर्व व्यापक । तोचि निरंतर ध्याइजे ॥ १६ ॥ आम्हासी हेचि उचित । आळवावा पंढरीनाथ । करुनियां शुद्ध चित्त । ध्यानी निमग्न असावे ॥ १७ ॥ योगाभ्यास करावा विशेष । सेवावे एकांत स्थानास । अखंड राहूनि समाधिस्थ । श्रीगुरु आज्ञे वर्तावे ॥ १८ ॥ ऐसे बोलोन मातापित्यास । साष्टांगे करुनि प्रणिपातास । जाता झाला कल्याणास । श्रीहरी चिंतना ॥ १९ ॥ इकडे पाहती रंगनाथा । शोध न लागे पाहता । दुःखित झाली मातापिता । आता काय करावे ॥२०॥ बाळलीला आठवून । शोक करी माता जाण । एक वेळा येवोन । रंगनाथा भेट वेगी ॥ २१ ॥ शोक करी आक्रंदोनि । नाम घेऊनि पडे धरणी । रंगनाथा मज लागुनी अव्हेरुनी कां गेला ॥ २२ ॥ माझे पाडसे मनोहर । रूप सावळे सुंदर । राजीव नयन सुकुमार । दृष्टी मज दावा वेगी ॥ २३ ॥ मी अभागी असे जाण । परी श्री गुरु कृपे करून । पुत्र दिधले तिघे जाण । एक नाहीसा

जाहला ॥ २४ ॥ कोठे शोधू रंगनाथा । तुजविण शून्य सर्वथा । तुझे लीले आनंदिता । गेली सर्वही गृहाची ॥ २५ ॥ श्रीगुरुस्मरण करुन । शुचिर्भूत माता होऊन । तुळशी सन्निध जाण । शयन करी पुत्रार्थी ॥ २६ ॥ श्रीगुरु चिंतन करीत । पुत्र भेटावा इच्छित । श्रीगुरुचरणी ठेऊनि चित्त । एकाग्रते पहुडली ॥ २७ ॥ तिचा देखोनि सद्भाव । श्रीगुरु करिती लाघव । जाणोनिया भविष्य सर्व । काय कौतुक करितात ॥ २८ ॥ ध्यानी लागली असे निद्रा । स्वप्नी येऊनि गुरुवारा । सांत्वन केली बोपाजी दारा । ऐका नवल सर्वही ॥ २९ ॥ पूर्णानंद यतिराज । जाणोनी भक्तांचे काज । संकटी धाऊनि सहज । काय कथिते जाहले ॥ ३० ॥ पूर्णानंद येऊनी । मातेसि सांगे स्वप्नी । चिंता करुं नको कामिनी । तव पुत्र सुखी आहे ॥ ३१ ॥ मानव न समजे तयासी । तो आहे वैकुंठवासी । अवतार रुपे जगतासी । पावन करण्या धावला ॥ ३२ ॥ तुमचे पूर्व सुकृत असे जाण । म्हणूनि उदरी आला नारायण । जगताचे करावया उद्धरण । मानव रुपे प्रगटला ॥ ३३ ॥ गेला आहे बद्रिकाश्रमासी । करीत आहे तपश्चर्येसी । आज्ञा होताची तयासी । भेटेल पुन्हा येऊनि ॥३४॥

द्वादश वर्षे पूर्ण होता । रंगनाथ भेटेल अवचिता । तुम्ही सोडोनि सर्व व्यथा । स्वस्थ मानसी असावे ॥ ३५ ॥ नित्य श्रीहरीचे चिंतन । प्रेमे करावे आदरे करुन । होईल तुमचे समाधान । मनोरथ पुरतील ॥ ३६ ॥ ऐसे सांगोनि सतीतें । श्रीगुरु गेलें स्वआश्रमाते । सावध होऊनि अवचिते । पतीसी कथिती जाहली ॥ ३७ ॥ प्रातःकाळी उठोन । पतीसी सांगे स्वप्न । गुरुमाऊली येवोन मजलागी सांगती ॥ ३८ ॥ सुखी आहे रंगनाथ । महायोगी तपोनिष्ठ । तुज भेटेल सत्य । द्वादश वर्षानंतर ॥ ३९ ॥ वृत्त परिसोनि कांतेचे । हर्षित मन बोपाजीचे । म्हणे धन्य जीवित माझे । सद्गुरु राये केलेसे ॥ ४० ॥ नित्य करी भजन पूजन । सद्गुरुचरणी तल्लीन मन । अखंड श्रीहरिध्यान । नेम सर्व चालवितसे ॥ ४१ ॥ नित्यवारी पंढरीची । आदरे करी श्रीहरीची । सेवा करी संतांची । श्रीगुरु आज्ञे वर्ततसे ॥ ४२ ॥ पंढरीस नाझरेहुनि । वारीसी जाई प्रेमे करूनि । पांडुरंग मूर्ती अवलोकुनी । आनंद चित्ता होतसे ॥ ४३ ॥ श्रीगुरु वचनी विश्वास जाण । ठेऊनि घालविती आयुष्यमान । पुत्र भेटीची इच्छा दारुण । ठेऊनिया वर्ततसे ॥ ४४ ॥ पांडुरंगासी प्रार्थी । केव्हा भेटेल रंगमूर्ती ।



गुरुवचन आठविती । धन्य गुरुभक्ति तयांची ॥ ४५ ॥ यात्रा जमता घनदाट । फिरुनि देखे सर्व वाळवंट । मनी इच्छा पुत्र भेट । या लागो तिष्ठतसे ॥४६॥ साधुसंत योगीजन प्रेमेतयासी भेटोन । पुसे रंगनाथ वर्तमान । न सांगता कष्टी होतसे ॥ ४७ ॥ या रीती द्वादश वर्षपूर्ण । क्रमुनि गेले असे जाण । परि न भेटे रंगनाथरत्न । पुत्रेवीण हळहळतसे ॥ ४८ ॥ श्रीगुरु वचनाची पूर्तता । द्वादश वर्षाची असता । केव्हा भेटेल मम सुत । चित्ति तळमळ आवरेना ॥ ४९ ॥ पांडुरंगासी विनवी वारंवार । पुत्र देई सत्वर । मनी इच्छा अनिवार । झाली असे दयाळा ॥ ५० ॥ पूढील अध्यायी कथा सुरस । पिता पुत्र भेट गोडस । श्रोती श्रवण कीजे सावकाश । रसाळ निरुपण अवधारा ॥ ५१ ॥ निजानंद रंगनाथ । स्वये वदविता झाला ग्रंथ । कर्ता हर्ता श्रीगुरु समर्थ । त्याचा तोचि वदविता ॥ ५२ ॥ स्वस्तिश्रीरंगलीलामृतग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंग कृष्णदास कृत । सप्तमोध्याय गोड हा ॥ ५३ ॥

॥ श्रीरंगनाथार्पणमस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ सप्तमोध्यायः समाप्तः ॥

# ॥ अध्याय ८ वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ जयजयाजी श्रीरंगमूर्ती । तुमची अगाध कीर्ती । वर्णितो यथामती । श्रीगुरुराया ॥ १ ॥ तुजवाचोनि मनोरथ । दाता कोण कृपावंत । अपरोक्ष ज्ञानामृत । तव कृपे होतसे ॥ २ ॥ प्रभो तव कृपा श्रेष्ठ । दूर होती अरिष्ट । जन्म मरण कष्ट । चुकती तव प्रसादे ॥ ३ ॥ तव प्रसादे महाथोर । आत्मानात्म विचार । ज्ञान दशा चढे सत्वर । तव गुण वर्णिता ॥ ४ ॥ वर्णिता तव पदासी । अखंड जाण तया काशी । सकल तीर्थे तयासी । घडती चरण प्रसादे ॥ ५ ॥ चरण प्रसाद आगळा । देई अक्षयपद सोहळा । निज स्वरुप डोळा । अखंड जागवी ॥ ६ ॥ मन राहे तव पायी । पादुका ठेविल्या हृदयी । अत्यानंदे बोलेन पाही । तव गुणानुवाद ॥ ७ ॥ तुमचे नाम रंगनाथ । स्मरता हृदयी आनंद होत । हेचि मागणे सतत । तवपदी ठाव देई ॥ ८ ॥ तव पदीचा होइन दास । सेवीन अखंड रजःकणास । पिंड ब्रह्मांडी चित्तास । तव रूप भरलेसे ॥ ९ ॥ रूप भरले सर्वाठायी । काय होऊ उतराई । प्रेमोपचारे मूर्ती पाही । तव पूजा अर्पण ॥ १० ॥ अर्पण करिता सर्व भाव । पूजिला भावे स्वमेव । चैतन्य आरती प्रभाव । स्वस्वरूपा नमन करी ॥ ११ ॥ जगदोद्धार करावया जाण । भक्ति महात्म्य वाढो म्हणोन । स्वच्छंदे अवतार घेतला जाण । लीला दावी जनासी ॥ १२ ॥ स्वयंप्रकाश तूं पूर्ण । माया लाघवे करुन । देहधारी होऊन । चरित्र दावी अलौकिक ॥ १३ ॥ प्रभो तुझी अतर्क्य गती । देवादिक न जाणती । मी पामर पाड किती । वर्णू तुझी थोरवी ते ॥ १४ ॥ त्रिविध तापे गांजून । गेलो आम्ही मूढ होऊन ।

अज्ञान पंकी रुतोन । विसरलो आत्महित ॥ १५ ॥ षड्विकारांचे आधीन । मती गेली गुंगोन । नाठवे तुझे मोक्ष चरण । कृपा करी दासासी ॥ १६ ॥ सर्व-थैव आम्ही अपराधी । तूं तारक दयानिधी । तव भजनी देई सद्बुद्धि । हीच चरणी प्रार्थना ॥ १७ ॥ असो गताध्यायी कथा जाण । श्रीरंगमूर्ती गृह त्यागुन । करिते झाले गमन । मातापिता खेद बहु ॥१८॥ जगदोद्धारा कारण । बद्रिकाश्रमी जाण । सेवुनि स्वामी प्रसन्न । करिती योगाभ्यास ॥ १९ ॥ बद्ध घालोनि पद्मासन । नासिकाग्री दृष्टी ठेऊन । श्रीहरी चरणी तल्लीन मन । एकाग्र करुनि राहिले ॥२०॥ कंद फळें भक्षण करूनि । ब्रह्मानंदी लय लावुनि । अखंड समाधिस्थ होऊन । लय हरी चरणी लावितसे ॥ २१ ॥ सुकुमार वय अज्ञान । नाठवे शीत उष्ण । परि निष्ठा एक असे जाण । श्री हरी भेटीची ॥२२॥ धन्य धन्य हे संत जन । देह ममता त्यागुन । षड्विकार हे आवरून । निजरुपी मग्न सदा ॥ २३ ॥ प्रेमपाश तोडिला । संसार व्यर्थ जाणिला । स्वहित मार्ग अवलंबिला । धन्य ते जगी एक ॥ २४ ॥ लटका प्रपंच लटकी माया । मिथ्या व्याप नाशिवंत काया । हे जे जाणतील लवलाह्या । धन्य जगी ते एक ॥२५॥



स्थावर जंगमातीत । ईश्वर रुपे हे सत्य । ऐसे जे जाणती संत । धन्य जगी ते एक ॥ २६ ॥ या परी श्रीरंगमूर्ती । त्यागुनि मायिक भ्रांती । अखंड श्रीचरणा प्रती । साध्य करण्या धावले ॥ २७ ॥ पिंड ब्रह्मांड ऐक्य जाहले । द्वैतपण हारपले । साधन कार्य काय उरले । ऐशी स्थिती जाहलीसे ॥ २८ ॥ द्वादश वर्षे पूर्ण जाहले । तपानुष्ठान फळा आले । योगाभ्यासे साधिले । श्रीरंगरायाने तेधवा ॥ २९ ॥ देखोनि रंगनाथाची श्रद्धा । वैकुंठवासी लक्ष्मीवल्लभ । भक्त भेटी लागी तेधवा । आला धावोनि तात्काळ ॥ ३० ॥ व्याघ्र रुपे नारायण । अकल्पित आले जाण । पसरोनिया वदन । स्वामी सन्निध उभे राहे ॥ ३१ ॥ रंगनाथ पाहे अवलोकुन । व्याघ्र रुपे भगवान । आले ऐसे जाणोन । आनंद चित्ता जाहला ॥ ३२ ॥ झालीसे समदृष्टी । व्याघ्र रुपे देखे जगजेठी । लावोनी आत्मदृष्टी । काय वदते झालेसे ॥ ३३ ॥ स्वामी पाहती निजरूपा । श्रम घेसी व्याघ्र रुपा । झाल्या जगी जन्म खेपा । तव पाय न सोडी ॥ ३४ ॥ अनंत रुपे तूं नटलासी । हे मी जाणिले चित्तासी । व्याघ्र रुपे धावुन येसी । भक्त भोळा म्हणवूनि ॥ ३५ ॥ जयजयाजी विश्वपालका । रमावल्लभा वैकुंठ–

नायका । स्थावर जंगमात्मक व्यापका । नमन तुला सद्भावे ।। ३६ ।। माया रुपे खेळ खेळसी । अवडंबर रचले लीलेसी । ठाव न कळे ब्रह्मादिकासी । परात्पर अससी तूं ।।३७।। सृष्टी स्थिती संहारका । गुणातीता विश्वव्यापका । ज्ञान सूर्य प्रकाशका । वंदन तुला साष्टांगे ।। ३८ ।। ऐसी ऐकुनी प्रार्थना । प्रसन्न झाला वैकुंठराणा । म्हणे धन्य जगी तूंचि जाणा । भक्त सखा अससी बा ।। ३९ ।। प्रसन्न रुपे नारायण । मस्तकी हस्त ठेवोन । स्वकरे कुरवाळून । बोलतसे रंगनाथा ।। ४० ।। पुरे करी अनुष्ठाना । येथुनी जाई स्वस्थाना । उद्धरी तूं अज्ञान जना । योगिया रंगनाथा ।। ४१ ।। आज्ञा वंदूनि शिरी । प्रेमभावे नमस्कारी । नारायणासी अंतरी । निज प्रेमे पाहातसे ।। ४२ ।। शंख चक्र गदा पद्म । कासे पितांबर उत्तम । सगुण रूप मेघःशाम । निज डोळे देखिला ।। ४३ ।। पायी गर्जती तोडर । भक्त हृदयी मी निरंतर । वसतसे शारंगधर । म्हणोनि सर्वदा वदताती ।। ४४ ।। कंठी घंटा किंकिणी नाद । मम ध्यानी जे सदा स्तब्ध । त्याचे तोडिले द्वंद । हाचि नाद करिताती ।। ४५ ।। गळा वैजयंतीमाळा । भक्त भेटीलागी उताविळा । त्यासी दिधले हेचि कळा । हाचि

अनुवाद करिताती ।। ४६ ।। मुगुट कुंडलाची शोभा । भक्त हृदयी ज्ञानप्रभा । त्यांच्या सन्निध मी उभा । हेचि सुचवितसे की ।। ४७ ।। ऐसा योगेश्वर श्रीहरी । रंगनाथ अवलोकी हृदयांतरी । तेचि मूर्ती सामोरी । देखोनी करी दंडवत ।। ४८ ।। वारंवार प्रदक्षिणा । करुनी विनवी नारायणा । काय कारण दक्षिण भुवना । मजलागी पाठविता ।। ४९ ।। मी न सोडी तुमच्या चरणा । हेचि देई नारायणा । उपेक्षु नको मज दीना । लक्ष्मीरमणा गोविंदा ।।५०।। ऐकूनि ऐशी स्तुती । देव बोले रंगनाथाप्रती । तुम्ही पंचअवतारी निश्चिती । भूवरती अवतरले ।। ५१ ।। अधर्म वाढला अपार । लोक विसरले आपपर । गोब्राह्मण छळ अनिवार । होऊं लागला असे ।। ५२ ।। ब्रह्म कर्म नष्ट झाले । परधर्मी उन्मत्त झाले । पातिव्रत्य नच राहिले । भ्रष्टाकार सर्वही ।। ५३ ।। मातापिता गुरु यांचा । उपमर्द करी सर्वांचा । धर्म बाह्य वर्तनाचा । स्वीकार सर्व करिताती ।। ५४ ।। म्लेंछ वाढले बहुत । शास्त्री पंडितासी छळित । देऊळे उध्वस्त करीत । हाहाःकार झालासे ।। ५५ ।। या लागी जाण । पांचहीजण मिळोन । सन्मार्गी लावावे सकळ जन । धर्म संस्थापना करावी ।। ५६ ।।

रंगनाथ रामदास । आनंदमूर्ती केशवदास । जयराम स्वामी परेश । पंचरुपे ही माझी ॥५७॥ अवतार उमाकांत । शिवाजी जाण विख्यात । रंगनाथा त्वरित । जावे तुवा येथोन ॥ ५८ ॥ जगी उद्धार करावा । लोका बोध सांगावा । राजयोग बरवा । स्वीकारी रंगनाथा ॥ ५९ ॥ शिवाजीस करावी मदत । रामदास गुरु समर्थ । धर्माची लावावी शिस्त । जेणे होय सुगम तो ॥ ६० ॥ याची कारणे जाण । तुम्हा अवताराचे प्रयोजन । संकटी रक्षावे सकलजन । भक्तिमहात्म्य वाढवावे ॥ ६१ ॥ ऐसे वदुनि नारायण । तात्काळ स्वकरे कुरवाळून । बोलतसे रंगनाथा झाले अंतर्धान । रंगनाथवचन परिसोन । उल्हासीत जाहलासे ॥ ६२ ॥ आज्ञा वंदुनी तये वेळी । निघाली रंगनाथ माऊली । टेहरी राजाचे नगरा आली । तयाने केला सन्मान ॥ ६३ ॥ स्वागत केले थाटाने । शोडषोपचार विधीने । अर्पिली वस्त्रे भूषणे । आनंद बहुत जाहला ॥ ६४ ॥ नीलवर्ण घोडा दिधला । जरतारी पोषाख आणिला । गळा घाली सुवर्णमाळा । शस्त्रास्त्रे दिधली ॥ ६५ ॥ साष्टांगे करी नमस्कार । उभा राहिला जोडोनि कर । तयाचा करुनि उद्धार । निघाले सत्वर रंगमूर्ती ॥ ६६ ॥ राजयोग तेथोनि । स्वीकार केला स्वामींनी । घोडा ठेविला वाहनी । शस्त्रास्त्रे समवेत ॥ ६७ ॥ तेथोनि निघाली गुरुमाऊली । दक्षिण पंथे चालिली । पंढरीसी भीमा पाहिली । आगमन राऊळात ॥ ६८ ॥ देखोनि पंढरी क्षेत्रास । आनंद जाहला चित्तास । वंदुनि पंढरीनाथास । भक्तिभावे प्रार्थितसे ॥ ६९ ॥ ते दिनी एकादशी । यात्रा आली वेशीसी । बोपाजीपंत वारिसी । आले होते जाण पां ॥ ७० ॥ महासाध्वी पतिव्रता । समागमे कांता । दर्शना आले पंढरीनाथा । नित्य नियमाप्रमाणे ॥ ७१ ॥ रंगमूर्ती राऊळात । कीर्तन करिती आनंदात । पत्नीसह बोपाजीपंत । कीर्तन श्रवणा पातले ॥ ७२ ॥ कीर्तन करिती रंगनाथ । रंगी रंगला अनंत । सर्वजना आनंद होत । तया कीर्तनी ॥ ७३ ॥ अस्खलीत अमृत वाणी । श्रोते तल्लीन झाले कीर्तनी । देहभान गेले विसरोनी । कीर्तन महिमा अलौकिक ॥ ७४ ॥ बयाबाई म्हणे मनात । हा माझा रंगनाथ । होय ऐसे मज वाटत । बोले आरंभी तयासी ॥ ७५ ॥ तुम्ही कोठील कोण । परिसोनि करी इच्छा पूर्ण । शंका असे मम जाण । निवेदन करा सत्वरी ॥७६॥ येरी माता ओळखुन । साष्टांगे करी नमन । म्हणे रंगनाथ तव पदी लीन ।

मातोश्री तव बाळक ।। ७७ ।। हृदयी धरिली मूर्ती । आनंद झालासे चित्ती । पतीस म्हणे सती । रंगोबा माझा भेटला ।। ७७ ।। अकिंचनासी धन ठेवा । मिळता आनंद होय बरवा । की क्षुधितासी मिष्टान्न मेवा । तैशा परि झाले ।।७९।। वांझेसी झाले पुत्ररत्न । अंधाशी आले नयन । बधिरासी श्रवण जाण । तैशा परी जाहले ।। ८० ।। हरवलेली वस्तू मिळाली । मुमुक्षुसी मोक्ष प्राप्ती व्हावी । दैवयोगे संपत्ती मिळावी । तैशापरी जाहले ।। ८१ ।। हृदयी धरिला कवटाळुनी । नेत्री बाष्प आले दाटुनी ।। चुंबन घेई फिरफिरुनी । आनंद गगनी न समाये ।। ८२ ।। जैशी भरत–राम भेट । त्याहुनिविशेष प्रेम अलोट । मातृ-प्रेम निष्कपट । काय थोरवी वर्णावी ।। ८३ ।। कौसल्या भेटे रामासी । कीं अशोक वनी भेट सीतेसि । वायुनंदने अति हर्षेसी । त्याहुन अति आनंद ।।८४।। पंढरीनाथा करी नमन । मनोरथ झाले पूर्ण । सद्गुरुराये कृपा करून । धन्य केले आजि मज ।। ८५ ।। ब्राह्मण भोजन दिधले । याचक जन तोषविले । पंढरीहून निघाले । नाझरे ग्रामासी झडकरी ।। ८६ ।। नगर लोका आनंद । पाहो येती ब्रह्मवृंद । महायोगी रंगसिद्ध । सर्वा भेटी दिधली ।। ८७ ।। गृही

राहिले रंगनाथ । मातोश्रीस ज्ञान कथित । शिष्य संप्रदाय बहुत । ज्ञान मार्गी लाविले ।। ८८ ।। जैसे श्री गुरुनी कथिले । तैसे फळासी आले । द्वादश वर्षानी भेटले । पुत्ररत्न निश्चये ।। ८९ ।। आनंद जाहला सर्वासी । बापूजी हर्षले मनासी । आठवी श्रीहरी लीलेसी । धन्य भाग्य माझे हे ।। ९० ।। आनंदी आनंद जाहला । न वर्णवे पामराला । सद्गुरुराया भेटला । धन्य गुरु महिमा तो ।। ९१ ।। रंगनाथ स्वामीगुरुमूर्ती । स्वयंप्रकाश आत्मज्योती । स्वये ग्रंथ वदविती । इच्छा मात्रे करुनियां ।। ९२ ।। कर्ता हरी रंगनाथ । दास मी निमित्त मात्र । लीलावतारी महाराज समर्थ । चरणी वंदन तयाच्या ।। ९३ ।। स्वस्तिश्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंग कृष्णदास कृत । अष्टमोध्याय गोड हा ।। ९४ ।।

।। श्री सद्गुरुराजार्पण मस्तु ।।

।। इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ अष्टमोध्यायः समाप्तः ।।

# ॥ अध्याय ९ वा ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

नमन माझे गुरुपायी । पांडुरंगा हेचि देई । गुरु स्तवन चिन्मयी । सर्वाभूती करीन मी ॥ १ ॥ सद्गुरुनाथा तव पदाजी । अखंड घालीन मी रुंजी । नामामृत तव पाजी । श्रीगुरु रंगराया ॥ २ ॥ रंगी रंग वाढला । जिकडे पाहे तिकडे भरला । सर्वाभूती पसरला । श्रीरंग बाप मत्य ॥३॥ काय बोलो गुरराया । उपकार तुझा दीनास या । जन्मोजन्मी तव पाया । मी न विसरे ॥ ४ ॥

माझे मनी रंग । प्रगट झाला सांग । तुटला भवभंग । अक्षयी रंग रंगला ॥ ५ ॥ मी अक्षयीच सर्वात्मक । परी देह लोभे देख । भ्रांति पडदा घातक । भ्रमविले जाण पा ॥ ६ ॥ तव कृपा होताचि गुरुवर्या । माया भ्रम जातसे विलया । आत्मस्वरुप लवलाह्या । दृष्टीगोचर होतसे ॥ ७ ॥ काष्टामाजी अग्नी गुप्त । मंथणेविण होय न प्राप्त । मंथन केलिया त्वरित । अग्नी प्रज्वळीत झालीया । काष्ट कोण पूर्वस्थिती अग्निरूप ॥ ८ ॥ म्हणे तया । काष्ठरुप जाई विलया । येणेपरीच हे असे ॥ ९ ॥ आत्माराम हा स्वयंसिद्ध जाण । परी देह ममतेचे अज्ञान । हृदयी बसला गुप्त होऊन । पिशापरी झालो मी ॥१०॥ भक्तिभावे येता तुज शरण । कृपे करिसी मंथन । देह ममता विसरून । निजात्म खूण दाविसी ॥ ११ ॥ ऐसे तूं कृपेची साऊली । स्वानंद सुखाची साऊली । चरणी सेवा ही वाहिली । न लगे या वीण दुजे मग ॥ १२ ॥ तुझे चरणरजाचा महिमा । न वर्णवे अगमा-निगमा । दीननाथा, कल्पद्रुमा । हेचि इच्छा पुरवावी ॥ १३ ॥ असो गताध्यायी जाण । रंगमूर्तीस मातापिता दर्शन । राऊळा भीतरी होऊन । जाते झाले स्वगृहा ॥ १४ ॥

नाझरे ग्रामी रंगमाऊली । महा प्रेमे असे राहिली । नरनारी आनंदली । माता पिता ही समस्त । १५ ।। कथा कीर्तन भजन । अखंड श्रीहरी नामस्मरण । या वीण न दुजे कर्म जाण । स्वप्नीही नसे कदापी ।। १६ ।। क्रमुनी गेले कांही दिन । वयपरत्वे मातापिता जाण । गेली अशक्त होऊनि । एके दिनी वियोग जाहला ।। १७ ।। वृद्धपणी पुत्र सान्निध्यांत । प्रभु नाम सतत ध्यात । अध्यात्म ज्ञानी पूर्ण बोध । पुत्र मुखे निष्णात झाली ते ।।१८।। धन्य धन्य ती माऊली । विष्णुरुप पुत्र प्रसवली । स्वकुळ गोत्र उद्धरली । गुरुकृपे करुनिया ।। १९ ।। बयाबाईचा वियोग होता । बोपाजीस बाणली विरक्ता । संसारपाश वाटे वृथा । त्यागावा वाटतसे ।। २० ।। आत्मानुभव मुखे ती । वारंवार अध्यात्मचर्चणी । भवोदधी उल्लंघणी । रंगनाथ पुसतसे ।। २१ ।। जो जो व्याप करावा विशेष । तो तो वाटे हव्यास । शांतीचा न मिळे लेश । क्लेश बहुत होतसे ।। २२ ।। प्रपंच मायेचे भांडार । दुःखानळी पडती अपार । देह ममता अनावर । न सुटे कदाचि ।। २३ ।। या लागी त्यास त्यागावे । आत्मरुपी तल्लीन व्हावे । सोपा मार्ग कथावे । रंगनाथा झडकरी ।। २४ ।। जेणे होईन मी मुक्त । तुटेल



भवबंध द्वंद्वातीत । आत्मबोध लाधे सतत । उपाय यासी सांगावा ।। २५ ।। बोपाजीस वैराग्य पूर्ण । बाणले पूर्वपुण्ये करून । सत्संगती जाण । पुत्र मिषे करुनिया ।। २६ ।। म्हणे रंगनाथ पुत्रासी । मज धाडी मोक्षपदासी । संन्यास मार्ग निश्चयेसी । दाखवी ज्ञान सागरा ।। २७ ।। ऐकोनि पित्याचे वचन । संतोषली रंगमूर्ती जाण । अवश्य म्हणे तत्क्षण । श्रीगुरु हेत पुरवील ।।२८।। समागमे घेऊनि पित्यासी । आले वेगी कल्याणासी । वंदोनि गुरुचरणासी । संन्यास दीक्षा मागतसे ।।२९।। तयाची भक्ती पाहून । आनंदले श्रीगुरु जाण । *सुलभ मार्ग पुण्यपावन । मोक्षप्राप्ती सत्वरी ।। ३० ।। तुम्हासी हेचि उचित ।* गृहस्थाश्रमासी संन्यासव्रत । प्रपंच साधुनि परमार्थ । सहजगत्या घडतसे ।। ३१ ।। षड्रिपुचे करावे आकलन । निजानंदी लय लावुन । अखंड प्रभू नामःस्मरण । चित्त शुद्धि होय पां ।। ३२ ।। श्रीगुरुनी त्या समयासी । दीक्षा दिली बोपाजीसी । वरदहस्त मस्तकासी । ठेऊनि स्वरुपी मिळविले ।। ३३ ।। धन्य धन्य गुरु पूर्णानंद । नामाप्रमाणे पूर्ण आनंद । अक्षयी आत्मानंदी मन लुब्ध । सर्वकाळ जयाचे ।।३४।। नाम ठेविले निजानंद । निजरुपी आनंद । आत्मानुभवी

निर्द्वंद्व । भजनमार्गी निज निष्ठा ॥ ३५ ॥ द्वैत ते अद्वैत झाले । सर्वात्मकपण उदेले । आत्मरुपी मन निवाले । विरोनि गेला त्यातची ॥ ३६ ॥ गुरुकृपा ऐसी आहे । आपणासम करी लवलाहे । विसरोनि सर्व कार्ये । कांही उरो नेदीच ॥ ३७ ॥ सद्‌गुरु कृपेचा अगाध महिमा । त्यासी नसे अन्य उपमा । जे गुरुकृपे आरामा । तेच सर्व जाणती ॥ ३८ ॥ धन्य ते गुरु भक्त । त्याचे जीवित कृतार्थ । गुरुकृपेने सर्व प्राप्त । झाले असे तयासी ॥ ३९ ॥ येणेपरी बोपाजीस । सद्‌गुरु रुपे सुग्रास । श्रीहरी नाम सुरस । आत्मानंदी चाखीतसे ॥४०॥ निजानंद निज आनंदास । पावता जाहला अहर्निश देही असोनि विदेह त्यास । गुरुकृपे साध्य झाले ॥ ४१ ॥ असो पूर्णानंद गुरु ज्ञानी । रंगनाथासी बोले प्रेमे करूनी । इच्छा एक मम मनीं । आली असे जाण पा ॥ ४२ ॥ सुदिन सुमंगल सुमुहूर्त । आजी अनायासे प्राप्त निजानंदाचा उपदेश त्वरित । घेई झडकरी रंगवर्या ॥ ४३ ॥ आज्ञा होताचि या परी । रंगमूर्ती ते अवसरी । निजानंदाचा उपदेश सत्वरी । घेतला असे ॥ ४४ ॥ तेथे कांहीं काळवरी । राहिले कल्याणनगरी । तेथोन निघाले पश्चिम तीरी । गुरु आज्ञा घेऊनिया

॥ ४५ ॥ मार्ग क्रमीत चालले । कृष्णातीरी पातले । सुस्थळ देखोनि ते वेळे । वस्तीस राहिले तेथेचि ॥ ४६ ॥ निजानंद प्रेमेसी । संवाद करी रंगमूर्तीसी । म्हणे अविनाश पदासी । जाणे असे सत्वर ॥४७॥ कृष्णातीर पुण्यपूर्ण पावन । कृष्णा कुमुदमती संगम जाण । देह करू विसर्जन । समाधिस्थ होणे मज आहे ॥४८॥ ऐकोनिया पितृवचन । वियोग मोह क्षणिक जाण । तात्काळ त्यागिला निरसून । समाधिस्थ निजानंद यती ॥ ४९ ॥ पुढे स्वामी रंगमूर्ती । निरोप घेऊनि कृष्णे प्रती । जाते झाले पुढती । पंढरी क्षेत्रा पावले ॥ ५० ॥ तेथोनि नाझरेस येती । समस्तांची भेटी घेती । आठवूनि निजानंद मूर्ती । राहती सदा ध्यानस्थ ॥ ५१ ॥ अबाल वृद्ध नारीनर । भजनी रमले तत्पर । कीर्ती झाली दूरवर । येती समग्र दर्शना ॥ ५२ ॥ तये काळी नृप शिवाजी जाण । जो कां अवतार उमारमण । करीतसे धर्म संस्थापन । गोब्राह्मण पालन करीतसे ॥५३॥ रामदास गुरु महासमर्थ । तयाचे विचारे राज्य चालवीत । जो कां महावतारी विरक्त । शिष्य तयाचा तो असे ॥५४॥ राजा शिवाजी राज्य करी । सातारी राही निर्धारी । स्वामी कीर्ती बरी । जनोपकर्णी ऐकिली ॥ ५५ ॥ तयासी

बोले रामदास । रंगोबानी सातान्यास । भेटीची झाली बहुत आस । महासत्पुरुष असे तो ॥ ५६ ॥ आज्ञा वंदुनी श्रीगुरुसी । आनंद झाला शिवाजीसी । मूळ पाठविले वेगेसी । रंगमूर्तीस तेधवां ॥ ५७ ॥ राजाज्ञा होताची सेवक गण । रंगमूर्तीसी भेटती येऊन । पत्रिका दिधली नेऊन । स्वामिनी पाचारिले ॥५८॥ पत्रिका पाहोनि राजाची । तयारी केली निघणेची । घोडा सज्जुनी वेगेसी । निर्गुणपुरी पातले ॥ ५९ ॥ तेथे एक प्रचंड शीळा । लागली अश्व पावलाला । तो घोडा उभा राहिला । रंगमूर्ती पाहती ॥ ६० ॥ तया शिळेवरती । अश्वखूर रुतले निश्चिती । म्हणे वरदान व्यासोक्ति । येथेचि आता रहावे ॥ ६१ ॥ श्रीव्यासे आज्ञापिले । जया स्थानी अश्व पाऊले । रुततील ते स्थान वहिले । वास्तव्य तेथे करावे ॥ ६२ ॥ हेचि स्थान उत्तम । हे व्यास आज्ञेने परम । म्हणोनि केला मुक्काम । तया निर्गुण क्षेत्रासी ॥६३॥ निरोप धाडिला शिवाजीसी । राहणे आम्हा या स्थळासी । तुमचेकडे आम्हा यावयासी । आज्ञा नसे प्रभूची ॥ ६४ ॥ या स्थानी मठ उत्तम । बांधोनि देई राजोत्तम । हीच आज्ञा असे मम । आणिक न लगे कांहींच ॥६५॥ स्वामी आज्ञा वंदोनि । शिवाजी उल्हसित मनीं । आला त्वरित धावोनी । साष्टांगे करी नमनासी ॥ ६६ ॥ स्वामी इच्छेनुरूप । मठारंभासी करी नृप । द्रव्य वेचुनि अमूप । शीघ्र तडिसी नेलासे ॥ ६७ ॥ मठ तयार करून । नमस्कारी स्वामी लागुन । आज्ञा द्यावी कृपा करून । सातान्यासी जावया ॥६८॥ स्वामी कृपाळू होऊन । निरोप दिधला तया लागून । येरी चरण वंदून । निघालेसे स्वस्थाना ॥ ६९ ॥ जयजयकार करून । शिवाजी निघे तेथुन । सातान्यास येऊनी । रंगलीला वर्णंती ॥ ७० ॥ स्वस्तिश्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदासकृत । नवमोध्याय गोड हा ॥ ७१ ॥

॥ श्रीसद्गुरु निजानंद रंगनाथ महाराजार्पणमस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ नवमोध्यायः समाप्तः ॥

## ॥ अध्याय १० वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

॥ ॐ नमोजी श्रीरंगा । विश्वव्यापका भवभंगा । लीलावतारी गुणरंगा । अगाध महिमा तुझा असे ॥ १ ॥ श्रीरंगराया गुरुमूर्ती । नमन तुम्हा द्यावी स्फूर्ती । ग्रंथ वदण्याची युक्ति । तुमचे नि प्रसादे ॥ २ ॥ प्रसाद इहलोकी श्रेष्ठ । अक्षय दावी वैकुंठ । भजनभक्ती एकनिष्ठ । गुरुराया दाविली ॥ ३ ॥ जगदोद्धार करावया । अवतरला तुम्ही गुरुराया । अज्ञान तम निरसाया । कृपावलोकनें करूनिया ॥ ४ ॥ पंचायतन अवतार । कलियुगी अवतरले सत्वर । रामदास रंगनाथ गुरुवर । जयरामस्वामी तृतीय केशवस्वामी आनंद मूर्ती ॥ ५ ॥ पांच अवतार भूवरती । अवतरले निश्चिती । दर्शनें त्रिविध ताप हरती । मोक्ष सुखप्राप्ती तत्काळी ॥ ६ ॥ जे कां पंचप्राण । तैसे हे महायोगी जाण । भक्तिमहात्म्य वाढवून । सन्मार्गासी लाविती ॥ ७ ॥ महाविष्णूचे अवतार । उतरुन नेती पैलपार । सायुज्यपदी मुक्तद्वार । मनकामना सिद्ध होय ॥ ८ ॥ किंचित काळ सहवास घडे । निरसी भवाचे सांकडे । जन्ममरण द्वंद्व पुढे । जाती लयासी तत्काळी ॥ ९ ॥ वंदन पंच सद्‌गुरुरायासी । अति आदरे साष्टांगेसी । मती द्यावी ग्रंथ वदण्यासी । हेचि मागणे दातारा ॥ १० ॥ असो गताध्यायी निरूपण । शिवाजी राजा मठ बांधून । सातान्यास आला परतून । राज्य कारभार चालवीतसे ॥ ११ ॥ राजा शिवाजी सातान्यात । राज्य करी आनंदयुक्त । वाटे मनी निश्चित । भेटी घ्यावी स्वामीची ॥ १२ ॥ कांहीं काळ गेलीयावरी । स्वामी निघाले सत्वरी । त्वरे जाती सातारनगरी । शिवाजी भेटी कारणें ॥ १३ ॥ वारुवरी होऊनि स्वार । आयुधे घेतली समग्र ।

तीर कामठा दिसे मनोरम । राजयोगी महाराजा ।।१४।। नगरात कळली मात । रंगनाथ आले अवचित । भेटी घेती जन समस्त । अत्यानंदे करुनिया ।। १५ ।। वर्तमान कळले शिवाजीसी । रंगनाथ आले भेटीसी । सामोरे जाऊन भावेसी । लोटांगण घालितसे ।। १६ ।। जोडोनिया दोन्ही कर । उभा राहिला समोर । कृपा केली दासावर । पुनीत झालो आजि खरा ।। १७ ।। मम भाग्य उदया आले । आजि स्वामी चरण देखिले । मम नगरी पुनीत केले । स्वामी आगमने करुनिया ।। १८ ।। म्हणूनि घातले लोटांगण । मस्तकी दृढ धरिले चरण । स्वामी कृपाळू होऊन । अभयदान दिधले ।। १९ ।। आश्वासोनि शिवाजीसी । उठविती निज करेसी । क्षेमकुशल तयासी । पुसतसे महाराज ।। २० ।। तव तये वेळी अकस्मात । आले रामदास समर्थ । भेटोन शिवाजीस त्वरित । क्षेमालिंगन दिधले ।।२१।। रंगनाथ स्वामी आगमन । कळविता झाला राजा जाण । रामदास मनी हर्षून । काय तया वदतसे ।। २२ ।। आज सुदिन एकादशी । हरिजागर रात्रीसी । रामदास म्हणे रायासी । आनंदे करावा ।। २३ ।। राजयोगी रंगनाथ । अनायासे आले येथ । आनंद न माये त्रिभुवनात । भेटी

घेणे इच्छा ही ।।२४।। राजा बोले जोडोनी हस्त । ऐसे जनी बोलती समस्त । परि अविचार कैसे तेथ । यासी काय करावे ।। २५ ।। आज्ञा तव प्रमाण । सेवा करणे कर्तव्य जाण । परि अनुचित दिसे वर्तन । दयानिधी गुरुराया ।। २६ ।। तव आज्ञे गुरुराया । स्वधर्म स्थापिला सदया । परि अविधिकृत्या । रंगोबा करितसे ।। २७ ।। रायाचे मनी कल्पना । समर्थ विचारी मना । म्हणे भ्रष्टला रंग राणा । यासी काय करावे ।। २८ ।। तीर्थप्रसादासी । उदईक आणा तयासी । राजा म्हणे आमंत्रणेसी । आजीच दिधले असे कीं ।। २९ ।। म्हणती निरोप धाडी ये क्षणी । राहिले आमंत्रणी त्यानी । समर्थ आज्ञा तुम्हा लागुनि । नसावे भोजना ऐसी असे ।। ३० ।। अवश्य म्हणे ते वेळा । दूत एक पाचारिला । निरोप सांगा रंगरायाला । समर्थाचा असे ।। ३१ ।। तुम्हासी जे आमंत्रण दिधले । रहित ते असे जाहले । समर्थ चित्ता नये भले । ऐसे कळवी तयासी ।। ३२ ।। दूत गेला त्वरित । जेथे उतरले रंगनाथ । साष्टांगे करुनि प्रणिपात ।। वदता झाला निरोप ।। ३३ ।। दूत मुखी वार्ता । ऐकोनि संतोष रंगनाथा । म्हणे द्वादशीस आता । काय पाक करावे ।। ३४ ।। रात्र जाहली

दीड प्रहर । पर्जन्य लागला फार । शिष्य बोलावुनि सत्वर । आज्ञा करी तयासी ।। ३५ ।। अपरात्र झाली असे जाण । पाक तो करणे आहे त्वरेने । द्वादशी साधने संपूर्ण । नियम साधेल ऐसे करावे ।। ३६ ।। श्रीदत्त नाम गर्जुन । मिळेल ते आणा धरुन । द्वादशीस पाक पूर्ण । त्याचा करणे आम्हासी ।।३७।। आज्ञा वंदुनी गुरुची । शिष्य उठले सर्वचि । चरण वंदुनी श्रीगुरुचे । हाटी धुंडो लागले ।। ३८ ।। सर्व हाटी धुंडोनि पाही । तव तेथे न मिळे कांही । रेडा एक बलाढ्य पाही । लक्ष्मी कारणे सोडिला ।। ३९ ।। रेड्यासी या देखोनि । शिष्य गेले हर्षुनी ।। म्हणती यासी जावे घेऊनि । स्वामी सन्निध लवकरी ।।४०।। ऐसा करुनिया विचार । रेडा धरिला सत्वर । मिळोनि सर्व शिष्यवर । रंगमुर्तीनजिक पातले ।।४१।। नमन करुनिया विनविती । फिरता हा मिळाला अवचिती । घेवोनि आलो चरणाप्रती । काय आज्ञा स्वामीची ।। ४२ ।। स्वामीसी हर्ष जाहला बहुत । म्हणती दत्त कृपा अद्भुत । सूर्योदयी पारणे निश्चित । होईल ऐसे करावे ।। ३२ ।। असिलता घेऊनीया करी । घाव घातला रेड्यावरी । मुक्त केला झडकरी । श्रीरंगराये तेधवा ।। ४४ ।। धन्य

महिषा जाण । सत्कार्यी वेचिला प्राण । उद्धार करुनिया गेला जाण । द्वंद्व निर्बंध तुटला ।। ४५ ।। तुकडे तुकडे केले तयाचे । अस्थिचर्म त्या रेड्याचे । पूर वाहती शोणिताचे । देखोनि दूत दचकला ।। ४६ ।। राजदूतासी आज्ञा करी । यासी हुंडी देई झडकरी । साहित्य आणि लवकरी । नाही तरी शिक्षा तुज करूं ।। ४७ ।। भयभीत झाला दूत । साहित्य आणोनिया देत । आज्ञा घेऊनिया त्वरित । राजवाड्यात प्रवेशे ।। ४८ ।। राजासन्निध पातला । दृश्य पाहोनी भेदरुनि गेला । शब्द न फुटे वाचेला । स्तब्ध राहिला मौनत्वे ।।४९।। राजा विचारी तयासी । काय झाले वर्तमानासी । येरी कळवी वृत्तांतासी । झाला तैसाचि वदतसे ।। ५० ।। महाराज अघटित झाले वर्तमान । लक्ष्मी बलाढ्य रेडा जाण । स्वामी सेवकांनी आणिला धरून । छिन्न विछिन्न केले तया ।। ५१ ।। आपला महिष मारिला । तयाच्या करीती पाकाला । उदईक द्वादशी भोजनाला । करिताती स्वामी राया ।। ५२ ।। माझे दैव बलवत्तर । तव कृपे वाचलो नृपवर । चरण सेवा निरंतर । घडो इच्छा मानसी ।। ५३ ।। ऐकुनिया दूत वार्ता । राजा करी मनी चिंता । समस्तासी कळविली

वार्ता । कैसे काय करावे ॥ ५४ ॥ हे तव अति अनुचित कर्म । ब्रह्मकर्मा अक्षम्य । रंगोबाचे अघोर कर्म । काय उपाय करावा ॥ ५५ ॥ आपण म्हणता राजयोगी । अनन्वित कर्म निंद्य जगी । साधु दिसती वरपांगी । बरवे चिन्ह नव्हे हे ॥५६॥ स्वधर्म तव कृपे स्थापिला । पहा अधर्म कैसा वाढविला । उपाय सांगा दयाळा । मज कांही सुचेना ॥ ५७ ॥ ऐकोनियां शिवाजी वचन । हासिन्नले समर्थजाण । देखोनि तयाचे अज्ञान । रंगचरित्र त्या न ठावे ॥ ५८ ॥ राजासी म्हणती समर्थ । चिंता न करी तूं व्यर्थ । उदयीक प्रायश्चित्त । देऊ रंगनाथा ॥ ५९ ॥ रंगनाथे केले दोषासी । प्रायश्चित्ते शुद्ध करुं त्यासी । पुनः या अघोर कर्मासी । कदापि ना करे तो ॥ ६० ॥ ऐकोनिया समर्थ वचना । हुरहुर वाटे शिवाजी मना । समर्थ देखोनिया शिवराणा । समाधान तयाचे केलेसे ॥ ६१ ॥ संतोषला शिवाजी मनी । हरिस्मरण आनंदानी । दासबोध श्रवणी । गुरुमुखे ऐकिला ॥ ६२ ॥ रात्र गुजरली या रीती । हरी जागर केला एकांती । गुरुशिष्य वचनोक्ति । आनंदाने झालीसे ॥ ६३ ॥ प्रातःकाल झाला पूर्ण । समर्थ करिती स्नान । पूजा विधि विसर्जून । सांगतसे नृपाते ॥६४॥

ब्राह्मण भोजन करी । द्वादशी साधावी बरी । रंगनाथ भेटी लवकरी । घेणे असे मजलागी ॥ ६५ ॥ ऐकोनिया सद्गुरु वचना । ब्राह्मण बैसविले भोजना । तृप्त करुनिया विप्रगणा । आबालवृद्धासहित ॥ ६६ ॥ विडा दक्षिणा देऊनि । भूधर तोषविले ते क्षणी । मंत्राक्षता घेऊनि । गुरु सन्निध पातले ॥ ६७ ॥ नमन करुनि समर्थासी । म्हणती उठा वेगी भोजनासी । समर्थ म्हणती शिवाजीसी । प्रसादासी चलावे ॥ ६८ ॥ समर्थ म्हणती महाप्रसाद । त्वरे करुनिया सिद्ध । बोलावितो रंगप्रबुद्ध । चाल वेगी शिवाजी ॥ ६९ ॥ रंगोबाचे अघोर कृत्य । दूते सांगितले समस्त । श्रीगुरु रामदास समर्थ । त्यानाही निवेदन केले असे ॥ ७० ॥ ऐशा अनुचित कर्मासी । समर्थ म्हणती चला प्रसादासी । गुरु आज्ञा नुलंघवे जसी । होणार ते होवो आता ॥७१॥ राजा मनी विचार करित । काय शिक्षा करतील समर्थ । चला म्हणोनि त्वरित । महाद्वारी पातले ॥ ७२ ॥ इकडे ध्यान विसर्जुनि । स्वामी म्हणती शिष्या लागुनि । समर्थ येती भोजनी । आसन घाला तयासी ॥ ७३ ॥ उठोनियां रंगमूर्ती । रामदासासी आलिंगिती । प्रेमे बोलो आरंभी ती । उभया तये ठायी ॥ ७४ ॥

परस्पर गुरुवर्य समर्थ । महाज्ञानी वैराग्ययुक्त । सदा आत्मानंदीरत । सोहळा काय वर्णावा ॥ ७५ ॥ जैसे कां हरिहर । प्रेमे भेटती परस्पर । की भरत आणि रघुवीर । त्याहुनि अधिक प्रेम त्यांचे ॥ ७६ ॥ निजात्मनंदाच्या खुणा । परस्पराते ठाव्या जाणा । अखंड हरिनाम गर्जना । दीन रक्षणा आवडी मोठी ॥ ७७ ॥ रंगनाथ म्हणती प्रसादासी । आणिले कासया शिवाजीसी । भ्रष्ट करिता तयासी । महाराजा समर्था ॥ ७८ ॥ आम्ही अनन्वित दुराचारी । भ्रष्ट झालो सर्व परी । राजा धर्म संस्थापना करी । तयासी अनुचित हे असे ॥ ७९ ॥ असो समर्थ बैसले भोजना । पात्री वाढिले पक्वान्ना । पांच पत्रावळी तया स्थाना । पंचायतना वाढिल्या ॥ ८० ॥ शिवाजी विचार करी मनी । सद्गुरु समर्थ भोजनी । प्रसाद घ्यावा प्रेमानी । गुरुच्छिष्ठ म्हणूनिया ॥ ८१ ॥ भोजना बैसले सकळ । स्वादिष्ट अन्न परिमळ । तेचिया प्रसाद केवळ । भाग्यवंता प्राप्त होय ॥ ८२ ॥ जरी केले असेल तप । कर्वतिले शिर अमूप । पुर्णाहुति घातले देख । यज्ञकुंडा माझारी ॥ ८३ । परि तयासि जे दुर्मिळ । गुरुकृपेचे जया बळ । तयासी हे मिळे मूळ । इतरा दुर्लभ असे की ॥ ८४ ॥

जयावरी कृपा होय गुरुची । पूर्ण होय इच्छा मनोची । काय वर्णावी थोरवी त्याची । जगामाजी वंद्य तो ॥ ८५ ॥ ऐसा तो प्रसाद अमोल । गुरुकृपेनेच केवळ । शिवाजीस लाभला तये वेळ । धन्य भाग्य तयाचे ॥ ५६ ॥ भोजन झाले समस्ताचे । शिवाजी बोले वाचे । पैल दिसती अनिर्वाच्य । चर्म अस्थी रेड्याच्या ॥८७॥ अद्यापि शिवाजीसी । शंकाअसे मानसी । रंगोबाचे अनुचित कर्मासी । संदेह त्यासी आला असे ॥ ८८ ॥ सांगा स्वामी आम्हाला । अन्योन्य कर्माला । दोष तो असे घडला । आता काय करावे ॥ ८९ ॥ देखोनि राजाचा संदेह । हांसो आले उभयास । त्याचा निरसावया संदेह । म्हणुनी समर्थ वदताती ॥ ९० ॥ समर्थ म्हणती रंगोबासी । रेडा पाठवी स्थानासी । सोडिली अजि द्वादशी । तया कासया ठेविले ॥ ९१ ॥ ऐकोनि समर्थाची वाणी । दत्त नामस्मरण करुनि । निजानंदे गर्जोनी । तीर्थ सिंचिले तयावरी ॥ ९२ ॥ तो अद्भुत झाली नवल कथा । सावध परिसिजे श्रोता । करुनिया एकाग्रता । सद्गुरु महिमा अघटित ॥ ९३ ॥ तीर्थ सिंचन करिताची जाण । रेडा बैसला उठोन । पूर्वीपेक्षा जवान । दिसो लागला सर्वांना ॥ ९४ ॥ आश्चर्य करिती

जनसर्व । रेडा केलासे सजीव । म्हणती सत्पुरुषा अभिनव । त्याची लीला कळेना ॥ ९५ ॥ महिष तो ही असे पुण्यवान । किंचित काळ संत समागम । झाला तयासी असे जाण । भाग्यवान तो एक ॥ ९६ ॥ सत्पुरुषाची अलौकिक स्थिती । देवाहुनि श्रेष्ठ पर ती । इच्छा मात्र वर्तती । महाराजा समर्था ॥९७॥ देखोनिया चमत्कार । शिवाजीस मनी झाला खेद फार । म्हणती याचे सामर्थ्य अपार सर्वाहुनि अधिकची ॥ ९८ ॥ धन्य धन्य हे संत । हरीहर जयासी अंकित । पराक्रमी अति अद्‌भुत । काय वर्णू यश त्यांचे ॥ ९९ ॥ यांचे दर्शन होताचि अवचित । प्राणी होय जीवन्मुक्त । हरिती त्रिविधताप समस्त । ऐसे महात्म्य संताचे ॥ १०० ॥ हास्य मुखी रामदास । बोलतसे शिवाजीस । भ्रष्ट म्हणसी रंगनाथास । अधिकार ऐसा तयाचा ॥ १०१ ॥ जे ब्रह्मानंदी रंगोनि । तयासी भ्रष्ट न म्हणावे कोणी । सर्व क्रिया ब्रह्मार्पणी । असती तयांच्या ॥ १०२ ॥ जाणोनी शिवाजी मनी । प्रेम भावे लोटांगणी । हस्त जोडोनितये क्षणी । वंदन करी गुरुराया ॥ १०३ ॥ महापुरुषा रंगनाथा । व्यर्थ छळिले तुम्हा समर्था । क्षमा करी अपराध आता । दीनानाथा स्वामीया ॥ १०४ ॥ अजाणते

पणे जाण । अन्याय घडला मजकडून । स्वामी कृपा करावी पूर्ण । शरण मी दास हा ॥ १०५ ॥ पुत्राचे सहस्त्र अपराध । माता घेई उदरात । तैसे स्वामी कृपावन्त । अव्हेर न करी दासाचा ॥ १०६ ॥ म्हणोनि लागला चरणा । वारंवार करी प्रार्थना । दीनानाथा करुणाधना । अपराध पोटी घाली माझा आश्वासुनि रायाते । उठवी करी रंगनाथ । ठेवोनिया वरदहस्त । निववि‌ले तयासी ॥ १०८ ॥ शोडषोपचारे केली पूजा । आनंदे राहविले रंगराजा । समर्थासहित शिवाजीराजा । अध्यात्मिक चर्चा करितसे ॥ १०९ ॥ निरोप मागोनि समर्थासी । स्वामी येती निगडीसी । पुढे कथा वर्तली कैवी । श्रोते जनी परिसावी ॥११०॥ स्वस्तिश्रीलीलामृतग्रंथ । दशमोध्याय गोड हा ॥१११॥

॥ श्रीसद्‌गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पण मस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरु रंगनाथार्पण मस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ दशमोध्यायः समाप्तः ॥

# ॥ अध्याय ११ वा ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ जय जयाजी सद्‌गुरु समर्था । आदि अनादि विश्वंभरता । जगदोद्धारणा माया हरता । नमन तुजला साष्टांगे ॥ १ ॥ तुझी कृपा होताचि जाण । त्रिविध तापा होय बोळवण । सर्वही व्याधी निरसुन । जाताती जाणपा ॥ २ ॥ तुझा वरदहस्त मस्तकी पडे । भवरोग समूळची उडे । नित्य मोक्ष द्वार उघडे । तव कृपे गुरुराया ॥ ३ ॥ अज्ञान तम जाय निरसून । ज्ञान सूर्य प्रकाशमान । भ्रांती पडदा जाय तुटोन । एक कृपा तुझी होता ॥ ४ ॥ स्वानंद सुखाची नवलाई । इच्छा मात्रे दाविलि पाही । ऐसी चतुराई । अगा सद्‌गुराया ॥ ५ ॥ ऐसा तूं कैवल्यरूप । निजानंदी चित्स्वरूप । न वर्णवे तुझा प्रताप । नमन तुजला सद्‌भावे ॥ ६ ॥ प्रेरणकला अलौकिक । काय वर्णावि ते कौतुक । निमित्त मात्रे दास देख । लेखन कला करविसि ॥ ७ ॥ मागील अध्यायी कथा सुरस । चमत्कार दाविला शिवाजीस । स्वामी आले निगडीस । पुढे कौतुक अवधारा ॥ ८ ॥ मोरया स्वामी चिंचवड ग्रामी । गाणपत्य आराधना प्रेमी । गुरु भजनी सप्रेमी । निरंतर करितसे ॥ ९ ॥ मुख्य दैवत श्रीगणपती । अहर्निश त्यास भजती । तयाचि देखोनिया भक्ति । प्रेमे संवाद करितसे ॥१०॥ नित्य घाली मंगल स्नान । शोडषोपचारे पूजन । नित्य स्वकरी भोजन । गजाननासी घालितसे ॥ ११ ॥ नित्य करीतसे भाषण । गणपती ठायी निष्ठा पूर्ण । परि वाढला अहंकार पूर्ण । मीच श्रेष्ठ म्हणूनिया ॥ १२ ॥ अहंकार जाणूनि तयाचा । गजानन बोलती वाचा । सत् शिष्य तूं आमुचा । परो नवल वाटते ॥ १३ ॥ भक्तराया ऐक वचन । सत्पुरुष पंचायतन । अवतरले जग–

ज्जीवन । ऐसी वार्ता ऐकतो ।। १४ ।। महाविष्णूचे अवतार । करावया जगदोद्धार । भक्तिमहात्म्य अपार । जगी वाढवितातो ।। १५ ।। तयासी भेटावे इच्छा जाण । झालीसे मज लागून । अवश्य भेटावे त्या लागुन । ऐसे मनी आलेसे ।। १६ ।। तूं तव मोठा सद्‌भक्त । तुझे तयासी दावी कौतुक । पाहोनिया तुज देख । संतोषतील जाण पा ।। १७ ।। आणि तयासी भोजना । हेचि आज्ञा तुज जाणा । पाहुनिया भक्तनयना । पावन होती तव दर्शनें ।। १८ ।। तव दर्शन त्यासी । दुर्लभ जाण तयासी । महोत्सव गजरेसी । तयासी तूं दाखवी ।।१९।। अवश्य म्हणोनि ते अवसरी । आज्ञा वंदुनिया शिरी । पत्रिका धाडिल्या निर्धारी । पंचायतनासी तेधवां ।। २० ।। रामदासा निज प्रेमे । आमंत्रण धाडिले नेमे । परिवारासह समागमे । भोजना अवश्य यावे ।। २१ ।। सद्‌गुरु श्रीगजवदन । भाद्रपदमासी उत्साहपूर्ण । तीर्थ प्रसादा कारण । पंचायतन या तुम्ही ।। २२ ।। आग्रहरुपे पत्रिका । गजाननाची मुद्रा देखा । पाहोनिया रामदास हारूखा । बरे बोले तयासी ।। २३ ।। येणे परी रंगनाथासी । जयराम केशव स्वामिसी । आनंद मूर्ती ब्रह्मनाळासी । प्रेमादरे धाडिल्या ।। २४ ।।



रंगनाथस्वामी निगडीसी । पत्रिका पोहोचली तयासी । अवश्य म्हणोनि त्या समयासी । येऊ म्हणती अवश्य ।। २५ ।। चतुर्थी भाद्रपद मासी । दोन प्रहर समयासी । पंचायतन निश्चयेसी । चिंचवडग्रामी पातले ।। २६ ।। आले ऐकोनि रामदास । प्रेमे भेटोनि मोरयास । तैसेच वंदून गजाननास । बैसले एके ठायी ।। २७ ।। परस्पर सर्व भेटले । क्षेमालिंगन दिधले । मोरया स्वामिसी भेटले । वंदिले श्रीगजानना ।। २८ ।। भोजनाची झाली तयारी । पात्राची सिद्धता सारी । म्हणती स्नानासी उठा झडकरी । मोरयास्वामी सर्वांना ।। २९ ।। स्नान करिती रामदास । रंगनाथ उठिले स्नानास । हे पाहुनि त्या समयास । समर्थ बोलती कौतुके ।। ३० ।। रंगनाथा तुझा थाट । वस्त्राभरणी अचाट । सुवर्णमुद्रिका माळा स्पष्ट । गळा कासया घालिसी ।। ३१ ।। पाहे मोरयाभक्त । वैकुंठनायक तो श्रेष्ठ । चौदा विद्या बलिष्ठ । वश झाल्या मोरयासी ।। ३२ ।। नित्य घेऊनिया पूजा । नैवेद्य भक्षि तो सहजा । धन्य भक्त सज्ञान राजा । मोरया स्वामी ।। ३३ ।। तयाचा भक्तिभाव जाणून । प्रत्यक्ष भेटे शिवनंदन । प्रेमे मोरयासी करी भाषण । ऐसा अधिकारी विरळा ।। ३४ ।। मोरया आणि

गणपतीसी । तूं दत्त उपासक म्हणविसी । तरीच आणी गुरुसी । भोजना लागी सत्वरी ॥ ३५ ॥ तरीच तूं भक्त शिरोमणी । ना तरी डामडौल व्यर्थ जाणी । करुनि दावी करणी । तरीच गुरुभक्त जाण खरा ॥ ३६ ॥ अवश्य म्हणोनि रंगनाथ । वेगे श्रीगुरुसी प्रार्थित । प्रगट होऊनि अकस्मात दत्त । मोरया गृही पातलें ॥ ३७ ॥ आसन देता श्रीरंगनाथ । दत्त येवोनि बैसत । आश्चर्य रामदास मानीत । बोलतसे श्रीरंगासी ॥ ३८ ॥ तुम्ही दत्तसांप्रदाय । आम्ही स्वरुपसांप्रदाय । आमुचे दैवत श्रीरामराय । तयासी पाचारण करावे ॥ ३९ ॥ ध्यानि आणोनिया श्रीराममूर्ती । आवाहन दिधले भोजनाप्रती । प्रत्यक्ष प्रगटुनी अवचिती । भोजना सर्व बैसले ॥ ४० ॥ सर्वी केला जयजयकार । परस्परा भेटता आनंद थोर । सोहळा जाहला अपूर्व । काय वर्णू महिमा तो ॥ ४१ ॥ मोरया स्वामीसी गर्व जाहला । श्रीगजानन येती भोजनाला । पंचायतनाची देखोन अतर्क्य लीला । झाले मनी सावध ॥ ४२ ॥ धन्य पंचायतन भूवर । प्रत्यक्ष मूर्ती महीवर । भोजना बैसविले समग्र । लीला दाविली मोरया ॥४३॥ यथासांग करिती भोजन । तेथे काय असे न्यून । देव विमानी बैसोन । कौतुक

पाहताती ॥ ४४ ॥ देव–भक्तांचा सोहळा । न वर्णवे कवी काळा । गुरुभक्ति पाहती डोळा । इतर दुर्लभ असे ॥ ४५ ॥ धन्य सद्‌गुरु महिमा । सगुणासी आणिला परमात्मा । मोरयाचे निरसिले भ्रमा । अलौकिक करणी दाविली ॥ ४६ ॥ यथासांग भोजन जाहल्यावरी । तांबुल देती निज करी । मोरयाचा अहंकार सत्वरी । गळूनि गेला तेथवा ॥ ४७ ॥ गजाननाचा मी पूर्ण दास । नित्य घाली भोजनास । पातलो होतो गर्वास । झाडी झाली तात्काळ ॥४८॥ कर जोडोनि करी विनवणी । महाराज संत शिरोमणी । अघटित दाविली करणी । अगाध शक्ती स्वामीची ॥ ४९ ॥ मी आराधिले गजाननासी । गर्व जाहला होता मजसी । जगामध्ये श्रेष्ठ असे मी । झाली होती भावना ॥५०॥ जयजयाजी सिद्धपुरुषा । परात्पर पुराण ईशा । भक्ती प्रेमे रमेशा । श्री दत्तासी आणिले ॥ ५१ ॥ काय सांगू संतमहिमा । मी अपराधी करी क्षमा । लोटांगणे बहु प्रेमा । वारंवार घालीतसे ॥५२॥ निराभिमानी झाला मोरया । गळाली सकळ अहंतामाया । श्रीसमर्थासी त्या समया । प्राथितसे क्षणक्षणा ॥५३॥ आपण अलौकिक पुरुष । महाज्ञानी पूर्ण परेश । सच्चिदानंद ब्रह्मपरेश ।

हृदयी आपल्या वसतसे ॥ ५४ ॥ समर्थ म्हणती गुरुभक्ता । जगी परमात्मा-भोक्ता । अणुप्रमाण पाहता । त्याचा तोचि अवतरला ॥ ५५ ॥ सर्वाभुती भगद्भावो । हेंचि मानी स्वयंमेव । ठेवोनिया राहे अभिनव । गुरुपुत्रा मोरया ॥ ५६ ॥ सद्बोधिला मोरया । निरसीली अहंमाया । ज्ञानसूर्य तया ठाया । प्रकाशमान केलासे ॥५७॥ सोहळा जाहला अपूर्व । भोजनी तृप्त जाहले सर्व । मोरयाचा अहंगर्व । धुवुनिया काढिला ॥ ५८ ॥ निरोप घेऊन एकमेक । स्वस्थाना गेले सकळिक । निगडीस्थाना अलौकिक । रंगनाथस्वामी जातसे ॥ ५९ ॥ स्वस्तिश्रीलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्ण-दासकृत । एकादशोध्याय गोड हा ॥ ६० ॥

॥ श्रीसद्गुरु निजानंद रंगनाथार्पण मस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ एकादशोध्यायः समाप्तः ॥

# ॥ अध्याय १२ वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

॥ श्रीगुरुमूर्ती सच्चिदानंदा । दीन दयाळा परमानंदा । तव चरणी पदारविंदा । नमन असे सद्भावे ॥ १ ॥ श्रीसद्गुरुमूर्ती । तुमची अगाधकीर्ती । मी पामर मंदमती । तव कीर्ती न वर्णवे ॥ २ ॥ परी आवडी तव पदाची । बहु गोडी लागली साची । कायमती वर्णावयाची । श्रीरंगराया ॥ ३ ॥ तूं चिद्रुप अव्यक्त । महाज्ञानी पूर्ण विरक्त । भवरोगातुनी मुक्त । तव कृपाबळे होतसे ॥४॥

दृश्य दृष्टा आणि दर्शन । मावळोनि जाय देखणेपण । तुझे स्मरताचिया चरण । आपोआप स्थिती होतसे ॥ ५ ॥ प्रकृती मायाअधिष्ठान । पुरुष तूं स्वयंप्रकाशमान । निजात्मरंगे पूर्ण । करुनिया दाविसी ॥ ६ ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी । दया क्षमा शांती कुसरी । तुझ्या कृपेची सत्वरी । लय होती तव चरणा ॥ ७ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष । चारी पुरुषार्थ प्रत्यक्ष । तव कृपा होताची देख । लोळतसे चरणावरी ॥ ८ ॥ खेचरी भूचरी चाचरी अगोचरी । ह्याचि मुद्रा त्या चारी । तव कृपेची नवलपरी । आपोआप होतसे ॥ ९ ॥ स्थूळ सूक्ष्म महाकरण । चारी देहाचे हे वर्णन । परि तुझे कृपेचे महिमान । तद्रुप होती तात्काळ ॥ १० ॥ सलोकता समीपता । सरुपता सायुज्यता । चारी मुक्तिची योग्यता । तव कृपेने साधती ॥ ११ ॥ ऐसा तुझा अधिकार श्रेष्ठ । ब्रह्मा विष्णूहुनी वरिष्ठ । भक्ताचे भवकुष्ठ । इच्छा मात्रे पळविसी ॥ १२ ॥ ऐसा तूं योगेश्वर श्रीरंग । तुझे चरणी मन माझे गुंग । दासासी दावी निजरंग । अगा सद्गुरु राया ॥ १३ ॥ जो जो तुझे वर्णावे गुण । वाचेसी पडतसे मौन । हृदयाचे चलनवलन । तव स्मरणे स्थिर होतसे ॥ १४ ॥ तव कृपाबळे ग्रंथ ।



द्वादश अध्यायपर्यंत । बोलविणारा तूं समर्थ । श्रीगुरुराया वदविला ॥ १५ ॥ पांडुरंग स्वरुपे दयाळा । श्रीलक्ष्मी वल्लभा कृपाळा । अवतार धरिसी भूतळा । जगदोद्धारा कारणे ॥ १६ ॥ यावरी कथेची रचना । निगडी ग्रामी स्वस्थाना । राहतसे गुरुराणा । श्रीरंगमूर्ती ॥ १७ ॥ एके दिनी अकस्मात । चित्ती योजिला एक हेत । म्हणती भागानगराप्रत । जाणे योजिती रंगमूर्ती ॥ १८ ॥ पंचायतनापैकी जाण । केशव स्वामी गुणनिधान । भागानगरा प्रतिस्थान । वास्तव्य करितसे ॥ १९ ॥ तयाचे भेटिसी । इच्छा झाली रंगमूर्तीसी । घोडा सजविला त्वरेसी । केशवस्वामीदर्शना ॥२०॥ तव तये वेळी अवचित । पत्रिका दिली अकस्मात । जयरामस्वामी समर्थानी । वडगांव ग्रामीहुनि ॥ २१ ॥ दूत आला त्वरेसी । आमंत्रणपत्रिका वेगेसी । दिधली रंगमूर्तीसी । अति आदरे करुनिया ॥ २२ ॥ तव स्वामी ती पत्रिका देखोनी । आनंदित झाले मनी । पत्रिका देखती उलगडोनी । भावार्थ त्याचा परिसावा ॥ २३ ॥ श्रीरंगराया बापा । तव नामाचि असे कृपा । चुकती जन्ममरण खेपा । निर्गुणपुरवासिया ॥ २४ ॥ माझे नाम जयराम । तुमचे नामे होती पूर्ण काम । विरोन गेले

भवभ्रम । श्रीरंगराया ।। २५ ।। करिता तुमचे नाम:स्मरण । भवबंध तुटे जाण । प्राणी जाती उद्धरोन । महिमा तव नामाचा ।। २६ ।। स्वामी कृपा करून । श्रीगुरु उत्सवासी येणे । माघ पौर्णिमा जाण । भोजना अवश्य यावे जी ।। २७ ।। कृष्णाप्पा श्रीगुरुमूर्ती । त्यांची असे पुण्यतिथी । साजरी करावी कृपामूर्ती । आनंद सर्वा होईल ।।२८।। नम्रता युक्त पत्रिका देखोन । उल्हसीत झाले मन । दूतासी सांगती अवश्य म्हणोन । निरोप देऊनि धाडिला ।। २९ ।। रंगनाथस्वामी वेगेसी । निघाले भागानगरासी । समर्थ केशवस्वामिसी । प्रेमानंदे भेटती ।। ३० ।। आनंद जाहला सर्वा प्रती । नरनारी दर्शना येती । सप्रेमे केशवस्वामी प्रती । हर्ष मानसी न समाये ।। ३१ ।। उभयता होता आलिंगन । आनंदी आनंद झाला पूर्ण । लिहिता न ये जाण । त्यांचे तेची जाणती ।। ३२ ।। केशवस्वामी महाज्ञानी । वैराग्यशील शिरोमणी । निजात्मबोधि शुद्धखाणी । स्वरुपी तल्लीन जो ।। ३३ ।। ऐसे दोघे समर्थ । परस्परा भेटता अवचित । आनंद न माये त्रिभुवनांत । गुरुपुत्र जाणती ।। ३४ ।। कीं जैसे इंदिरावर उमावर । कीं राम आणि सौमित्र । कीं बळराम आणि रुक्मिणीवर । तैसेची उभय दिसती ।। ३५ ।। हृदयी-हृदय मिळाले । दुजेपण निरसोनि गेले । द्वैताद्वैत उडाले । अवतरले पूर्ण ब्रह्म ।। ३६ ।। जीवशीव एक झाले । चित् स्वरुप उदया आले । निजानंदी डोलो लागले । ऐक्य झाली सर्वसृष्टी ।। ३७ ।। असो केशवस्वामी तया वेळी । पूजिली श्रीरंग माऊली । भोजन विधि उरकली । चर्चा स्वात्मानंदी करीतसे ।। ३८ ।। नित्यपूजाविधी उरकुन । नंतर करीतसे हरीकीर्तन । बोधितसे सकलजन । आत्मानात्म विचारे ।। ३९ ।। यापरि चार मासपर्यंत । क्रमिली असे तेथ । राजयोगी श्रीरंगनाथ । नित्य नियम चालवीतसे ।। ४० ।। एके दिवशी अकस्मात । माघ पौर्णिमा आली अवचित । वडगांवची विस्मृती होत । जयरामस्वामी पत्रिकेची ।। ४१ ।। स्नान पूजा उरकुन । म्हणे मज आज आमंत्रण । जयरामस्वामीचे येथे जाण । आहे जाणे सत्वरी ।। ४२ ।। तेथे येतील रामदास । आनंदमूर्ती त्या स्थानास । जाणे असे समयास । म्हणोनि घोडा सज्जिला ।। ४३ ।। घोड्यावरी स्वार होऊन । सर्वास आनंदे भेटून । निघते झाले जाण । दोन प्रहर समयासी ।। ४४ ।। विचार करिती मनी । वडग्राम दूर जाणोनि । श्रीगुरुदत्त आठवोनि ।

गमन करिती तात्काळ ॥ ४५ ॥ पन्नास योजने दूर । वडग्रामाहून भागानगर । क्रमिले असती सत्वर । सूर्यास्तासी पातले ॥ ४६ ॥ जयरामस्वामी चिंता करी । कां नये रंगस्वारी । मम आमंत्रणाते स्वीकारी । परी कां नये ती अद्यापि ॥ ४७ ॥ रामदास वदती जयरामा प्रती । आले आहेत रंगमूर्ती । भागानगराहुनि निश्चिती । आजीच निघाले आहेत ॥ ४८ ॥ जना वाटे आश्चर्य । उभयतांचे वर्णिती शौर्य । पन्नास योजने अपूर्व । कैसे क्रमिली असतील ॥ ४९ ॥ हे तव अगाध वाटे जाण । आजचि न होय आगमन । एके दिनी इतके आक्रमण । दुर्लभ जाण मानवा ॥ ५० ॥ येवोनिया रंगमूर्ती । रामदासासी नमन करिती । तैसेचि जयरामाप्रति । आनंदमूर्तीसी जाण पा ॥ ५१ ॥ तव इतक्या अवसरात । केशवस्वामी आले तेथ । भागानगरीहुनि अवचित । अकस्मात तेथे पातले ॥ ५२ ॥ आनंदे पंचायतन । परस्परासी भेटले जाण । तो सोहळा अनुपम्य । काय वर्णू न वर्णवे ॥ ५३ ॥ जीवशीव एके ठायी मिळाले । कीं त्रैमूर्ती एकवटले । कीं राम हनुमान भेटले । त्याहुनि विशेष आनंद तो ॥५४॥ कीं पंचप्राण एक झाले । की पंचमहाभूतें एकवटले ।



जळासी लवण मिळाले । ऐसे अपूर्व त्या ठायी ॥५५॥ पूर्ण ब्रह्माची एक मूस । तैशा रिती पंचमूर्ती विशेष । जगदोद्धार करावयास । पंचरुपे नटलेसे ॥ ५६ ॥ रामदास आदि करुनि । पंचायतन बसले भोजनी । स्वानंदामृत सेवोनि । सदा निमग्न राहती ते ॥ ५७ ॥ नाना परीचे पक्वान्न । ऐका त्याचे नामाभिधान । जे सेविती पंचायतन । नित्य नियमेसी ॥ ५८ ॥ शुद्ध सत्वाचे पाट मांडिले । त्यापुढे वैराग्य ताट ठेविले । स्वानंदाचे तांबे भरले । शुद्ध जळ सेविती ॥५९॥ शुद्ध भावाचे लेपन । दयाक्षमा शांती जाण । चटण्या ह्याचि आणोन । अति कुसरी वाढिल्या ॥६०॥ चारी मुक्ति कोशिंबिरी । वाढिल्याती अती आदरी । चवी घेती जेवणारी । इतरांसी दुर्लभ ॥ ६१ ॥ अहं सोहं तळून । वडे भजी केली निर्माण । आणिलेसे प्रेमे करून । वाढावया तया ठाया ॥६२॥ षड्विकार कडकडीत । तळताना तडतडीत । पापड आणिले भुरडीत । कुरवड्यासह त्या ठाया ॥ ६३ ॥ संकल्प विकल्प एकवटून । त्याच्या शाखा केल्या जाण । श्रीहरी नामी फोडणी देऊन । तयार करूनि आणिल्या ॥ ६४ ॥ मी तूं पण निरसिले । तेचि कढी आमटीचे प्याले भरले । जेवणार स्वादिष्टले । चवी तेचि

जाणती ॥ ६५ ॥ सद्भावाचा भात आणिला । मुदी करूनी वाढिला । श्रीहरी नामी वरणाला । रंग दिला केशरी ॥ ६६ ॥ चैतन्य रुप घृत । स्वादिष्ट जे कां अमृत । वाढिले असे पात्रात । अखंड सेविती जेवणारे ॥ ६७ ॥ त्रिगुणाच्या पोळ्या आणिल्या । ब्रह्मशर्करी घोळिल्या । चैतन्य घृती मिळाल्या । स्वादु उठला अपूर्व ॥६८॥ अनंत रुपे श्रीहरी । वर्णुन सेविती जेवणारी । ढेकरा हरीनाम गजरी । उठती लहरी स्वानंदाच्या ॥ ६९ ॥ चारी पुरुषार्थ मिळोन । त्याचेच केले पक्वान्न । भक्त पंचायतन भगवान । तोचि जाणे चवी त्याची ॥ ७० ॥ जयरामस्वामी गुरुराज । रामदासही महाराज । आनंदमूर्ती केशवराज । रंगमूर्ती समवेत ॥ ७१ ॥ भोजनी झाले तृप्त । मुखशुद्धि तांबूल सेवित । आत्मानंदे विडा चघळीत । सभास्थानी बैसले ॥ ७२ ॥ इतक्यांत सांगती जन । घोडा निमाला म्हणून । भागानगराहून गमन । फार झालेसे ॥ ७३ ॥ रात्र संपताच जाण । स्वामीसी सांगती येऊन । मनोहर घोडा पतन । रात्रीच कीं जाहला असे ॥ ७४ ॥ ऐकता अश्व हनन वार्ता । खेद जाहला बहुचित्ता । आठवूनि त्याचे गुण गौरवता । शोक बहुत मांडिला ॥ ७५ ॥ माझा घोडा



मनोहर । रुबाबदार अति सुंदर । स्वामी कार्यी तप्तर । काय आठवू गुण त्याचे ॥ ७६ घोडा न उठताची जाण । मी न सेवी उदक अन्न । देखोनिया सर्व जन । विवंचना करिताती ॥ ७७ ॥ दिवस आला दोन प्रहर । पाक सिद्ध सत्वर । परी रंगमूर्तीस शोक अनावर । झाला असे अश्वाचा ॥ ७८ ॥ रंगमूर्तीस नारीनर । विनविताती परस्पर । म्हणती किमर्थ करिता शोक अपार । होणार ते झालेसे ॥ ७९ ॥ तव म्हणती मनोहर घोडा माझा । डोळा न देखो मी सहजा । सोडोनि मजला सहजा । कधी नाही राहिला ॥ ८० ॥ तयावीण अन्नोदक । मी न घे निष्टंक । ऐसे जाणोनि सकळिक । शोकार्णवीच बुडालेसे ॥ ८१ ॥ जयराम म्हणती दयाळा । मम गृही असे अश्वशाळा । घोडा देतो तुम्हाला । उठा वेगी भोजनासी ॥ ८२ ॥ तव म्हणती रामदास । पन्नास योजने मार्गास । वेगें करी दोप्रहरास । ऐसा अश्व दाखवा ॥ ८३ ॥ बोलाविती परिक्षकासी । विचार पुसती तयासी । दोनशे कोस निश्चयेसी । घोडा चालेल काय ॥ ८४ ॥ तव म्हणे परीक्षक । ऐसा घोडा भूवर । जन्मला नाही निर्धार । या जगामाजी ॥ ८५ ॥ निंदा करिती जन समस्त । म्हणती

कैसा साधु रंगनाथ । घोड्या कारणे निरशन करित । कैसा हा योगी ॥८६॥ समर्थ म्हणती जयरामा । घोडा देई निज प्रेमा । रंगनाथा पूर्ण मेघःशामा । जेणे सुख होईल ॥ ८७ ॥ आज्ञा वंदूनी तयाची । मूर्ती आठविती श्रीगुरुची । निजकृपे पाहुनि तेचि । तीर्थ सिंचन करीतसे ॥८८॥ म्हणती बापा खगपाळा । श्रमलासी तूं दयाळा । श्रीरंग वहना अरिभूधरा । बहु कष्ट केले तुवा ॥८९॥ केश कुरवाळी प्रेमे करून । भागानगराहून जाण । केले असेल आगमन । तरी तूं ऊठ वेगी ॥ ९० ॥ तुज कारणे रंगमूर्ती । क्षणभरी कोठे न राहती । ऐसे जाणूनि स्वचित्ती । ऊठ वेगी मनोहरा ॥ ९१ ॥ समर्थादिक जाण । तुजवीण न घेती अन्न । ऐसे ऐकता जाण । उठोनि बैसे अश्व तो ॥ ९२ ॥ जयजयकार झाला जनी । धन्य म्हणती अश्वालागुनी । परस्परे विनोदेनि । पंचायतन हर्षती ॥ ९३ ॥ उठोनिया रंगनाथ । मंगल स्नान करीत । वस्त्राभरणे युक्त । नेसोनिया बैसले ॥ ९४ ॥ यथा सांग जाण । सकले साधिले भोजन । परस्परे निरोपोन । पंचायतन चालीलें ॥ ९५ ॥ मनोहर घोडा सजवुनि । स्वामी निघती निगडी लक्षुनि । महायोगे आनंदानी । आनंदे वर्तती ॥ ९६ ॥ कौतुक



करिती नारीनर । धन्य पंचायतन भूवर । घोडा उठविला सत्वर । क्षण मात्रे करुनियां ॥ ९७ ॥ आम्ही रंगनाथासी उपहासिले । परी सामर्थ्य नसे जाणले । लीला लाघव दाविले । धन्य धन्य सत्पुरुषा ॥ ९८ ॥ इच्छा मात्रे करुन । मृतासी दिधले संजीवन । काय वर्णावे महिमान । धन्य सद्‌गुरु महिमा ॥९९॥ घोड्यावरी होऊनी स्वार । रंगमूर्ती पातले निर्गुणपूर । पुढील कथा अपूर्व । श्रोते जनी परिसावी ॥ १०० ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदास कृत । द्वादशोध्याय गोड हा ॥ १०१ ॥

॥ श्रीसद्‌गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरु नाथार्पण मस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ द्वादशोध्यायः समाप्तः ॥

# ॥ अध्याय १३ वा ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ ॐ नमोजी अवधूत निर्विकारा । करुणाकरा विश्वंभरा । परात्परा परम उदारा । श्री गुरु रंगराया ॥ १ ॥ गुरुराया प्रसाद तुमचा । आम्हा पामरासी दुर्मिळ साचा । तव चरणी देह काया वाचा । झिजवू अखंड तरी दुर्लभ ॥ २ ॥ मनी लागली बहु आस । तव कृपेची तळमळ जीवास । कृपावलोकने दासास । पाही अगा सद्‌गुरु ॥ ३ ॥ मी बालक लडिवाळू । तूं माय माझी कनवाळू । वरदहस्त कृपाळू । शांतवी लेकरासी या ॥ ४ ॥ तूं जरी करिसी अव्हेरु । माते दुजा नसे आधारु । भवसागरी तूंच तारुं । रक्षी बालका सत्वरी ॥ ५ ॥ बोबडे बोलेन मीच वाचा । आसरा तुझे चरणाचा । तोचि तारक दीनांचा । सत्य हेचि सद्‌गुरु ॥ ६ ॥ अनन्यभावे आलो शरण । दासाचे करी उद्धरण । हेचि इच्छा मम मनीं । आणिक नलगे मज कांही ॥७॥ जयजयाजी सद्‌गुरु । जगस्वरुपी तुझा पसारु । बोधोनि तिमिर अंधकारु । निजरुप दाखविसी ॥ ८ ॥ दाखवी निजरुप डोळा । पाहुनि व्यापिले सकळा । अणुरेणु पासोनि ब्रह्मांडगोळा । तुझा तूंचि भरलासे ॥ ९ ॥ भरुनि उरला अंगुष्ठप्रमाण । ऐसे बोलती वेद जाण । परी तुझे कृपे करुन । गुरुराया पाहतसे ॥ १० ॥ आत्माराम अगोचर । परी तुझे कृपे दृष्टी गोचर । उलटी होऊनिया जर । स्वयं प्रकाशे दाविसी ॥ ११ ॥ होऊनि गेली ही स्थिती । उडोनि गेली माया भ्रांती । मी तूं पण हरपले चित्ती । अवघा तूंचि भरलासे ॥ १२ ॥ दृष्टी भरली रंगमूर्ती । आता न उठे माझी वृत्ती । नामःस्मरण तव चित्ती । अखंड वसतसे ॥ १३ ॥ रंगी रंग भरला पूर्ण । जिकडे तिकडे श्रीरंग

जाण । गेला चिन्मयानंद होऊन । निजानंदी रंगला ॥१४॥ निजानंदे रंगवून । रंगमूर्ती करी लेखन । ग्रंथ करी प्रकाशमान । सद्गुरु श्रीरंगराया ॥ १५ ॥ गताध्यायी कथन । घोडा उठविला जाण । वट ग्रामी आनंदाने । पंचायतन जमविले ॥ १६ ॥ तेथुनी पुढे कथा विस्तारली । सावध श्रोती पाहिजे परिसिली । सद्गुरु श्रीरंग माऊली । लीला दाखवी जनाते ॥ १७ ॥ निगडी ग्रामी येऊन । स्वस्थ राहिले कांही दिन । दीनोद्धार करावया लागून । निघते झाले सत्वर ॥ १८ ॥ वारुवरी होऊनी स्वार । आयुधे घेतली समग्र । श्रीदत्तनामे करुनि गजर । तीर्थ विलोकना निघाले ॥ १९ ॥ मार्ग आक्रमण करी रंगमूर्ती । अबाल वृद्धासी सद्बोधिती । स्वधर्माकडे लावी प्रवृत्ती । उपदेश देती सकलाते ॥ २० ॥ फिरता फिरता तये अवसरी । पातले रहिमतपूर नगरी । वस्ती देखोनिया बरी । मुक्कामासी राहिले ॥ २१ ॥ तेथे देशलेखक निर्धार । उदार स्वधर्मी तप्तर । स्वामी आगमने हर्षला फार । घेऊन गेला स्वगृहा ॥ २२ ॥ श्रीगुरु आगमन अवचिती । आनंद न समाये चित्ती । पूजावी श्रीगुरुमूर्ती । पुष्पे आणावया गेलासे ॥ २३ ॥ तयाची स्त्री पतिव्रता । पती



सेवी तत्परता । स्वामी सन्निध तत्वता । नमस्कारा पातली ॥ २४ ॥ स्वामी पाहती अंतर्ज्ञानी । इस मृत्यू आज माध्यान्ही । ऐसे जाणोनि तये क्षणी । पतिव्रतेसी बोलावी ॥ २५ ॥ बाई आली गृहातुन । स्वामीनी करी धरुन । प्रेमहस्ते कुरवाळून । कृपानेत्रे अवलोकिली ॥ २६ ॥ तव ते मनी कष्टी होत । म्हणे मज का कुरवाळीत । यांचे काय असे मनांत । क्रोधभरे बोलतसे ॥२७॥ मम पती गृही नाहीत । ऐसा देखोनि एकांत । विकल्प स्वामी चित्तात । झालासे दिसता हे ॥ २८ ॥ महाराज आपण साधु म्हणविता । सर्व जगाते बोध करिता । स्त्रियासी देखोनि एकांता । वर्तन आपले ठीक नव्हे ॥ २९ ॥ मम पती आपले ठायी लीन । अति आदरे गृहा आणून । शोडषोपचारे पुजावे म्हणोन । पुष्पे आणावया गेलासे ॥ ३० ॥ ऐकोनि सतीचे वचन । हासिन्नले श्रीगुरुजाण । म्हणती क्षण भरीन । कळेल सर्व तुजलागी ॥ ३१ ॥ दोन प्रहर होताचि जाण । सर्पदंश जाहला सतीस जाण । निचेष्टित पडली घाबरुन । म्हणे रक्षण करी श्रीगुरुराया ॥ ३२ ॥ सासू श्वशूर धावोनि येती । अवलोकून सर्व पाहती । म्हणती सर्प डसला इज प्रती । येऊनि सांगती श्रीगुरु ते ॥३३॥

आक्रोश करिती सर्वत्र । शिथिल जाहली सर्व गात्रे । उपचार न चले इतरत्र । आता काय करावे ॥ ३४ ॥ एकुलता एक पुत्र जाण । तयाची ही भार्या सुलक्षण । परि आमचे दैव हीन । काळ हरुनि नेतसे ॥ ३५ ॥ श्रीगुरुराया तूं समर्थ । कृपेचा ठेवी वरदहस्त । विघ्ने निवारी समस्त । म्हणोनि चरणी लागले ॥ ३६ ॥ आपले होताचि आगमन । आनंद जाहला अतिगहन । परि अवचित ओढवले विघ्न । दैव आमुचे खडतर ॥ ३७ ॥ आपले दर्शने त्रिविध ताप हरिती । ऐसे वदती वेदश्रुति । तैसेच करी निश्चिती । श्रीगुरुराया येधवा ॥ ३८ ॥ महापातकी आम्ही दीन । तव दर्शने झाली पावन । संकट आले धावोन । ब्रीद राखी आपुले ॥ ३९ ॥ जगांत होईल अपकीर्ती । श्रीगुरु येताचि गृहाप्रती । विघ्ने ओढविती अवचिती । लोकपवाद उठेल ॥ ४० ॥ ऐसे ऐकूनिया वचन । प्रसन्न झाले श्रीगुरु जाण । कृपेने गेले द्रवून । श्रीरंगमूर्ती तेधवा ॥ ४१ ॥ स्वामी म्हणती वृद्धासी । तुम्ही चिंता करू नका मानसी । श्रीदत्त कृपे निश्चयेसी । आताची विघ्न निवारे ॥ ४२ ॥ ऐसे बोलोन ते समयी । स्वामी सांगती लवलाही । गुरुस्मरण करुनि सर्वही । तीर्थ सिंचन



करावे ॥ ४३ ॥ ऐसे ऐकून तत्क्षणी । तीर्थ सिंचिती प्रेमे करुनि । जय जय रंगनाथ म्हणुनी । सर्वांगी तीर्थ लाविती ॥ ४४ ॥ श्रीगुरु महिमा अपूर्व । जयाचा जैसा असे भाव । तयासी फळ अभिनव । तात्काळ मिळतसे ॥ ४५ ॥ निर्विष झाली काया । उठोनि बैसे लवलाह्या । लोटांगण श्रीगुरुपाया । घालीतसे वेल्हाळा ॥ ४६ ॥ गडबडा लोळे चरणावरी । स्वामी पुनीत झाले निर्धारी । कृपा करुनि दासीवरी । पुनर्जन्म दिधला ॥ ४७ ॥ जयजयाजी गुरु माऊली । मजवरी बहु कृपा केली । निजांगाची करुनि साऊली । दीन अबलेसी उद्धरले ॥ ४८ ॥ मजकडून घडला अन्याय । अज्ञानें बोलिले गुरुमाय । क्षमा करी गा रंगराय । म्हणुनि चरण धरियले ॥ ४९ ॥ करुनिया प्रदक्षिणा । हस्त जोडुनि वदती वचना । श्रीगुरुराया निधाना । पुरवू आजी इच्छित ॥ ५० ॥ तुमचे दयें करुन । कांही नसे न्यून जाण । यावरी बोले गुरुवचन । द्यावे हो भाष आम्हासी ॥ ५१ ॥ भाक देती गुरुसी । मागाल ते देऊ तुम्हासी । ते म्हणती तीन दिवस साची । गर्भिणी तू आहेसि ॥५२॥ तुझे पोटी योग भ्रष्ट ।

येईल जाण तपोनिष्ठ । देई मज अभिष्ठ । तव पुत्रदान देई ॥ ५३ ॥ तथास्तु म्हणती उभयता । दिधला पुत्र नवमासी भरता । ऐसे एकुनि तत्वता । स्वामी निघाले तेथुनि ॥५४॥ आनंदे करिती जयजयकार । यथा पूजिला श्रीगुरुवर । भाजन उरकूनी सत्वर । श्रीगुरु निघाले तेथुनि ॥५५॥ निर्गुण पुरासी पातले । सकल नारीनर आनंदले । नित्य नियम विधी चालले । आनंदे काल क्रमीतसे ॥ ५६ ॥ योगवसिष्ठ ग्रंथास । आरंभ करिती लिखाणास । ग्रंथी ओतीला पूर्ण ब्रह्मरस । श्रवणे मुक्तची तत्काळी ॥ ५७ ॥ पुढे लोटता कांही काळ । प्रसूत झाली वेल्हाळ । गुरु पातले तत्काळ । तया पुत्रा मागती ॥५८॥ आनंदे देती पुत्रास । म्हणती याचे योगे आम्हास । उद्धार होईल सर्वास । तव कृपे गुरुराया ॥ ५९ ॥ घे नि आले निगडीस । लालन पालन तयास । करितसे प्रेमास । जनार्दन नाम ठेविले ॥६०॥ पांच वर्षे लोटता पाही । व्रतबंध करिती गुरुमाई । बोधोनिया शिष्या पाही । ज्ञान तया दिधले ॥ ६१ ॥ प्रविण केला विद्येत । शास्त्रोत्पत्ती निष्णात । एक गुरुकृपा अद्भुत । होताची सर्व वश होय



॥ ६२ ॥ तया शिष्ये जनार्दने । स्वामी सेवा केली पूर्ण । पुढीलअध्यायी निरुपण । श्रोते जनी परिसावे ॥ ६३ ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदासकृत । त्रयोदशोध्याय गोड हा ॥ ६४ ॥

॥ श्री सद्गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्री सद्गुरु नाथार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ त्रयोदशोध्यायः समाप्तः ॥

# ॥ अध्याय १४ वा ॥

॥ ॐनमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥

॥ श्रीरंगा तूं अव्यक्ता । मज दीनासी होसी व्यक्त । निर्विकार स्वरुपस्था । जगज्जीवना दयाळा ॥ १ ॥ श्रीव्यंकटेशस्वरुपा घननीळा । पार्वती रमणा जगत्पाळा । भयहारका .दयाळा । तुझा तूंचि वदविसी ॥ २ ॥ श्रीजननी अंबाबाई । तुझे चरण चिंतिता पाही । दासासी मती देई । तव गुण गावया ॥ ३ ॥ कृपादृष्टी अवलोकनी । उद्धरोनि नेई गे जननी । तोडी भव जाचणी । हीच प्रार्थना तुज असे ॥ ४ ॥ मी लेकरुं अनवाळू । पतित बाली तूं दयाळू । नाश करी षड्रीपु समुळू । हीच्र विनवणी तुज माये ॥ ५ ॥ भव कर्दमी रुतलो जाण । विषयरिपु टोचिती मजलागुन । तुझे करिताची नामःस्मरण । मुक्त होय लवलाही ॥ ६ ॥ तुवा उद्धरले भक्त अनेक । माझा धुवुनि काढी कलंक । तव भक्तीची देई भीक । हेचि चरणी मागणे ॥ ७ ॥ तुज म्हणती जगन्माता । मज दीनासी जरी अव्हेरिता । काय तुला लाभेल पुरुषार्था । श्रीअंबे जगदंबे ॥ ८ ॥ अनन्यभावे तुज मी शरण । झडकरी करी गे पावन । दाखवी तुझे प्रेमचरण । आणिक नलगे मज कांही ॥ ९ ॥ ग्रंथ लिखाणाची स्फूर्ती । तुझे कृपेनेच निश्चिती । तव कृपे श्रीगुरुमूर्ती । वदविताती साक्षेपे ॥ १० ॥ श्री रंगमूर्ती दयाशीळ । परम उदार घननीळ । सर्वत्र सर्व व्यापी दयाळ । स्वयें वदवी ग्रंथासी ॥ ११ ॥ गताध्यायी निरुपण । रहिमतपुरीचे विंदान । देश लेखकाची कांत जाण । सर्प विघ्न निवारिले ॥ १२ ॥ अनन्य भावे श्रीगुरुसी शरण । होऊनि दिले पुत्रदान । श्री गुरु आर्त संतोषवून । संगोपन केलेसे ॥१३॥ उपनयनादि संस्कार । वयातीत आला कुमर । श्रीगुरु सेवेसी तत्पर । अहर्निष

जागृत तो ॥ १४ ॥ यापुढे अभिनव वर्तली कथा । सावध परिसी जे श्रोता । श्रीगुरु रंगराया समर्था । चरित्र सादर परिसावे ॥ १५ ॥ एके दिनी श्री रंगमूर्ती । रामदास स्वामींचे दर्शनास जाती । परस्पर आनंदून मायेचि चित्ती । स्वानंद स्वरुपी तल्लीन ॥ १६ ॥ उभयताचा विचार । समागमे सहपरिवार । म्हणती करावा जगदोद्धार । प्रवास निमित्ये करोनि ॥ १७ ॥ महायात्रेसी चला वेगेसी । पाहू अनेक तीर्थासी । रामदास रंगनाथासी । प्रेमादरे वदताती ॥ १८ ॥ अवश्य म्हणोनि रंगनाथ । सवेचि सर्व सिद्धता करीत । रामदासा समवेत । निघते झाले सत्वरी ॥१९॥ रंगनाथ रामदास । निघती महायात्रेस । गंगा तटाकी मनास । बहु संतोष वाटला ॥ २० ॥ रम्य देखोनि सुस्थळ । स्वच्छ देखोनि गंगाजळ । समर्थासी वदती रंगदयाळ । कांही काळ क्रमूं येथे ॥ २१ ॥ तव गंगा तटाकासी । उभयता राहिले परिवारेसी । परस्परे बोलती विनोदेसी । सांप्रदाय बहुत झालासे ॥२२॥ समर्थासी बोलती रंगनाथ । शिष्य समुदाय असे बहुत । सत् शिष्य निवडोनि यथार्थ । घ्यावे समागमे ॥ २३ ॥ संख्या पाहता विषेश । द्विसहस्त्र असती शिष्य । भोजन देऊ समस्तास । निरोप



द्यावा सर्वांना ॥२४॥ निवडोनि काढी सद्भक्तासी । व्यर्थ परिवार कायसी । जाऊ त्वरे तया यात्रेसी । दाखवी चतुराई रंगोबा ॥ २५ ॥ अवश्य म्हणोनी रंगमूर्ती । प्रार्थी श्रीगुरुदत्ताप्रती । वेगी प्रगटली मूर्ती । रूप अभिनव घेऊनि ॥ २६ ॥ म्लेंच्छ रुपे आले दत्त । समागमे परिवार बहुत । सामोग्री असे विख्यात । ऐका नांवे सकलांची ॥२७॥ कन्या भार्या पुत्र । कुकुट बस्त विचित्र । समागमें सर्वत्र । धान्याचे गाठोडे ॥ २८ ॥ समागमे एका अश्वास । त्यावरी लादले सर्वास । शस्त्र सामुग्री विशेष । घेऊनिया पातले ॥ २९ ॥ एक हंडी मृत्तिकेची । बरोबर घेतली साची । उग्ररुपे श्रीदत्ताची । स्वारी आली ते ठायी ॥ ३० ॥ जे ठिकाणी स्वामी समर्थ । तेथेच पातले गुरुदत्त । जाऊनि पाकशाळेप्रत । सामान सर्व काढिले ॥ ३१ ॥ इकडे करिती कौतुक । रामदास रंगनाथ समाधिस्थ । एकाग्र करुनियां चित्त । स्वस्थ मानसी बैसले ॥ ३२ ॥ कल्याण शिष्य तयासी । म्हणे तुम्ही आले कैसी । पाकसिद्धी समर्थासी । होणे असे लागवेगी ॥३३॥ ऐकुनिया तयाचे वचन । क्रोधावला तो यवन । तुम्हांसी काय कारण । व्यर्थ बडबड करिताहे ॥३४॥ आम्ही करुं स्वयंपाकासी । तुम्ही

सर्व करा भोजनासी । ना तरी मुकाल प्राणासी । गर्जुनियां वदतसे ॥ ३५ ॥ उग्र रूप भयंकर । दाढी मिशा अपार । आरक्त नयन खदिरांगार । सक्रोधे वदतसे ॥ ३६ ॥ मृदुवचने बोले कल्याण । आम्ही ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण । तुम्ही आहात यवन । कैसे भोजन करावे ॥ ३७ ॥ तव बोलती गुरुदत्त । तुम्ही झालेतो उन्मत्त । म्हणोनि त्यासी धरिता । श्रीगुरुराय तेधवा ॥ ३८ ॥ शस्त्रे काढोनि त्वरीत । कल्याणासी मारीत । देखोनि शिष्य समस्त । भयभीत मनी जाहले ॥ ३९ ॥ स्तब्ध झाले सकळिक । म्हणती अरिष्ट आलें देख । कल्याण पावला निज सुख । रामदास कृपा बळें ॥ ४० ॥ इतक्यात करिती स्वयंपाक । हांडोत सामग्री सकळिक । ठेविली अग्नीवरी देख । सर्व जना देखता ॥ ४१ ॥ भार्या म्हणे पतिसी । कैसे करावे यासी । हांडी अपूरीच असे । काय घालूं तयांत ॥ ४२ ॥ पति बोले भार्येसी । बस्त वधोनि करेसो । हांडीत घालोनि निश्चयेसी । त्वरित करी पाक सिद्ध ॥ ४३ ॥ ऐकुनि पतीचे वचन । भार्या गेली हर्षून । शस्त्र घेऊनिया ते क्षण । बस्त छेंदिला तात्काळी ॥ ४४ ॥ तुकडे करुनि तयाचे । हांडीत घातले साचे । मुख उघडूनि हंडीचे । पाहे तेव्हा



महामाया ॥ ४५ ॥ हांडी भरेना मागुती । कुक्कुट छेदुनि टाकिती । सर्व शिष्य डोळा देखती । आश्चर्य करिती सकळिक ॥ ४६ ॥ हांडी कांही भरेना । पतीची करी प्रार्थना । अश्वटाकी म्हणोन । आज्ञा झाली पतीची ॥ ४७ ॥ अश्वाचे केले खंड विखंड । हांडीचे उघडले तोंड । टाकीले धूड प्रचंड । परी हंडी भरेना ॥४८॥ तव बोले पतीसी । अश्वाचे केले छेदनासी परी हंडी न भरे कैची । उपाय यासी काय करुं ॥ ४९ ॥ यवन बोले स्त्रियेसी। छेदी कन्या पुत्रासी । भरोनिया हांडीसी । पाक करी लवलाही ॥ ५० ॥ कन्या पुत्राचे छेदन केले । हांडीमाजी सर्व भरले । रिती हंडी देखोनि बोले । स्वामी हंडी भरेना ॥ ५१ ॥ सक्रोधे बोले भार्येसी । छेदितो सर्व शिष्यासी । हांडीत टाकितो वेगेसी । पाक सिद्धीकारणे ॥ ५२ ॥ असिलता करी घेऊन । सक्रोधे आरक्त नयन । धावला जैसा पंचानन । समर्थ शिष्यावरी तेधवां ॥ ५३ ॥ देखोनिया तयासी । भयभीत शिष्य मानसी । पळो लागले वेगेसी । दाही दिशा सर्व ही ॥ ५४ ॥ तव सापडला जनार्दन । गुरु स्मरणे तल्लीन । तयाचे शिर छेदुन । भार्येलागी देतसे ॥ ५५ ॥ इतर शिष्य पळाले । त्यांचे मागे गुरु धावले।

गर्जुनिया तयासी बोले । वधितो तुम्हां सर्वासी ।। ५६ ।। एक नागवे उघडे । एक पळता पळता पडे । भयाने झाले वेडे । न सुचे कोणा कांहीच ।। ५७ ।। एकाचे फिटले धोतर । एकाचे गळाले सर्व वस्त्र । एकाचे आपटले वक्र । देह भान विसरले ।। ५८ ।। एक करीत होते स्नान । एक करिती संध्यातर्पण । एक आणित होते सरपण । टाकुनि सर्व पळाले ।। ५९ ।। श्रीगुरुसी तेथे सोडुन । पळाले सर्व रानोरान । कैसे होईल म्हणोन । विचार करी दुसऱ्याचा ।। ६० ।। आपला जीव प्यारा बहुत । दुसऱ्याची कोण करी खंत । स्वार्थे होऊनि प्रेरित । भटकती दाही दिशा ।। ६१ ।। म्हणती आमचे भाग्य थोर । प्राण वाचवूं सविस्तर । यात्रा नव्हे महाघोर । संकट हे ओढवले ।। ६२ ।। जीव असता सुरक्षित । यात्रा करु अगणित । मागे विलोकुनि जो पाहता । तो यवन येतसे पाठिसी ।।६३।। भये करिता पलायन । अडखळोनि पडे जाण । कोणाचे फुटले वदन । रक्तस्त्राव होतसे ।। ६४ ।। कोणाचे तुटले हात पाय । गुडघे फुटोनि रक्त जाय । तव गर्जोनि बोले दत्तराय । उभे रहा रे मुर्खानो ।। ६५ ।। तुम्ही म्हणविता गुरुभक्त । स्वामी सोडोनि धावता समस्त । महायात्रेसी जाणे



त्वरित । पलायन कां करितसा ।। ६६ ।। मागे फिरोनिया पाहती । भय कांपे एक रडती । मारु नको आम्हा प्रती । म्हणोनिया प्रार्थितसे ।। ६७ ।। आम्ही जातो आपल्या गृहासी । भेटू स्वजन बंधू स्त्रीसी । यात्रा फळली आम्हासी । गुरुराया समवेत ।। ६८ ।। अमोलिक संधी गमावून । शिष्य करिती पलायन । अज्ञान तमें मोहून । गेले गृहा वेगेसी ।। ६९ ।। कोणी नाही विचार केला । यवन रुपे कोण आला । हांडीची करुनि माय लीला । चमत्कार दाखविला सर्वासी ।। ७० ।। श्रीगुरुसन्निध असोनि । माया मोहे गेले गांजुनि । देह ममता आवळुनि । भ्रमूनियां धावती ।। ७१ ।। जे गेले पळुनि । त्याना नित्य यम जांचणी । जन्म मरण फिरफिरोनी । त्यांच्या मागे लागले ।। ७२ ।। जैसे दैवी असे लिहिले । तैसेचि पाहिजे घडले । न चुके कदापि वहिले । होणार ते होतसे ।। ७३ ।। परि श्रीगुरुठायी ज्याचे चित्त । अहर्निश गुरु समवेत । त्यासी उद्धरी गुरु समर्थ । ऐसा अधिकार तयाचा ।। ७४ ।। अरिष्टे टाकी मोडून । एक गुरुकृपा होता पूर्ण । एक श्रीगुरुवाचोन । दुसऱ्यासी असाध्य हे ।। ७५ ।। श्रीगुरुचा अधिकार अपूर्व । इच्छा मात्रे करी सर्व । धन्य श्री

गुरु महिमा अपूर्व । काय वाचे वदावे ॥ ७६ ॥ असो सर्व शिष्य तेथोन । गुरु सोडून गेले पळून । आपापल्या गृहासी जाण । गेले सर्वही शिष्य ते ॥७७॥ कैसे याच्या बरवी । जीवपण तेथे हरवी । मी पण छेदूनि बुडवी । निज स्वरुप मनासी ॥ ७८ ॥ ऐसे गेले सर्वत्र । रामदास उघडती नेत्र । रंगनाथ म्हणे पवित्र । दोन शिष्य राहिले ॥ ७९ ॥ इतर सर्व पळाले । सद्भक्त दोन राहिले । जनार्दन कल्याण भले । निजस्वरुपी मिळाले दोघेही ॥ ८० ॥ श्री गुरु दत्तात्रय येऊन । यवनरूप दिले टाकून । स्वस्वरुपी प्रगटून । श्रीरंगासी भेटती ॥ ८१ ॥ समर्थ दत्त रंगनाथ । परस्पर भेटती समस्त । आनंद माये त्रिभुवनात । ब्रह्मानंद वर्तला ॥ ८२ ॥ सर्व मिळोनि बैसले । भोजनविधि उरकिले । कल्याण जनार्दन सावध केले । निद्रस्तां परी तेधवां ॥ ८३ ॥ उठोनि घेती प्रसाद । एकचि झाला ब्रह्मानंद । नमोनिया श्रीगुरुदत्त । श्री गुरुसी वंदिती ॥ ८४ ॥ सकळ शिष्य पळाले । अवघे दोनचि उरले । कल्याण जनार्दन भले । श्रीगुरु चरणी तल्लीन ॥ ८५ ॥ समर्थ वदती रंगोबासी । प्रयाण करावे यात्रेसी । अवश्य म्हणोनि समर्थासी । तयारी करिती



तेधवा ॥ ८६ ॥ श्रीदत्तात्रय झाले अंतर्धान । जनार्दन आणि कल्याण । समर्थ रंगमूर्ती जाण । ऐक्यरुपी निघाले ॥ ८७ ॥ धन्य धन्य ते गुरुभक्त । दत्त दर्शने जीवन्मुक्त । श्रीगुरु सेवा अमोलिक । फळ तयासी मिळाले ॥ ८८ ॥ यात्रा झाली परिपूर्ण । समर्थ रंगमूर्ती जाण । निगडी स्थाना येऊन । समर्थही गेले स्वस्थाना ॥ ८९ ॥ जनार्दन शिष्य अहर्निश । सेवा करी विशेष । स्वामी मनासी अति हर्ष । तया देखोनि होतसे ॥ ९० ॥ स्वामी समर्थ रंगराणा । पूर्ण करितसे मनकामना । करुनि तयाचे चरणी नमना । अध्याय येथे संपविला ॥ ९१ ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंग कृष्णदासकृत । चतुर्दशोध्याय गोड हा ॥ ९२ ॥

॥ श्रीसद्गुरु निजानंद रंगनाथार्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्गुरुनाथार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ चतुर्दशोध्यायः समाप्त ॥

# ॥ अध्याय १५ वा ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ जयजयाजी श्रीरंगराया । उल्हास मनीं तव गुण गाया । कृपेची करुनिया छाया । देई सन्मती दासासी ॥ १ ॥ गजाननरुपी गिरिजा कुमरा । परशधरा सुकुमारा । दत्तरुपा निर्विकारा । श्रीगुरु रंगनाथा ॥ २ ॥ जो जो तुझे वर्णावे गुण । चित्तासी होतसे समाधान । मनास येईल उल्हासपण । नाममहिमा अगाध तो ॥ ३ ॥ तव नामःस्मरणे कृपा मूर्ती । चारी मुक्ती दासी



होती । वैकुंठपद प्राप्ती । होते जाण निश्चये ॥ ४ ॥ नामाचा महिमा अपूर्व । भक्तिभावे गाता अभिनव । पाप क्षालन होय सर्व । अधिकारी मोक्षाचा तो ॥ ६ ॥ नाम मात्रे उद्धरले । भक्त असंख्यात तारिले । ज्यानी नाम महिमा गाईले । उद्धार त्याचा तात्काळचि ॥ ६ ॥ ऐसा तव नामाचा महिमा । सर्वाहुनि श्रेष्ठ परमा । जीवे भावे उच्चारिता प्रेमे । अखंड समाधि लागते ॥ ७ ॥ सच्चिदानंद रंगमूर्ती । तव नामाची अपूर्व कीर्ती । उच्चारिता परम प्रीती । भवबंध नाश होतसे ॥ ८ ॥ गताध्यायीचे कथन । रामदासासह रंगमूर्ती जाण । महायात्रेची सांगता करून । स्वस्थळा पातले ॥ ९ ॥ अगणित शिष्य समुदाय । गंगा तटाकी दाविली माव । भेणे पळाले शिष्य सर्व । हेचि जाण निरुपले ॥ १० ॥ निर्गुणपुरी रंगमूर्ती । निजानंदी स्वस्थ चित्ती । कांही काळ लोटताची । शिवराये पाचारिले ॥ ११ ॥ पत्रिका घेऊनि आला दूत । वंदोनि स्वामीसी विनवीत । तव दर्शनाचा हेत । शिवराये धरियेला ॥ १२ ॥ आनंद झाला स्वामीसी । निघते झाले साताऱ्यासी । भेटुनिया शिवाजीसी । तोषविले सकलाते ॥ १३ ॥ रामदासही आले तेथे । सर्व जन झाले आनंदित । रंगोबासी

भेटले समर्थ । आनंदी आनंद वर्तला ।।१४।। क्षेम कुशल वर्तमान । परस्परासी बोलती प्रेम खूण । निजानंदे गेले रंगून । आपपर नाठवे ।। १५ ।। रावशिवाजी सद्भक्त । धर्म स्थापनेसी उद्युक्त । समर्थ आज्ञे मनसोक्त । धर्म स्थापना करितसे ।। १६ ।। रामदास म्हणती रंगोबासी । आजि करी कीर्तनासी । ऐकावे वाटे मनासी । हेतु हा जाहलासे ।। १७ ।। कीर्तन करिती रंगनाथ । रामदास शिवाजीसहित । प्रेमे कीर्तन श्रवण करित । ब्रह्म ओतप्रोत भरलेसे ।। १८ ।। रंगनाथ प्रेमे कीर्तन करित । तो अकस्मात व्यग्र झाले चित्त । स्तब्ध राहिले निवांत । तया कीर्तना माझारी ।। १९ ।। कीर्तन आले रंगात । स्वामी कांही न बोलत । दोनघटिकापर्यंत । होऊन गेल्या ते अवसरी ।। २० ।। सर्व जन टवकारुनि पाहात । तो नवल झाले अद्भुत । स्वामी हस्त उदकात । ओले चिंब जाहले ।। २१ ।। उदक नाही तेथे । किंवा पर्जन्य नसे वर्षत । कैसे भिजले असे हस्त । नवल सर्वांस वाटले ।। २२ ।। श्रीरंगमूर्ती कीर्तन आरंभीत । तव प्रेमे शिवाजी बोलत । कां स्तब्ध राहिले गुरुनाथ । कृपा करून सांगावे ।। २३ ।। कीर्तन करितां मध्ये जाण । समाधियेणेचि कारण । सांगा



स्वामी मजलागून । चिंता तात्काळ निवारेल ।। २४ ।। श्रीगुरु शिवाजीस म्हणती । शिष्य वैश्य एक निश्चिती । समुद्री जहाज अवचिती । तयानें घातले ।। २५ ।। जहाज लोटले समुद्रात । तो तुफान झाले अद्भुत । लोक झाले भयभीत । प्राणांत होऊं पातला ।। २६ ।। प्रचंड वारा पर्जन्य । जहाज बुडो लागले जाण । ममधावा करुन । करुणा भाकीतसे ।। २७ ।। त्याची करुणा ऐकून ।मनी कृपा उपजली जाण । जाऊनियां तया स्थानी । जहाज तयाचे काढिले ।। २८ ।। तयालागी वेळ जाहला । कीर्तन रंग मध्ये ठेविला । ऐकोनि आश्चर्य मनाला । सकळ जन करिती ।। २९ ।। कीर्तन समाप्त करुन । भेटले रामदासा लागुन । शिवाजीसी क्षेमालिंगन । देवोनिया बैसले ।। ३० ।। तेथे राहिले एक मास । भजन पूजन अहर्निष । सद्बोध सांगता जनास । ऐशा रिती क्रमियेले ।। ३१ ।। वैश्य शिष्य ते अवसरी । पातलासे निर्गुणपुरी । भेटीलागी सत्वरी । श्रीगुरुच्या तेधवा ।। ३२ ।। तेथे नाहीत श्रीगुरुमूर्ती । ऐकोनि खेद पावला चित्ती । कोठे भेटतील श्रीरंगमूर्ती । जना कारणे पुसतसे ।। ३३ ।। तयासी सांगती नगरवासी । स्वामी आहेत सातार्‍यासी

शिवाजीचे आमंत्रणासी । गेले आहेत त्या ठाया ।। ३४ ।। एक मास झाला पूर्ण । अद्यापि तेथेच आहेत जाण । तुम्ही जावे सातार्‍यालागून । भेटी कारणे गुरुच्या ।। ३५ ।। ऐकुनिया सकल वृत्त । वैश्य आला सातार्‍याप्रत । जनासी पुसे सद्गुरुमात । स्थान दावा वदतसे ।। ३६ ।। तव म्हणती राजगृही । श्रीगुरु वस्ती त्या ठायी । वैश्य पातला लवलाही । श्रीगुरु भेटी कारणे ।। ३७ ।। द्वार पाळासी प्रेमे विनवित । महायोगी रंगनाथ । मज भेटवा त्वरीत । कृपा करूनि सत्वरी ।। ३८ ।। दूत सांगती रायासी । वैश्य एक भावेसी । चिंतन करितसे दिननिशी । स्वामी भेटी कारणे ।। ३९ ।। शिवाजीचा निरोप घेऊन । अंतर्गृही वैश्य आला जाण । भक्तिभावे नमस्कार करुन । लोटांगण घालितसे ।। ४० ।। जयजयाजी श्रीगुरुराया । काय उतराई होऊ पाया । तवकृपे लवलाह्या । समुद्री जाण वाचलो ।। ४१ ।। तव कृपा होताचि जाण । भवसमुद्र जाय उल्लंघोन । असार संसारा भुलोन । व्यर्थ त्रासविती जीवासी ।।४२।। कृपामूर्ती दातारा । संकटी रक्षिले पामरा । दीनांचा तूं होशी सोयरा । महाराजा गुरुवर्या ।। ४३ ।। तव नाम स्मरताचि वेगी । जहाज लागले सुस्थळ जागी । अघटित वर्तली नवलांगी । श्रीगुरुराया तेधवा ।। ४४ ।। म्हणोनि लोळे



चरणावरी । पावन करी निर्धारी । श्रीगुरु शांतविती सत्वरी । तया वैश्या कारणे ।। ४५ ।। राजा पुसे वैश्यासी । अरिष्ट काय होते तुम्हासी । येरु म्हणे निश्चयेसी । समुद्री जहाज बुडाले ।। ४६ ।। संकट ओढवले दुस्तर । भयभीत झाले नाविकार । तुफान उठले भयंकर । कांही न सुचे कोणासी ।। ४७ ।। कैचे द्रव्य कैचे व्यवहार । जीव वाचेल दुस्तर । पर्जन्य वर्षे मुसळधार । प्राणांत जाण ओढवला ।। ४८ ।। हृदयी स्मरोनि गुरुरंगमूर्ती । एकाग्र लाविली नेत्रपाती । संकटी सोडवी दासाप्रती । म्हणोनि धावा मांडिला ।। ४९ ।। द्रव्य जे संपादन केले । चतुर्थांश श्रीगुरुसी अर्पिलें । प्राणांत संकट जरी टळलें । भेटी घेणे श्रीगुरुची ।। ५१ ।। काय सांगू श्रीगुरुचे विंदान । नवल झालें ते क्षण । न कळे श्रीगुरुमहिमान । शिवराया काय सांगू ।। ५० ।। श्रीगुरुकृपेने जाण । स्थिरावलें पर्जन्य पवन । एकाएकी उसळोन । जहाज कडे लागले ।। ५२ ।। श्रीगुरु महिमा अघटित । वाचविलें लोक समस्त । मीही वाचलो संकटांत । श्रीगुरुकृपे करुनिया ।। ५२ ।। म्हणोनि लागला गुरुचरणा । द्रव्य अर्पिलें वैश्ये जाणा । वारंवार करुनिया नमना । स्वस्थळा जाण गेलासे ।। ५४ ।। हिरे

मौक्तिक सुवर्ण माळा । अर्पण केल्या सकळा । आश्चर्य वाटे भूपाळा । सर्वा–नाही तेधवा ॥५५॥ सर्व लोक वर्णितो कीर्ती । धन्य धन्य श्रीरंगमूर्ती । मानव रुपे या जगती । हरिहर अवतरले ॥ ५६ ॥ शिवाजी आनंदला चित्ती । कीर्तनी आली कथेची प्रचिती । धन्य धन्य श्रीरंगमूर्ती । भक्त संकटी रक्षिले ॥ ५७ ॥ श्रीरंगमूर्त्ती त्या समयी । शिवाजीस पाचारून लवलाही । निरोप घेऊनिया पाहीं । निगडी ग्रामी निघाले ॥ ५८ ॥ समागमे शिष्य जनार्दन । गुरु सेवे प्रेमा जाण । उदास उल्हसित मन । तया सत् शिष्याचे ॥५९॥ निर्गुणपुरा पातले । नित्य व्यवसाय आरंभिले । गुरुगीता काव्य लिहिले । उमाशंकर संवादे ॥ ६० ॥ पुढील कथा सुरस जाण । श्रीगुरु आख्यान । श्रवण मनन निजध्यान । श्रीगुरुपदी लीन व्हावे ॥ ६१ ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदासकृत । पंचदशोध्याय गोड हा ॥६२॥

॥ निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्गुरु नाथार्पण मस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ पंचदशोध्यायः समाप्तः ॥



# ॥ अध्याय १६ वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ श्रीरंगमूर्ती वरद सदाशिवा । आत्मारामा वासुदेवा । नीलकंठा उमा वल्लभा । नमन माझे तव चरणी ॥ १ ॥ अंबा मायभवानी । ज्ञान दिवटे तुझे त्रिभुवनी । पाजळूनि प्रेम घृतानी । स्वरुपी प्रकाश करितसे ॥२॥ अक्षय वस्ती निज धामी । गोंधळ घालिती तव नामी । प्रसन्न होऊनि तू स्वामी पंढरी वस्ती रहाती ॥ ३ ॥ तुझे नामी जिव्हा रंगली । सप्रेमे नामे रतली । उदय शब्दे

गुरुमाऊली । तूची जगदंबे अवतरसी ।। ४ ।। मी मंद मती अज्ञान । काय वर्णू कथा गहन । येणे होती कलिमल दहन । जन्मांतराचे तव लीले ।। ५ ।। कर्ममार्ग शास्त्री वर्णिला । साध्य न होय मूढ जनाला । म्हणूनि नाममंत्र कथिला । सोपा असे सर्वांसी ।। ६ ।। या नाममंत्राचा उच्चार । सद्भावे करिताती नर । तत्काळ होय उद्धार । तसा प्राणियाचा ।। ७ ।। म्हणूनी सर्वामध्ये श्रेष्ठ । नाममंत्र अति वरिष्ठ । जरी तुझी कृपादृष्ट । तरीच साध्य होय गुरुराया ।। ८ ।। ऐसा तू कृपा सागरु । दीन अनाथाचे तारु । उतरुनि जावया भवसमुद्रु । जाण नौका बळवंत पै ।। ९ ।। गताध्यायी कथन । साता-ऱ्यामाजी हरि कीर्तन । करीत असता श्रीगुरुजाण । वैश्य शिष्य रक्षिला ।। १० ।। जहाज लोटले समुद्रांत । तो तुफान उठले अवचित । सद्भावे श्री गुरुसी ध्यात । भक्त संकटी रक्षिला ।। ११ ।। शिवाजीस दाविली प्रचिती । वैश्य भेटून वृत्त कथिती । द्रव्य अर्पून स्वामी प्रती । स्व स्थाना तो गेलासे ।। १२ ।। पुढे वर्तले नवलपरी । श्रीगुरुमहिमा अवधारी । श्रोती परिसावे चतुरी । चित्त स्थिर करुनिया ।। १३ ।। बंधु पुत्र स्वामीचे । खंडोबा नाम



तयाचे । योग भ्रष्ट जन्मांतरीचे । नाझरे ग्रामी अवतरले ।। १४ ।। नाना परीचे भोग । भोगिती जाण यथा सांग । विषय लोलुपी गुंग । होवोनियां राहिले ।। १५ ।। अनुताप झाला चितासी । सार्थक करावे जन्मासी । शरण आले रंगमूर्तीस । नम्र भावे विनवीतसे ।। १६ ।। कांहीं घडावा परमार्थ । ऐसे मनी विचारीत । पश्चात्तापे स्वामी प्रत । बोलता जाहला ।। १७ ।। महाराज समर्था । कृपा करी गुरुनाथा । दासासी करी कृतार्था । कृपावलोकनें करुनिया ।। १८ ।। स्वामीनी जाणुनि तयाचा हेत । सप्रेमे नित्य बोधित । एकाग्र करुनिया चित्त । मनन प्रेमे करितसे ।। १९ ।। तव एके दिनी रंगमूर्ती । पंढरीस निघाले अवचिती । तव खंडोबा येऊनी स्वामी प्रती । चरणी लागून विनवितसे ।। २० ।। स्वामीनी कृपा करुन । पंढरीस न्यावे मज लागून । चरण सेवीन रात्रंदिन । हीच विनंती गुरुराया ।। २१ ।। तयाचा भाव जाणोनि । पंढरीस घेती त्या लागोनि सेवा करी अनुदिनी । श्रीरंगमूर्तीची ।। २२ ।। नित्य कीर्तन ऐकावे । आत्मानात्म विचार बरवे । पाहुनि तत्व शोधावे । ऐक्य स्वरुपी ।। २३ ।। स्वामीचे नित्य कीर्तन । राऊळी होतसे जाण श्रोते मनीं आनंदपूर्ण

गर्दी अलोट लोटतसे ।। २४ ।। नित्य सायंसंध्या उरकोन । श्रीगुरुस्तव करुन । स्वामी जातसे मंदिरा जाण । समागमे खंडोबाही ।। २५ ।। रामदास त्या समयासी । पंढरीस आले पांडुरंग दर्शनासी । भेटुनी रंगोबासी । कीर्तन ऐकती प्रेमादरे ।। २६ ।। एके दिनी नवल वर्तले । स्वामी संध्याध्यानी गुंतले श्रोते कीर्तना तिष्ठले । लवकर पाचारिती स्वामी ।। २७ ।। खंडोबा जाऊनि राऊळात समर्थासी प्रेमे वंदीत । स्वामी आहेत ध्यानस्थ । अवघी थोडा लागेल ।। २८ ।। तव रामदास बोलती तयासी । खंडोबा तुम्ही करावे कीर्तनासी । ऐकून समर्थ वचनासी । अनुताप चित्तीजाहला ।। २९ ।। समर्थाचे ऐकोन वचन । खंडोबा मनी संकोचे जाण । मज अपमानिले पूर्ण । सभे माजी समर्थे ।। ३० ।। मुद्दाम वदले मजकारण जीवित व्यर्थ पै माझे ।। ३१ ।। मजसी नाही भाषा ज्ञान । अंगी नसे वक्तृत्व पूर्ण । सभेमाजी करावे भाषण । चतुराई नसे मज लागी ।।३२।। धि:कार असो मम जीवा । व्यर्थ जन्म झाला देवा । आता प्राणत्याग करावा । हेचि उचित मजलागी ।। ३३ ।। स्वामी सन्निध येऊन । उभा ठाकला । कर जोडून । स्वामी आज्ञा द्यावी मजलागून । प्राणत्याग करणेसी ।। ३४ ।।

जाऊनिया भीमातीरा । प्राण अर्पितो सत्वरा । श्रीगुरुराया उदारा । अशिर्वाद मज द्यावा ।। ३५ ।। स्वामी पुसती तयासी । कासया प्राण त्यागकरिसी । सांग बापा निश्चयेसी । काय झाले वर्तमान ।। ३६ ।। जो सर्वाहुनि प्यारा । तू का करिसी अव्हेरा । सांग मजसी सत्वरा व्यर्थ उदासी काय झाले ।। ३७ ।। खंडोबा बोलो आरंभिले । म्हणे गुरुराया मज निंदिले । कीर्तनी भागवतार्थ बोले । समर्थ आज्ञा ऐसी असे ।। ३८ ।। अक्षरहीन मी मंदमती । कीर्तन करावे अवघे वदती । एकही अभंग मज प्रती । नये युक्ति काय म्हणू ।। ३९ ।। एरंडापरी वाढलो । अज्ञान तमे ग्रासलो । ज्ञान सूर्या नागवलो । धि:क पै जीवित माझे ।। ४० ।। म्हणुनि झालो उदासीन । देह त्याग करावा जाण । पाप काढावे धुवून । आज्ञा देई गुरुवर्या ।।४१।। आपण गुरुवर्य श्रेष्ठ । तुमचे वंशी मी पापिष्ठ । देह भागाचे अमित कष्ट । आजवरी भोगिले ।। ४२ ।। म्हणोनि लागला चरणा । श्री गुरुसी करी प्रार्थना । रक्षी रक्षी मज दीना । श्रीगुरुराया समर्था ।। ४३ ।। ऐसा जाणुनि भाव तयाचा । स्वामी कृपा करी साचा । श्री अक्षरे तयाचे ।

जिव्हाग्री लिहिली ॥ ४४ ॥ आता तू जाई राऊळांत । कीर्तन करी यथार्थ । ज्ञानसागर प्राप्त । झालासे तुजलागी ॥ ४५ ॥ तो झाला चमत्कार । खंडोबासी सत्वर । हृदयी ज्ञानसूर्य प्रखर । उद्भवला तेजस्वी ॥ ४६ ॥ श्रीगुरु कृपा अलौकिक । खंडोबासी दाविले कौतुक । अक्षरशून्य मतिमंद देख । ज्ञाने पूर्ण भरविला ॥ ४७ ॥ नमस्कार करुनि गुरुसी । प्रदक्षिणा करी भावेसी । येऊनिया राऊळासी । श्रीचरणी लीन झालासे ॥ ४८ ॥ समर्थासी करी नमन। तैसेच वंदी संतजन । श्रीगुरुसी स्मरुन । कीर्तना उभे ठाकले ॥ ४९ ॥ जिकडे पाहे स्वरुपी। तिकडे श्रीकृष्ण दृष्टी । समदृष्टी रंगरुपी। निजवृत्ति जडलीसे ॥५०॥ ब्रह्म स्वरुप झाली काया । अवघेचि ब्रह्म तया ठाया । भरुनि उरले त्या समया। आण दुजे नाठवे ॥ ५१ ॥ तया ब्रह्मस्थिती माजी जाण । कीर्तन रंगी गेला रंगून । वाचे वदतसे ब्रह्मज्ञान । श्रोतेजन तल्लीन पैं ॥ ५२ ॥ मध्यरात्र गेली टळोन । पुरे न होय कीर्तन । निरसोन गेले देहभान । रामदास समाधिस्थ ॥५३॥ कीर्तन रंगी रंगला । अवघा श्रीकृष्ण भरला । सर्वा ठायी व्यापला । निजरंग मूर्ती ॥ ५४ ॥ कीर्तन होतसे निर्द्वंद्व । कोणा न वाटे करावे बंद । श्रमोनि गेला श्रोतृवृंद । मग आरती केली पैं ॥ ५५ ॥ कीर्तन झाले समाप्त । रंगनाथ येती अकस्मात । येऊनि समर्था प्रत । प्रेमभावे बोलती ॥ ५६ ॥ म्हणती कृपा करावी खंडोबासी । उदय झाला योग भ्रष्टासी । आशीर्वचने तयासी । निजस्वरुपी मिळवावे ॥५७॥ प्रसन्न झाले रामदास । आनंदे बोले रंगमूर्तीस । श्री अक्षरे जिव्हेस । तयाचा प्रसाद कीर्तन हे ॥ ५८ ॥ तव कृपा पूर्ण जाहली । भाग्यश्री उदया आली । पूर्व संचिते उदेली । सार्थकता झाली आजी पैं ॥ ५९ ॥ श्रीचा केला उद्धार । नाम ठेवा श्रीधर । भारत भागवत समग्र । टीकाकार कवी हा ॥ ६० ॥ हरिवंशादी ग्रंथ जाण । मंथुनि काढील पूर्ण । ऐसे देऊनि वरदान । जाते झाले स्वस्थाना ॥ ६१॥ तया श्रीधरे जाण । ग्रंथ केले गहन । हरि विजयादी परिपूर्ण । रामविजय कथिलासे ॥६२॥ भाषा रसाळ अतिगोड । पढताती पुरती कोड । अर्थ भरला अतिगोड । निजरंगे रंगविला ॥ ६३ ॥ भागवत आद्य अध्याय सव्वालक्ष । तेणे रचिले प्रत्यक्ष । पांडव प्रताप अध्यक्ष ।

अश्वमेधादी कथिलासे ।। ६४ ।। पूर्वी ग्रंथ संस्कृत । श्रीधरे केले प्राकृत । सर्व जगासी केले विदित । आबाल वृद्ध पढताती ।। ६५ ।। ऐसा महाज्ञानी श्रीधर । महाराष्ट्र भाषा टीकाकार । आबाल वृद्धा उपकार । तया श्रीधराचा ।। ६६ ।। मूढ जन सज्ञान । ग्रंथ पढताती सज्ञान । श्रीधरे कृपा करुनि जाण । ज्ञानामृत पाजिले ।। ६७ ।। संस्कृत न कळे कोणासी । श्रीधरे केले प्राकृतासी । घरोघर पढती ग्रंथासी । उपकार त्याचा सर्वांना ।। ६८ ।। हरिविजय ग्रंथ अति मधुर । कृष्णलीला मनोहर । भक्तिभावे पढता नर । पावन होय तत्काळ तो ।। ६९ ।। सद्गुरु कृपेची नवलाई । श्रीधरे दिधले जनापायीं । भारत भागवत लवलाही । चाखविले सर्वांना ।। ७० ।। अक्षरहीन मतिमंद । वाचे न बोलवे एक शब्द । गुरु कृपा प्रबुद्ध । झाली तया श्रीधरा ।। ७१ ।। गुरु कृपा कोणासी । होईल जाणे केंव्हां कैसी । अंत न लागे तयासी । अघटित महिमान तयाचे ।। ७२ ।। सद्गुरुसी व्हावे अन्यन शरण । काया वाचा मने जाण । सेवा करावी रात्रंदिन । गुरुकृपा होय तयासी ।। ७३ ।। वाल्या कोळयाचे वाल्मिकी झाले । भाष्य



रामायण कथिले । तैसेच श्रीधरे केले । गुरुकृपे करुनिया ।। ७४ ।। ऐसी श्रीगुरुकृपा जाण । ऐक्य स्वरुपी करी पूर्ण । श्रीरंगमूर्ती कृपा गहन । दासावरी असे पैं ।। ७५ ।। स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहज रंगकृष्णदासकृत । शोडषोध्याय गोड हा ।। ७६ ।।

।। श्री सद्गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ।।

।। श्री सद्गुरु नाथार्पणमस्तु ।।

।। इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ षोडशोध्यायः समाप्तः ।।

# ॥ अध्याय १७ वा ॥

॥ ॐनमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री रंगमूर्तयेनमः ॥

॥ जय जयाजी श्रीगुरुनाथा । तवनामी आनंद चित्ता । निरसून जाय त्रिविध तापता । श्रीगुरुराया समर्था ॥ १ ॥ आधिदैवि आधिभौतिक । आणि अध्यात्मिक । त्रिविध ताप हे मुख्य । गांजिताती अर्हनिशी ॥ २ ॥ जोवरी देह धारण । तोवरी तापत्रय जाण । भोगणे लागे सर्वांगीण । कदापि न चुकती ॥३॥ परी तुझे एक कृपे जाण । देह ममता जाय उडोन । तापत्रयाचे दुःख पूर्ण । नाश होतसे स्वामिया ॥ ४ ॥ काम क्रोध मद मत्सर । दंभ आणि अहंकार हे षड्रिपु अनिवार । महा बलाढ्य शत्रू हे ॥ ५ ॥ विषयी लालूच दाविती । बळेची तयात मोहिती । सन्मार्गा आडवे होती । ऐसी करणी तयांची ॥ ६ ॥ मन बुद्धी चित्त अहंकार । सहा विषयी तत्पर । मुख्य मन असे स्वैर । अन्यरीती संचरे ॥ ७ ॥ यासी जखडिना कोणी । श्रीगुरुराया तुज वाचुनि । इतराची गवसनी । न चाले तयासी ॥ ८ ॥ तू कृपावलोकने देखता । भ्रांती पडदा तुटे तत्वता । विसरुनि देह विषय ममता । तव चरणी निष्ठेल ॥ ९ ॥ ऐसा तू सद्गुरु समर्थ । सच्चिदानंद पूर्ण व्यक्त । मज दीनासी करी मुक्त । कृपासागरा दातारा ॥ १० ॥ श्रीगुरु कृपेची साऊली । श्रीगुरु दीनाची वाली । श्रीगुरु पतिताची माऊली । श्रीगुरु महिमा अघटित ॥ ११ ॥ वंदोनी श्रीगुरुचरणा। विनवितसे करुणाघना । दासासी मती देई जाणा । ग्रंथ वदावया श्रीगुरु ॥१२॥ श्रीगुरुकृपा अपूर्व । ग्रंथ वदवी स्वयं एव । निमित्त मात्रे करी लाघव । त्याचा तोची वदतसे ॥ १३ ॥ गताध्यायी कथन । श्रीधरा दिधले दिव्य ज्ञान । पंढरी क्षेत्राहुन । स्वामी आले निर्गुणपुरी ॥ १४ ॥ वर्तत असता. निगडीस ।

हुर हुर वाटे चित्तास । जावे वाटे भागिरथीस । श्रीविश्वनाथ दर्शना ।। १५ ।। विचार ठरला निश्चिती । कथित झाले सर्वा प्रती । जाणे आहे भागिरथी प्रती । समागमे चलावे ।। १६ ।। आज्ञा होताची ऐसी । निघाले सहपरिवारेसी । शुभ देखोनि मुहुर्तासी । निघाले स्वामी सत्वरी ।। १७ ।। देहू ग्रामा नजिक । स्वामी आले देख । महावैष्णव तुकया भक्त । प्रेमानंदे भेटले ।। १८ ।। स्वामी आले भेटीसी । वार्ता कळली तुकयासी । सामोरे जाऊनि वेगेसी । परस्पर भेटले ।।१९।। महायोगी रंगनाथ । तुकाराम वैष्णव भक्त । विठ्ठल नामी अहोरात्र । देह ज्याने झिजविला ।। २० ।। उभयताच्या झाल्या भेटी । परस्पर बोलती गोष्टी । हर्ष न माये सृष्टी । महानंद वर्तला ।। २१ ।। तुकयासी म्हणता रंगनाथ । यात्रेसी चला मज समवेत । आनंद होईल मज प्रत । महासाधु तुकारामा ।।२२।। तव अमृतवाणी अभंग । सदा निजानंदी दंग । श्रवणे होतीं भवभंग । महाराजा तुकारामा ।। २३ ।। ऐकुनी रंगनाथ वाणी । संतोषले तुकाराम मनी । प्रेमे बोलतसे मंजूळ वाणी । रंगमूर्तीसी तेधवा ।। २४ ।। रंगराया सत्संग तुमचा । घडावा हाचि हेतु चित्ताचा । परि उपाय न चले साचा । प्रकार शरिराचा

वार्ध्यक्य ।। २५ ।। शरीर झाले जर्जर । अशक्तता आली फार । प्रवासाची दगदग थोर । न होय जाण मजलागी ।। २६ ।। आपला अखंड सहवास । नित्य घडे ज्या प्राण्यास । तो मुक्तची झाला खास । श्रीविठ्ठलरुपी तल्लीन जो ।।२७।। या रीती बोलुनि रंगमूर्तीसी । ठेऊनि घेतले एकनिशी । भजन कीर्तन देवालग्रा-पाशी । अत्यादरे करविले ।। २८ ।। निरोप देऊनि रंगनाथासी । तुकाराम झाले स्वस्थ मानसी । श्री विठ्ठल चिंतन अहर्निशी । तल्लीन झाले तुकाराम ।।२९।। रंगनाथ मार्ग क्रमित । उतरले बोदे गावांत । आनंद झाला जनात । मोहोत्साह मांडिला ।। ३० ।। तव तेथील एक गृहस्थ । मजुरीवरी उपजीविका करीत । एक महिष दूध देत । प्रेमे संगोपन करीतसे ।। ३१ ।। स्वामी आले म्हणुनि । आनंदला तो मनी । पत्नीस बोले मृदुवचनि । मनी विचार एक आला ।।३२।। धन द्रव्य नसे आपणापाशी । धान्य न मिळे खाण्यासी । महाराजास आणावे भोजनासी । ऐसा हेत जाहला ।। ३३ ।। भार्या म्हणे तयासी । अनुकूलता नसे आपणासी । म्हैस दूध द्यावे नैवेद्यासी । मनोरथ पूर्ण होतील ।। ३४ ।। अवश्य म्हणे तियेसी । युक्ति काढली खाशी । दूध देऊ सायंपूजेसी । महाराजासी

नेऊनिया ॥३५॥ तो दिनी पारडू गेले रानांत । स्वैरपणे विचरत । तो श्वापद येऊनि अकस्मात । तया पारडा भक्षिले ॥ ३६ ॥ अस्तमान होताचि जाण । म्हैस गेली घरालागुन । परी पारडू न देखोन । हंबरू लागली ॥ ३७ ॥ घरधनी तये वेळा । हुडकी पारडू परसदारी आला । परी न:दिसे तया डोळा । जन सांगती वध वार्ता ॥ ३८ ॥ ऐकुनिया ते वचन । मनी झाला बहु खिन्न । अहा देवा आणिले विघ्न । मज गरीबावरी हे ॥ ३९ ॥ दैवयोगे अकस्मात । येथे आले श्रीरंगनाथ । मनी धरुनिया हेत । सेवा स्वामीची करावी ॥ ४० ॥ परि आमचे नष्टचर्य । न घडे सद्गुरु कार्य । श्रीसद्गुरु रंगवर्य । सेवा न घडे आम्हासी ॥४१॥ पारडू असलेंविण । म्हैस न देचि दुग्ध जाण । हताश होऊनि झाला दीन । शोक तये मांडिला ॥ ४२ ॥ जयजयाजी सद्गुरु माऊली । कांही सेवा घडावी वहिली । आम्ही अंकिचन आमुचा वाली । तुज वाचुनि नसे की ॥ ४३ ॥ सद्गुरु सेवा नाही घडली । चित्तास तळमळ लागली । पतिपत्नी बहु हळहळली । दोष देती अदृष्टा ॥ ४४ ॥ इकडे सद्गुरु रंगमाऊली । पूजा करोनि ध्यानस्थ बसली । तो भक्ताची हाक ऐकिली । उद्वेग चित्तासी जाहला

॥ ४५ ॥ जनास पुसे वर्तमान । पारडू कोणाचे मेले जाण । ते गृही आम्हा जाणे । आहे गृह दाखवा तयाचे ॥ ४६ ॥ तो धावले नगरलोक । घेऊन आले आदरपूर्वक । गृहस्थाचा आनंद न माये देख । सद्गुरु चरणी विनटला ॥४७॥ स्वामी म्हणती तयासी । दूध देई पूजेसी । तव इच्छा बहु मानसी । श्रीदत्तराये कथिले मज ॥ ४८ ॥ ऐकुनि सद्गुरु वचना । अश्रु आले तया नयना । हस्त जोडोनि दीनवाणा । स्वामी लागी वदतसे ॥ ४९ ॥ दुग्ध द्यावे पूजेसी । इच्छा होती मानसी । परी प्रारब्ध या समयासी । आडवे आलें असे ॥५०॥ म्हशीचे पारडू जाण । श्वापदे भक्षिले म्हणोन । म्हैस दूधच न देई जाण । म्हणुनि खिन्न झालो जी ॥ ५१ ॥ स्वामी म्हणती ते अवसरी । म्हैस आणा सामोरी । हात थापटूनि पृष्ठीवरी । दूध देई म्हणतसे ॥ ५२ ॥ तो नवल वर्तले अद्भूत । पान्हा घाली म्हैस तेथ । दुग्ध दिले द्विगुणित । आश्चर्य सर्व करताती ॥ ५३ ॥ पूजा नैवेद्य उरकुन । स्वामी करिती भोजन । गृहस्थ गेला गहिवरुन । चरणी माथा ठेविला ॥ ५४ ॥ महाराज दीन दयाळ । पतितपावन घननीळ । तव कृपेसी काळ वेळ । कांही न लगे दातारा ॥ ५५ ॥ मी पुनीत झालो जाण ।

तव कृपेने परिपूर्ण । सेवा करणेचि इच्छा जाण । पूर्ण केली स्वामींनी ॥ ५६ ॥ स्वामी म्हणती तयासी । म्हैस देईल दुग्धासी । कल्याण होईल तुजसी । श्री गुरु कृपेने ॥ ५७ ॥ या परी करुनिया चमत्कार । स्वामी निघाले सत्वर । यात्रेसी जाणे दूर । म्हणोनि मार्ग आक्रमिती ॥ ५८ ॥ भागीरथीस पातले । श्रीविश्वनाथ दर्शन घेतले । सर्व दैवते अवलोकिले । नंतर गेले तीरासी ॥५९॥ भागीरथीस म्हणती रंगनाथ । महासाध्वी तू पवित्र । श्रीविष्णू चरण कमलात । जन्म तुझा जाहलासे ॥ ६० ॥ प्राणी असंख्य पातके करित । तुझे दर्शने जीवन्मुक्त । तू सदा परोपकारीरत । वंदन तुजला सद्भावे ॥ ६१ ॥ ऐसे वदताची रंगमूर्ती । प्रत्यक्ष प्रगटली भागीरथी । नमन करुनिया विनविती । श्रीरंगासी तेधवां ॥ ६२ ॥ महापुरुषा विष्णू भक्ता । तव दर्शने मज मुक्तता । पावन झाले मी आता । धन्य आजिचा सुदिन ॥ ६३ ॥ रंगमूर्ती वदे तियेसी । तुकाराम रहात देहुसी । त्यानीं धाडिले पत्रिकेसी । उत्तर देई लावलाह्या ॥ ६४ ॥ तुकारामाची पत्रिका । भावार्थ त्यातील ऐका । विष्णु भक्ते लिहिले देवा । अधिकार त्यांचा अपूर्व ॥ ६५ ॥



॥ परीस तू माते माझी विनवणी । तुझीये चरणी चित्त माझे ॥ ६६ ॥
॥ जिता मुक्ति मेल्या मोक्ष तुझे तिरी । ऐके हो परसी सुखरुप ॥ ६७ ॥
॥ तुका विष्णूदास संताचे पोसणे । वाग्पुष्प तेणे पाठविले ॥ ६८ ॥

या अभंग रुप पत्रिकेस । रंगनाथ देती भागिरथीस । येरी वंदी मस्तकास । म्हणे धन्य आजि जाहले ॥ ६९ ॥ आजि सुदिन सुमंगल । परम भाग्ये लाभला केवळ । तुकोबाचे पत्र प्रेमळ । रंगमूर्तीसी दिधले ॥ ७० ॥ महाराजा श्रीरंगराया । मज धन्य केले आजिया । तव दर्शने दोष या । मुक्त झाले गुरुवर्या ॥ ७१ ॥ तुकोबासी देते उत्तर । त्यांना करावे सादर । प्रेमे सांगावा नमस्कार । अवश्य श्रीरंगमूर्ती ॥ ७२ ॥ ऐसे म्हणोनि भागिरथी । पत्रिका लिहीली प्रेमार्थी । श्रोते परिसावे भावार्थी । पत्रिकेचा गुह्यार्थ ॥७३॥

आजिचा दिवस धन्य मज झाला । सद्गुरु भेटला पत्रासवे ॥ ७४ ॥
मज माजी प्राणी पवित्र जे होती । ते दोष लागती माझे अंगी ॥ ७५ ॥
ऐका रंगमूर्ती सांगावे निरोपा । नमस्कार बापा तुकोबासी ॥ ७७ ॥

येणे परी जान्हवीने । अंतरी सद्‌गदित होऊन । रंगमूर्तीस नमून । प्रत्युत्तर पत्रिका दिधली ॥ ७८ ॥ पत्रिका घेऊनि रंगमूर्ती । यात्रा सर्व संपविती । स्वस्थाना निघाले मागुती । येऊनि पातले देहुसि ॥७९॥ तुकारामासी भेटले । जान्हवीचे पत्र दिधले । वर्तमान सर्व कथिले । प्रेमे भेटले परस्पर ॥ ८० ॥ तेथुनि निघाले झडकरी । निगडीते पातले निर्धारी । यात्रेची सांगाता केली पूरी । निजानंदी तल्लीन ॥ ८१ ॥ सद्‌गुरु महिमा अद्‌भुत । स्वानंदे अखंड रमत । नमन श्रीरंगमूर्तीप्रत । करुनि अध्याय संपविला ॥ ८२ ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदासकृत । सप्तदशोध्याय गोड हा ॥ ८३ ॥

॥ श्रीसद्‌गुरु निजानंद रंगनाथस्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरुनाथार्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरु निजानंदार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ सप्तदशोध्यायः समाप्तः ॥



# ॥ अध्याय १८ वा ॥

॥ ॐनमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री रंगमूर्तयेनमः ॥

॥ जयजयाजी रंगराया । अनंत रूपा स्वामिया । एकदंतरुपी करुणालया । जगद्‌वर्या गजानना ॥ १ ॥ अनादिरुपा श्रीनिवासा । परात्परा गुणाधीशा । चैतन्य रुपा सर्वेशा । श्रीरंगा गुरुमूर्ती ॥ २ ॥ रामनामे करून । वाल्या झाला पावन । शतकोटी रामायण । रचिता जाहला ॥३॥ नारायण नाम उच्चारता । अजामेळा उद्धरिला तत्वतः । तैसे श्रीगुरुसी भजता । महापापे भस्म होती ॥४॥

तव नामाची अतर्क्य शक्ती । भक्तिभावे जे नाम घेती । त्या प्राण्यासी सद्गती । महत्व ऐसे नामाचे ।। ५ ।। सर्व विकल्प त्यागून । नाम सेवावे अनन्य । मुक्त सर्व दोषातून । होऊन जाय तत्वता ।। ६ ।। नामकरी सचेतन । नाम करी उद्धारण । नामकरी पवित्र पण । महिमा नामाचा अगम्य ।।७।। तव नामाची गोडी मज । अखंड देई रंगराज । दासाचे पुरवी चोज । आणिक नलगे मज कांही ।। ८ ।। तव नामे माझी मती । अक्षय गुंगवी रंगमूर्ती । देह भावासी विश्रांती । तव नामे होईल ।।९।। श्रीगुरुरंगामाय । आनंद सांप्रदाया तू गाय । वत्सालागी उपाय । प्रेम पान्हा पाजिसी ।। १० ।। तेणे तृप्ती होती मानसी । अखंड ध्यान तव रुपासी । देऊनि निज दृष्टीसी । गुरुराया उद्धरिसी ।। ११ ।। नाना परीचे काष्ठ । अग्नीत टाकिता स्पष्ट । होता सर्वदा वरिष्ठ । भस्म पवित्र योगिया ।। १२ ।। तयाते योगी सेविती । मग अनुष्ठाना बैसती । तैसी कृपा तव प्राप्ती । श्रीगुरु राजा ।। १३ ।। काष्ठ तव असती नाना । परी अग्नीस्पर्श भस्म जाणा । सहवासे पवित्रपणा । आपोआप येतसे ।। १४ ।। ऐसे तुझे पवित्र नाम । सर्वदा सेविती जे निष्काम । तया लाभे



पुरुषार्थ परम । श्रीसद्गुरुराज या ।। १५ ।। तव नामाची महती । अगाध कीर्ती वेद वर्णिती । श्रीगुरुकृपा वेद वर्णिती । प्रेम मानिती सर्वस्वे ।। १६ ।। जो जो करावे तुझे नामःस्मरण । मनासी येतसे उल्हासपण । आधी व्याधी निरसून । नामःस्मरणी तल्लीनता ।। १७ ।। गताध्यायी कथन । श्रीरंगमूर्ती यात्रा करुन । तुकारामाची पत्रिका नेऊन । भागिरथीसी दिधली ।। १८ ।। उत्तर पत्रिका घेऊन । तुकोबासी केली अर्पण । कथिते झाले वर्तमान । जान्हवीच्या निरोपा ।।१९।। निगडी ग्रामासी रंगमूर्ती । कांही काळ विश्रांती घेती । ध्याऊनी श्रीदत्तमूर्ती । आत्मानंदी तल्लीन ।।२०।। निर्गुणपुरी अखंडीत । स्वामी वास्तव्य करीत । निजानंदे पूर्ण भरित । आनंदे वर्तती ।। २१ ।। तो अकस्मात झाले स्मरण । रामदास स्वामीचे दर्शन । हेतु झालासे जाण । भेट घेणे म्हणुनि ।। २२ ।। उठोनिया प्रातःकाळी । श्रीरंगमूर्ती गुरुमाऊली । साताऱ्यासी निघाली । समर्थ भेटी कारणे ।। २३ ।। अश्वारोहण करुनि । साताऱ्यास आले त्वरेने । समर्थासी नमुनी । क्षेम कुशल वदताती ।। २४ ।। रामदासास अलिंगती । परस्परा आनंद स्फूर्ती । एकमेका बोलती ।

जगदोद्धारकारणा ।। २५ ।। रामदास आणि रंगमूर्ती । एकांती गुजगोष्टी सांगती । समर्थ रंगोबाते म्हणती । एक तुम्हा सांगतो ।। २६ ।। वेदांत कथा अन्यासी । करु नये अभक्तासी । विपर्यास करिती अर्थासी । तत्व मनी न ठरावे ।। २७ ।। कीर्तनी असावे सावध । श्रोते पहावे शुद्ध बुद्ध । समय देखोनि उचित । त्यारीती भाषण करावे ।।२८।। अन्ययातीसी वेदांत वदता । उपहास होईल तत्वता । संकटी घालिती वृथा । ऐसे कदा न कीजे ।। २९ ।। ऐकोनि रंगनाथ योगी । अवश्य म्हणती समर्थालागी । निरोप घेवोनिया वेगी । निघाले त्वरीत निगडीते ।। ३० ।। चार दिवस क्रमोनी । निघाले वेरुळा लागोनि । घृष्णेश्वर यास्थानी । दर्शनासी पातले ।। ३१ ।। घृष्णेश्वर स्थान अलौकिक । दर्शना येती भक्तभाविक । दर्शनें प्राणी होय मुक्त । महापवित्र स्थान ते ।। ३२ ।। तेथे पर्वता माजी जाण । लेणी सुंदर जगमान्य । कोरीव कौश्यल्य परिपूर्ण । देखताची मन उल्हासे ।। ३३ ।। त्या लेण्याची अपूर्व शोभा । कैलास आणि इंद्रसभा । मूर्ती मनोहर लावण्यगाभा । आनंदे मन तृप्त होय ।।.३४:।। तये घृष्णेश्वर स्थानासी । क्रमिते झाले सप्तकासी । तेथुनि आले राजनगरासी ।



वास्तव्य केले तयेस्थानी ।। ३५ ।। तेथे यवन भूप राज्य करी । दयाशील भक्त निर्धारी । आत्मानात्म विचारी । तये रीती वर्ततसे ।। ३६ ।। राहुनि तया नगरात । कीर्तन करिती रंगनाथ । तो राजा येऊनि अकस्मात । कीर्तन श्रवण करितसे ।। ३७ ।। स्वामी करिती कीर्तन । कीर्तनी तन्मय झाले मन । वेदांत विषय प्रतिपादन । करिते झाले तेधवा ।। ३८ ।। समर्थांनी कथीले जे गूज । त्याचा विसर झाला सहज । तल्लीन झाला समाज । कीर्तन रंगी तेथवा ।।३९।। नर देहासी दुर्लभ । ज्ञान मार्ग सुलभ । संत दर्शनी हा लाभ । पद्मनाभ जोडिला ।। ४० ।। या वाक्यावरी जाण । स्वामी करिती विवेचन । तटस्थ झाला श्रोतृ गण । राजा मनी संतोषे ।। ४१ ।। राजा मनी विचार करीत । स्वामी वदतो ते सत्य । संत दर्शनी लक्ष्मीकांत । अवश्य भेटेल ।। ४२ ।। रंगनाथ स्वामी महाविरक्त । साधु म्हणती जन समस्त । याची पहावी प्रचीत । विचार मनी दृढ केला ।। ४३ ।। जेव्हा भेटेल रुक्मिणीकांत । तेव्हांच सोडीन रंगनाथ । नातरी ठेवीन अटकेत । गुप्त दूतासी कथियेले ।। ४४ ।। सामोग्री लागेल स्वामीसी । ते ते देईन निश्चयेसी । अवज्ञा होताच तुजसी । दंडीन

जाण तात्काळ ॥ ॥ एके दिनी रंगनाथ । दूतास सांगती वृत्तांत । उदईक जाणे आम्हाते । निर्गुणपुरासी ॥ ४६ ॥ दूत बोलती स्वामीसी । भूप आज्ञा आहे ऐसी । भेटवी रमाविलासासी । तेव्हां तुम्हास मुक्तता ॥ ४७ ॥ ऐकुनि तयाची वाणी । स्वामी विचारी अंतःकरणी । अद्वैत वेदांत वाणी । अभक्तासी निरोपिली ॥ ४८ ॥ समर्थे सूचना केली । परी विस्मृती झाली । स्मरोनि दत्तमाऊली । निमग्न राहे योगीराजा ॥ ४९ ॥ इकडे समर्थ रामदास । नमन करीता श्रीरामास । ध्यानस्थ होऊनि चित्तास । वर्तमान सर्व समजले ॥ ५० ॥ माझे प्रेमळ रंगोबासी । राये ठेविले अटकेसी । मुक्तता करू वेगेसी । चमत्कार तया दावोनिया ॥ ५१ ॥ दोन प्रहर रात्रीसी । समर्थ आले राजपुरीसी । करिते झाले प्रवेशासी । राजमहाली तेधवा ॥ ५२ ॥ सप्तखणी वरती । पत्नी राजा बसती । तव कानी शब्द ऐकिती । जयजय रघुवीर समर्थ ॥ ५३ ॥ उठोनि राजा पहात । दिगंबर रुपे समर्थ । तेजःपुंज भव्य दिसत । एका एकी पाहिले ॥ ५४ ॥ राजा नमस्कार करी तयाते । जोडोनिया उभय हस्ते । नामाभिधान

दासाते । निरोपावे स्वामिया ॥ ५५ ॥ समर्थ म्हणती तूं चिंतन । कोणाचे करिसी जाण । येरु म्हणे भगवंत स्मरण । दर्शना कारणे करितसे ॥ ५६ ॥ समर्थ म्हणती तया नारायणाचे । दास आम्ही निश्चयाचे । मनकाम भक्तांचे । पुरविणेसी पातलो ॥ ५७ ॥ आमच्या श्रीरंगमूर्तीसी । तुम्ही ठेविले अटकेसी । दर्शन इच्छा पुरविणेसी । आलो जाण या ठाया ॥ ५८ ॥ तुज दर्शनाचा असेल हेत । मजसवे चलावे त्वरित । मी ज्या मार्गे जात । येई झडकरी दर्शना ॥ ५९ ॥ ऐसे वदोनि समर्थ । उडी टाकिली दरीत । राजा अवलोकुनी जव पहात । अदृष्य झाले लवलाही ॥ ६० ॥ आश्चर्य वाटले राजासी । पश्चाताप झाला तयासी । न कळे प्रभू लीलेसी । दंग झाला मनी तो ॥ ६१ ॥ म्हणे स्वप्न तरी सत्य । मजसी बोलले समर्थ । जाऊनिया स्वामीप्रत । अपराध क्षमा मागावी ॥ ६२ ॥ येवोनिया रंगस्वामीप्रती । आनंदे लोटांगणे घालती । प्रेमाश्रू नेत्री वाहती । अभिमान ग्रंथी गळाली ॥ ६३ ॥ अंतरी पाहती रंगमूर्ती । उमजले मनी समर्थ कृती । सद्गदीत झाले चित्ती । आनंद बहू वाटला ॥६४॥

राजा बोले स्वामिसी । व्यर्थ छळिले तुम्हासी । कृपा करावी दासासी । अपराध क्षमा करावा ॥ ६५ ॥ त्याचा भावार्थ देखोन । स्वामी प्रार्थिती समर्था लागुनि । राजावरी दया करोन । कृतार्थ करावे समर्था ॥ ६६ ॥ प्रगटोनिया समर्थ । रंगमूर्तीसी भेटत । श्रीराम दर्शन राजाप्रत । करविले जाण तये क्षणी ॥ ६७ ॥ राजा संतोषला मानसी । आनंद झाला सर्वांसी । जोडोनिया बद्ध करेसी । विनविता झालासे ॥ ६८ ॥ महाराज मी अन्यायी । क्षमा करावी सद्‌गुरुमाई । चरणी लीन झाला पाही । यवन राजा तो ॥ ६९ ॥ बोधोनिया तयासी । निघाले तेव्हा दक्षिणेसी । समर्थ स्वामी शिवाजीसी । कथिती सर्व वृतांत ॥ ७० ॥ हरिहर अवतार पूर्ण । अवतरले धर्म रक्षण । स्वस्वरुपी निमग्न । अखंड विचरतसे ॥ ७१ ॥ स्वामी आले निगडीसी । आनंद सर्व जनासी । रामदास सज्जनगडासी । जाते झाले तेधवा ॥ ७२ ॥ श्रीगुरुराज रंगमूर्ती । लीला दावी जनाप्रती । अघटित प्रगटली कीर्ती । गुण वर्णिती सकल जन ॥ ७३ ॥ दर्शनास येती अवघे नर । चरित्र वर्णिती सादर । कीर्ती

प्रगटली महीवर । पावन होती तत्काळ ॥ ७४ ॥ श्रीरंगमूर्ती कृपेने । ग्रंथ वदवी स्वलीलेने । त्याचा तोचि वदविता जाण । त्याचे चरणी अर्पण हे ॥ ७५ ॥ स्वस्तिश्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदास कृत । अष्टादशोध्याय गोड हा ॥ ७६ ॥

॥ श्री सद्‌गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्री सद्‌गुरु नाथार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ अष्ठदशोध्यायः समाप्तः ॥

## ॥ अध्याय १९ वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

॥ जयजयाजी श्रीगुरुनाथा । महापुरुषा त्रिगुण तापरहिता । भव ताप संहारिता । नमन तुला सद्‌भावे ॥ १ ॥ देह पिंडाची रचना । तेचि ब्रह्मांडी असे जाणा । परी तुझे कृपेविणा । साध्य न होय गुह्यार्थ ॥ २ ॥ मनाचे संकल्प विकल्प सदैव । करी अंतःकरण चतुष्टय सर्व । भव मोह माये माजी सर्व । भ्रमता हे मन हि ॥ ३ ॥ मन बुद्धि चित्त अहंकार । मनाचे मागे धावती



फार । एक मन होता स्थिर । आपोआप सर्व विरताती ॥ ४ ॥ बिंदुस्थानी अष्टदळ । जीव तो हंस केवळ । यामुळे मन ते प्रबळ । विषयबद्ध जाहले ॥५॥ अष्ट पाकळ्या म्हणजे काय । हर्ष विषाद होय । भय आनंद स्नेह । उत्साह मान्यता आणि प्रीती ॥ ६ ॥ जीव अष्टदळी करी भ्रमण । तो मनासी येतसे स्फुरण । संकल्प विकल्प मोहे जाण । भ्रम होत निर्धारी ॥ ७ ॥ जोवरी जीवाचे जीवपण । तोवरी हे चाले भ्रमण । शिवासि होता संलग्न । सर्व भाव मावळती ॥ ८ ॥ मन बुद्धि चित्त अहंकार । शिवस्वरुपी तदाकार । होताची भ्रम होय दूर । सर्व भाव मावळती ॥ ९ ॥ बिंदू ते आकाररुप । त्यासी निराकार शिवस्वरुप । होताची दोन्ही ऐक्य रुप । सर्व भाव मावळती ॥१०॥ त्या शिवस्वरुपी सद्‌गुरु नाथा । जीवरुपी तोडी अहंममता । तुझे कृपेवीण ताता । न जाय विलयासी ॥ १ ॥ एक तुझी कृपा होता जाण । माया भ्रम जाय निरसून । जीव शिव एक पण । होऊनि जाय तत्वता ॥ १२ ॥ हेचि देई गुरुमूर्ती । चरण सेवा अखंड रीती । तव नामी माझी मती । तिष्ठत राहो सर्वदा ॥ १३ ॥ गताध्यायी कथन । श्रीरंगमूर्ती राजनगरीहून । यवन राजासी

करुनिपावन । समर्थासह पातले ॥ १४ ॥ स्वामी निगडीस आले । स्वस्थानी राहिले । कांही काळ क्रमिले । उभयतांनी ॥ १५ ॥ एके दिनी :रंगनाथ । समर्थ भेटोसी जात । तो अकस्मात समर्थ । भेटी कारणे पातले ॥ १६ ॥ दोघेही एका वेळी । पातले कृष्णेजवळी । तो अपार भरती जलीं । मार्ग तात्काळी बंद झाला ॥ १७ ॥ समर्थ म्हणती रंगोबासी । मार्ग नसे जावयासी । पूर आला कृष्णेसी । जाऊ त्वरेसी पैलतीरा ॥ १८ ॥ समर्थे केला चमत्कार । आसन टाकिले जलावर । कृष्णेच्या पैलपार । जाते झाले तेधवा ॥ १९ ॥ जन पाहती समस्त । म्हणती रामदास योगी समर्थ । निरपेक्ष भूवरी वर्तत । धन्य धन्य महात्मा ॥ २० ॥ काय अधिकार याचा । आसन टाकोनि गेलेसाचा । मुगुटमणी वैराग्याचा । श्रीसमर्थ रामदास ॥ २१ ॥ रंगनाथ राजयोगी म्हणवीत । तयाचे आश्चर्य बहुत ढोंगी थाट केवळ दिसत । सामर्थ्य नसे परी कांहींच ॥ २२ ॥ ऐसा जनी भावार्थ । जाणोनिया म्हणती समर्थ । यावे त्वरे रंगनाथा । अश्वासहित यावेगी ॥ २३ ॥ तये वेळी रंगनाथ । हृदयी स्मरता सद्गुरुनाथ अश्व घातला जलात । पैलतीरा न्यावया ॥ २४ ॥ अश्व चाले



जलावरी । खूर न भिजे निरी । पैलतीरा गेले सत्वरी । अद्‌भुत लीला दाविली ॥ २५ ॥ सिद्धयोगी रंगनाथ । अश्वासहित चालत । पैलतीरा गेले त्वरित । अद्‌भूत लीला दाविली ॥ २६ ॥ समर्थ म्हणती रंगोबासी । आयुधे कासया ठेविसी । बाण भाते पृष्ठीसी । उगाच करिसी ढोंगाते ॥ २७ ॥ कैसा मारिसी तीर । मज दाखवी सत्वर । आकाशी फिरते घार । बाण लावी तियेसी ॥२८॥ आज्ञा वंदुनि गुरुवर । धनुषी लाविला तीर । नेम धरिला घारीवर । घिरटी घाली आकाशी ॥ २९ ॥ आकाशी घार घिरटी । घालितसे कृष्णा तटी । बाण लागला समेष्टी । सन्मुख पडली समर्थाच्या ॥ ३० ॥ बाण छेदे करून । रुधिर वाहे जाण । घार पडली पतन । तया काळी ॥३१॥ समर्थ म्हणती रंगराया । अससी कैसा अन्याया । हत्या घेसी लवलाह्या । जीव जंतू वधोनि ॥ ३२ ॥ हे तुवा केले अनुचित । तुम्हासी :नव्हे उचित । हत्या घडली जाण सत्य । रंगराया तुजसी ॥ ३३ ॥ हास्य वदनी रंगनाथ । बोलती स्वामी समर्थांते । कर्ता करविता तो सत्य । वेगळाची असे ॥३४॥ जयाचे सत्ते जाण । विचरती हे त्रिभुवन । अणुरेणू प्रमाण । प्रभू आज्ञे चालतसे ॥ ३५ ॥ मजला कासया पाप । अखंड स्वरुपी निष्पाप । वसतसे निर्विकल्प । जगामाजी ॥ ३६ ॥

समर्थ म्हणती तयासी । व्यर्थ गप्पा कां मारिसी । प्रायश्चित्त घेणे तुजसी । तरीच शुद्धी तुज होय ॥ ३७ ॥ ऐसे वदोनि रंगनाथाते । वेगे पाचारिती द्विजाते । म्हणती या पातकातें । प्रायश्चित्त काय ते सांगा ॥ ३८ ॥ तेथे शास्त्री पंडीत । ग्रंथ अवलोकुनिया वदत । म्हणती यास उत्तरांग प्रायश्चित्त । घ्यावे लागेल ॥ ३९ ॥ क्षौरविधी करुनिया । शास्त्रोक्त विधी विधाने तया । ब्राह्मण भोजन करुनिया । तरी शुद्धी यासी पैं ॥ ४० ॥ तव वदती रंगनाथा । प्रायश्चित घेतो मी सत्य । परी घार उठवावी त्वरित । मग मी शुद्ध जाहलो ॥ ४१ ॥ ब्राह्मण वदती तयासी । हे तो न उठे कवणासी । पातकास्तव प्रायश्चित्तासी । शास्त्रे वर्णिले आहे ॥ ४२ ॥ तव म्हणती रंगनाथ । व्यर्थ कासया प्रायश्चित्त । घार निमाली न उठत । तरी खटाटोप व्यर्थ सारा ॥४३॥ रामदास म्हणती रंगोबासी । द्विजाते व्यर्थ कां छळसी । घारीस धाडी निजधामासी । तिष्ठत राहिली तव आज्ञे ॥ ४४ ॥ अवश्य म्हणोनि रंगनाथ । श्रीगुरुदत्त नामे गर्जत । अमृत हस्त फिरवीत । तया घारीवरी ॥ ४५ ॥ हस्त स्पर्श होताच जाण । तत्काळ उठली पक्षीण । अंतराळी गेली उडोन ।



एक क्षण न लागता ॥ ४६ ॥ आश्चर्य मानिती द्विजवर्य । म्हणती हे अद्‌भुत झाले कार्य । रंगनाथ स्वामी गुरुवर्य । अतर्क्य शक्ती तयाची ॥ ४७ ॥ लीला देखोनि रामदास । आनंदेडोले सुखास । रंगनाथ परम पुरुष । जगा लागी दावीतसे ॥ ४८ ॥ प्रेमालिंगन एकमेका । परस्परे निवती देखा । ब्रह्मास्वादा अलौकिका । निरंतर राहती ॥ ४९ ॥ दोघे अदृश्य होऊन । गेले स्वस्थाना आपण । भूवैकुंठ असे स्थान । निर्गुण ग्राम पुण्य क्षेत्र ॥ ५० ॥ तया क्षेत्राचा महिमा । काय वर्णावा निजप्रेमा । अद्वैत बोध निरुपमा । साक्षात् परब्रह्म अवतरले ॥ ५१ ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंग कृष्णदास कृत । एकोर्णविंशती अध्याय गोड हा ॥ ५२ ॥

॥ श्रीरंगनाथर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरु निजानंद रंगनाथस्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरुनाथार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ एकोर्णविंशती अध्यायः समाप्तः ॥

# ॥ अध्याय २० वा ॥

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ जयजयाजी सद्‌गुरु हंसा । चिद्रुपमूर्तीपरमविलासा । सच्चिदानंदा विकासा । पूर्ण परेशा गुरुवर्या ॥ १ ॥ तू ज्ञानसागर पूर्णचंद्र । अज्ञान तमहारक राजेंद्र । मी याचक चरणारविंद । तिष्ठत असे अहर्निशी ॥ २ ॥ एक तुझी कृपा बरवी । माया भ्रम सर्व हरवी । अखंड तव नामी रमवी । चित्तासी माझे सदोदित ॥ ३ ॥ मन तव चरणी लुब्धले । चित्त नामी गुंतले । बुद्धिने ध्यान धरिले । अहंकार स्वरुपी मिळाला ॥ ४ ॥ पंचभूतात्म देह जाण । तव चरणी झाला लीन । तव सेवे वाचुन । आण कांही न सुचे ॥ ५ ॥ पंच ज्ञानेंद्रिये बरवी । तव रुपाची गाती थोरवी । पंच कर्मेंद्रिये सर्वी । तव सेवेसी तल्लीन ॥ ६ ॥ काया वाचा मन । तव पदी असे अर्पण । हेच देई वरदान । तव सेवा घडे सर्व काळ ॥ ७ ॥ श्रवणाचे श्रवणपण । तव गुणी गेले रंगोन । नयनाचे देखणेपण । तव रुपी जाण स्थिरावले ॥ ८ ॥ वाचा झाली सद्‌गद । निःशेष खुंटला शब्द । होऊनि राहिले स्तब्ध । शब्द न फुटे बोलावया ॥ ९ ॥ ऐसी झाली एकात्मता । हरपली देह ममता । तुटले द्वंद्वातीता । स्वयं प्रकाश भरलासे ॥ १० ॥ सर्वात्मक पूर्व स्थिती । तव कृपे लाभली अवचिती । जंव वरी देह ममता होती । गुप्त होती हृदय संपुटी ॥११॥ तव कृपे सद्‌गुरुराया । हारपली देह माया । ज्ञानसूर्य आला उदया । प्रकाशमान झालो मी ॥ १२ ॥ आत्मा अविनाशी सर्वदा । देहसंगे पावला आपदा । अज्ञानत्वे या बोधा । गुंतलो होतो गुरुराया ॥ १३ ॥ आत्माराम तू चिद्घन । तुजसी नसें देह संपर्क जाण । हे आमचेच अज्ञान । निरसलेसी गुरुराया ॥ १४ ॥ असो गताध्यायी

कथन । कृष्णाजल उल्लंघुन । बाणे घारीसी छेदून । उठविली जाण तात्काळ ॥ १५ ॥ तेथून आले सद्‌गुरु । निगडीस आले सत्वर । तव अंतरी आला विचार । केशवस्वामी भेटावे ॥ १६ ॥ तव एके दिनी रंगनाथ । प्रातःकाळी उठोनि त्वरित । चालले तेव्हा आनंदात । पूर्व दिशा लक्षुनि ॥ १७ ॥ मनोहर नामे अश्व सुंदर । तयावर झाले स्वार । अश्वासी वदतो रंगचतुर । चाल भागानगरासी ॥१८॥ सूर्यास्त समयासी । पातले भागानगरासी । केशवस्वामी स्थानासी । आले वेगे गुरुराज ॥ १९ ॥ पाहुनिया रंगमूर्ती । केशवस्वामी आनंदले चित्ती । येऊनि भेटले अति प्रीती । परस्परा आनंद ॥ २० ॥ क्षेम आलिंगन देऊनि । प्रेमे बोलती मधुर वचनी । रंगराया तुज देखोनि । हर्ष झाला मज भारी ॥ २१ ॥ तव भेटीची इच्छा मज । झाली कासया आज । हेतु पुरविला गुरुराज । दर्शन तुम्ही देऊनि ॥ २२ ॥ मम मनी एक विचार । श्रवण करावे कीर्तन मनोहर । श्रीहरी नामे जयजयकार । वदनी परिसावा ॥ २३ ॥ श्रीरंगा करावे कीर्तन । सज्जनी निववावे मन । आनंद होय सर्वा लागुन । श्रीगुरुरंगराया ॥२४॥ अवश्य म्हणोनि रंगनाथ । उभे राहिले त्वरित ।



कीर्तनी मंगलाचरण गात । श्रीदत्तासी आळवीतसे ॥ २५ ॥ मात कळली नगरात । रंगमूर्ती कीर्तन करित । केशवस्वामी मंदिरात । म्हणोनिया जनासी ॥ २६ ॥ स्वामी कीर्तन श्रवणासी । अबाल वृद्ध लोटले खासी । कीर्तन गोडी सर्वासी । सर्व :झालें तल्लीन ॥ २७ ॥ पूर्वरंग प्रतिपादन । वेदांत विषय अति गहन । ऐकताची श्रोते मोहून । गेले जाण तेधवा ॥२८॥ उत्तररंग कृष्णचरित्र । जे का परम पवित्र । नाम घेताची सर्वत्र । उद्धरिती तत्वता ॥ २९ ॥ त्या कृष्णचरित्रामाझारी । राधाविलास मनोहारी । कथा पावन निर्धारी । रंगमूर्तीने आरंभिली ॥ ३० ॥ आधीच रंगमूर्ती पूर्णब्रह्म । राधाविलास कथा परम । स्वामी सांगती सप्रेमे । काय नवलाई वर्णावी ॥ ३१ ॥ रंगमूर्तीचे वक्तृत्व । निजानंदे रसभरित । सावध परिसोन श्रोतृभक्त । अवधान द्यावे कथेसी ॥ ३२ ॥ साक्षात परब्रह्म जाण । अवतरलें जगी आपण । उद्धारावया मूढ जन । साक्षात तो भगवान आला असे ॥ ३३ ॥ असुरानी प्रळय मांडिला । गोब्राह्मण छळ केला । भार झाला धरणीला । शरण गेली अनंता ॥ ३४ ॥ शेषशाई नारायण । अभय देई मती लागुन । देवकी उदरी येऊन । तवभार

उतरीतो ॥ ३५ ॥ देवकी उदरी जन्मले । गोकुळी येऊनि क्रीडले । लीला नाटक दाविलें । धन्य व्रजवासी महाभाग ॥ ३६ ॥ तये गोकुळामाजी जाण । राधा नामे गवळण । मोहिलें तिने कृष्ण मन । तन्मय झाली कृष्णरुपी ॥ ३७ ॥ राम अवतारी इच्छा धरिली । परी नाही फलश्रुती झाली । कृष्णावतारी पुरविली । वरदाने करुनिया ॥ ३८ ॥ मथुरेहुन द्वारकेत । यादव नेले समस्त । राधाही आली तेथ । कृष्णभक्ती कारणें ॥ ३९ ॥ एके दिनी कृष्णासी । राधेने नेले मंदिरासी । अत्यानंदे प्रेमेसी । कृष्ण अंकी बैसली ॥ ४० ॥ साठ सहस्त्र वर्षे जाण । तपश्चर्या केली अतिगहन । तेचि फळ आले जाण । भाग्यवान राधिका ॥ ४१ ॥ राधेने नेऊनिया श्रीकृष्ण । हृदयमंदिरी ठेविला जाण । देखोनिया एकांतपण । प्रेमविलास मांडिला ॥ ४२ ॥ शुद्धभावाचा विडा करून । कृष्णमुखी घातला जाण । येरे प्रेमे कुरवाळून । काय वदती राधेसी ॥ ४३ ॥ कृष्ण म्हणे राधे सुंदरी । तांबुल घेई मम करी । हस्त ठेऊनि स्कंधावरी । मुखी घातला राधेच्या॥४४॥ राधा म्हणे जगजीवना । पुराणपुरुषा नारायणा । सुरत मेघा आनंदघना । राजीव नयना प्राणपती ॥ ४५ ॥ तुझे

प्राप्तीस्तव श्रीहरी । कष्ट भोगिले नानापरी । पूर्व पुण्याई मम खरी । म्हणुनि चरण लाभले ॥४६॥ तुज पहावया राजीवनयना । त्रिभुवन शोधिले मी जाणा । परी तुझा ठावठिकाणा । कोणी मजसी न बोले ॥ ४७ ॥ ब्रह्मादिक देवगण । त्यासी न कळे तुझी खूण । योगी गेले भ्रमून । योगाभ्यासा माझारी ॥ ४८ ॥ तपस्वी तपश्चर्येसी । गुंगुन गेले अहर्निशी । यज्ञ यागादि कर्मासी । कर्मठ जाण गुंतले ॥ ४९ ॥ चार सहा अठरा जण । वर्णिताती तुझे गुण । तयासी तूं नारायण । अंत लागो नेदीच पैं ॥ ५० ॥ भक्तहृदयामाझारी । तूं तेथे तिष्ठसी निर्धारी । ऐसे जाणोनि श्रीहरी । संत चरणी विनटले ॥ ५१ ॥ त्यांचे कृपा प्रसादे करुन । लाभले ते तुझे चरण । आजि कृतार्थ झाले जाण । तव दर्शने श्रीकृष्णा ॥ ५२ ॥ आपण तांबुल मुखी घातला । मम स्कंधी हस्त ठेविला । उद्धरले मी दीनानाथा । तुमचे कृपा प्रसादे ॥ ५३ ॥ कृष्ण म्हणे राधिकेसी । मी संतुष्ट तुझे भक्तिसी । प्रसन्न झालो मी तुजसी । अपेक्षित वर मागे ॥५४॥ राधा म्हणे श्रीधरा । मजसी उद्धरिले भूधरा । अंगीकार केला दीनोद्धारा । या दीन अबलेचा ॥ ५५ ॥ तरी हेचि स्वामी मज द्यावे । अखंड मजपाशी

रहावे । तुमचे अर्धांगी बैसावे । युगानयुगी स्वामिया ।। ५६ ।। तुम्हा नाम रुक्मिणीरमण । तैसेचि देई वरदान । राधाकृष्ण या नामे करुन । निरंतर असावे ।। ५७ ।। हेचि इच्छा मानसी । आहे गा हृषिकेशी । पावन करावे दासोसी । तव नामामृते करुनिया ।। ५८ ।। तुज म्हणती भक्त शिरोमणी । भक्तांच्या पुरविसी कामना । हीच इच्छा मम मना । पूर्ण करी श्रीकृष्णा ।।५९।। तथास्तु म्हणती कृष्णनाथ । तुझे नामे बोलतील समस्त । ते पापापासून मुक्त । तत्काळ होतील ।। ६० ।। राधाकृष्ण नामे करून । प्रेमे वदतील सकल जन । हेचि आवड मजलागून । झालो असे सुंदरी ।।६१।। जे उच्चारिती राधाकृष्ण । होतील सर्व ते पावन । त्रिभुवन जाय उद्धरून । तव नामे करुनिया ।। ६२ ।। जन्मा येवोनिया जाण । करी जो राधाकृष्ण स्मरण । तयासी मी वैकुंठभुवन । प्राप्त करी निश्चये ।। ६३ ।। सर्व नामात विख्यात । राधागोविंद जाण सत्य । स्मरे त्यासी मुक्ती प्राप्त । तत्काळ होईल जाण पा ।। ६४ ।। जे अहर्निश करिती गजर । ते माझे सखे सहोदर । त्यांचे ठायी मी निरंतर । वसतसे जाण-पा ।। ६५ ।। भक्तिभावे जे नाम वदती । तयासी मम पद प्राप्ती । मम स्वरुपी



निश्चिती । येऊनि मिळती तत्काळ ।। ६६ ।। ऐसे वरदान राधिकेसी । देवोनि संतोषविले तिजसी । भक्ताधीन हृषीकेशी । भक्त वचनी गुंतला ।। ६७ ।। ऐकोनिया श्रीहरी वचन । आनंदली राधा जाण । सद्भावे करी नमन । श्रीहरीसी तेधवा ।। ६८ ।। हाती घेऊनि पुष्पमाळा । घातली श्रीरंगाचे गळा । विडा घेऊनि ते वेळा । कृष्ण मुखात घालितसे ।। ६९ ।। सुवासिक उटी केशरी । लावी श्रीरंगाचे शरीरी । पुजोनिया श्रीहरी । पंचारती करी प्रेमभरे ।। ७० ।। ऐसे श्रीराधाकृष्ण आख्यान । स्वामी करिती प्रेमाने । ऐकोनिया ते सर्वजन । प्रेमानंदे डुलती ।। ७१ ।। प्रेमानंदे करिती कीर्तन । तन्मय झाले श्रोतृगण । स्वामी देहभान विसरोन । तल्लीन झाले प्रेमात ।। ७२ ।। केशव–स्वामी आनंदित । धन्य म्हणती रंगनाथ । कृष्ण चरित्र अद्भुत । सर्व गजर पै केला ।। ७४ ।। पाहुनिया यवन भूपासी । केशवस्वामी वेगेसी । बैसविले राजयासी । कीर्तन श्रवण करावया ।। ७५ ।। कृष्ण चरित्र परिसोन । राजा गेला हरपोन । बोलतसे वचन । ते अवधारा भाविक हो ।। ७६ ।। विलोकुनि सर्व सभेसी । बोलतसे प्रधानासी । कीर्तनी राधाविलासी । मन सर्वांचे निमग्न

झाले ॥ ७७ ॥ तरी या भिंतीवरती । राधाकृष्ण चित्रे लिहिले ती । श्रीकृष्णाने राधेप्रती । तांबूल नेवोनि द्यावा पै ॥ ७८ ॥ तो घेऊनि मूर्तीमंत । सेवन करितील सत्य । तरीच कथार्थ । सत्य आम्ही मानू पै ॥ ७९ ॥ ना तरी व्यर्थ बडबड । केलेबद्दल दंड । घेऊ जाण रोकड । ना तरी अन्य शिक्षा करुं ॥८०॥ कीर्तनी जे आले लोक । प्रत्येकास दंड देख । पन्नास रुपये रोख । नंतर सोडा प्रत्येकास ॥ ८१ ॥ ऐसे न होय जरी । स्वामीसी न सोडा निर्धारी । ऐसी प्रधानासी आज्ञा करी । राजा यवन तो तेधवा ॥८२॥ ऐकोनि राजाचे वचन । भयभीत झाले सकल जन । विघ्न ओढवले पूर्ण । श्रीहरी लज्जा संरक्षी ॥८३॥ राजाचा विपरीत हट्ट । परि ते महासंकट । न होणारी जी गोष्ट । कैसी होईल त्या ठाया ॥ ८४ ॥ आजपासुनी कीर्तनी । कदा न यावे निश्चय मनी । नाना परीची विघ्ने येऊनी । पुढे उभी ठाकती ॥ ८५ ॥ एक म्हणे मम पतीसी । न विचारता आले कीर्तनासी । हे कळता जरी तयासी । प्राण आमुचा घेईल ॥ ८६ ॥ एक वदे ललना । आमचे घरी दारिद्र्य जाणा । जन्मापासून वस्त्रा-अन्ना । दुष्काळ आम्हा जाणिजे ॥ ८७ ॥ एक म्हणती पोटावरी । राबतो



आम्ही इतरा घरी । त्यांचे कृत्ये सारी । अन्नालागी करितसे ॥ ८८ ॥ एक म्हणती आम्ही चाकर । वेतन न मिळे भरपूर । गृही स्त्रियादि परिवार । त्यांचे कैसे करावे ॥ ८९ ॥ आता आम्ही काय करावे । स्वामीजी सांगावे बरवे । कीर्तनासी जरी न यावे । तरी महत् पातक लागेल ॥ ९० ॥ कीर्तनी विन्मुख राहता । श्रीहरी अंतरेल अवचिता । ऐसे म्हणोनि सर्वथा । दुःख सागरी बुडाले ॥ ९१ ॥ ऐसे संकट जाणोन । सर्व करिती रुदन । तयाची करुणा ऐकून । श्रीरंगमूर्ती बोलतसे ॥ ९२ ॥ अरे भय न धरा कांही । होणार ते सर्व होई । लक्ष ठेवा श्रीहरी पायी । तयाचे नामे विघ्ने नासती ॥ ९३ ॥ श्रीदत्तगुरु समर्थ । भक्ताचे पुरवी आर्त । तुम्ही स्वस्थ करुनिया चित्त । अवधान द्यावे कथेसी ॥ ९४ ॥ ऐसे म्हणूनि जनासी । स्वस्थ केले मनासी । संकट निरवावयासी । धावा प्रभूचा मांडिला ॥९५॥ श्रीहरी माधवा वामना । भक्त आले कथा श्रवणा । संकट आले सर्वांना । तव गुणा श्रवण करिता ॥९६॥ तुझे नाम पतित पावन । तव नाम भव तापहरण । तुझे करिता नाम संकीर्तन ।

महादोष सर्व जाती ॥ ९७ ॥ गजेंद्राकरिता तुझा धावा । धावलासी वासुदेवा । प्रल्हादाचे भक्तिभावा । अवतरलासी स्तंभात ॥ ९८ ॥ दामाजीस बेदरासी । राजा नेता त्या समयासी । धावोनि तूं तारलेसी । अंत्यजरुपे करुनिया ॥९९॥ जाऊनिया बादशहासी । द्रव्य दिले अपरमितीसी । तव रुपे वेड त्यासी । लाविलेसी दयाळा ॥१००॥ भक्त नामदेव कीर्तनी । मृत गाय दिली टाकुनि । तये वेळी तूं शारंगपाणी । भक्त ब्रीद राखिले ॥१०१॥ संकटे हरिली सर्वांची । मी एक पापराशी । मजमुळें सर्वांसी । ताप बहू होतसे ॥ १०२ ॥ तव गुण गाताची श्रीहरी । संकट पडले अघोरी । ऐसे होईल जगभरी । ब्रीदासी हानी तुझ्याची ॥ १०३ ॥ राजा जातीचा यवन । तयाचे करी समाधान । नातरी ओढवेल विघ्न । दयानिधी दातारा ॥ १०४ ॥ तू आजवरी रक्षिले संत । माझाच का पाहसी अंत । दे सोडोनि सर्व खंत । माधवा धांव लवकरी ॥१०५॥ प्रेमभरे अवचिता श्रीहरीसी । अघटित वर्तलें ते समयासी । पाहती सर्व कौतुकासी । राजाही स्वये देखत ॥ १०६ ॥ चित्री लिहिलेली मूर्ती । प्रत्यक्ष



राधेसी भेटती । हस्त टाकोनि राधा कंठी । मुखी घालिती तांबूल ॥ १०७ ॥ चुंबन घेता प्रेमाने । पीक गळे ते क्षणी । ऐसा चमत्कार पाहुनि । सर्वानंद झालासे ॥ १०८ ॥ राजा घाली नमस्कार । धन्य महात्मा गुरुवर । मी मति मंद अन्यायी थोर । क्षमा करी गुरुराया ॥ १०९ ॥ तव अधिकार नाही जाणला । अजाणपणे छळ केला । महाराजा संरक्षी दयाळा । म्हणोनि चरणी लागला ॥ ११० ॥ केशवस्वामी तये वेळी । आनंदे रंगोबासी भेटली । माझी रंगमूर्ती श्रमविली । म्हणोनि बोलती राजासी ॥ १११ ॥ राजा भयभीत होऊन । केशवस्वामीसी बोले वचन । क्षमा करो गा मजलागुन । सर्व जना मुक्त केले ॥ ११२ ॥ आजपासोनि हरीभजन । निर्विघ्न करा तुम्ही जाण । तुमचा कैवारी नारायण । त्रिभुवनी वंद्य तुम्ही पै ॥ ११३ ॥ रंगमूर्तीसी सन्मानून । राजा करिता झाला गमन । सर्व गेले श्रोतृगण । अरिष्ट निरसिले आनंदें ॥ ११४ ॥ सर्वजण वर्णिती गुण । धन्य महात्मा जाण । अलौकिक दाविले विंदान । सत्पुरुष जाण हा खरा ॥ ११५ ॥ ऐसा राजयोगी भक्त ।

लीला दावितसे त्वरित । पुढील प्रसंग अति रसाळभरित । श्रोते सावध परिसोत ।। ११६ ।। स्वस्तिश्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदास कृत । विंशती अध्याय गोड हा ।। ११७ ।।

।। श्रीसद्गुरु निजानंद रंगनाथस्वामीर्पणमस्तु ।।

।। श्रीसद्गुरुनाथार्पणमस्तु ।।

।। इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ विंशती अध्यायः समाप्तः ।।



# ।। अध्याय २१ वा ।।

।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।

।। श्रीगणेशायनमः ।। श्रीसरस्वत्यैनमः ।। श्रीरंगमूर्तयेनमः ।।

।। जयजयाजी श्रीगुरुराज योगी । जगा लाविसी सन्मार्गी । ब्रह्मज्ञान तव अंगी । निरंतर विचरतसे ।। १ ।। करावया जगदोद्धार । अवतरलासी तूं गुरुवर । बोधोनि शिष्या सत्वर । पैलपारा पावविसी ।। २ ।। जैसी कामधेनु अमृताते । स्त्रवुनि करी तृप्त जगाते । की कल्पवृक्ष दुर्बलाते । कल्पिले सर्व देतसे ।। ३ ।। तैसीच गुरुकृपा श्रेष्ठ । भक्तजनाचे पुरविती अति । भाविक

भोळ्या भक्ताते । निरंतर रक्षितसे ॥ ४ ॥ भक्तांचे हेतु जाणोनि । पुरविसी तू एकयावचनी भवबंध टाकी छेदुनि । कृपार्णवे करुनिया ॥ ५ ॥ देह ममता अनिवार । न सुटे कदापी मोहज्वर । कृपेचि घालुनि पांखर । करविसी त्याग गुरुराय ॥ ६ ॥ देह तव मासाचा गोळा । अस्थी चर्मे असे व्यापिला । पूं शोणिते असे भरला । परी ममता तयांवरी दृढ झाली ॥ ७ ॥ मन बुद्धि चित्त अहंकार । मनच दुष्ट हे अनिवार । मना मागे धावती फार । अंत न कळे देहासी ॥ ८ ॥ संकल्प विकल्प करिती । मनोभावना खेळ खेळती । देह लोभाची ठेवुनि ममती । विचरताती स्वैरपणे ॥ ९ ॥ मनाचे करावया आकलन । देह ममता त्यागावी जाण । षड्रिपूचे करावे निर्दाळण । तरीच मन स्तब्ध होय ॥ १० ॥ हळुहळु लावावा अभ्यास । जागृत रहावे ईशस्मरणास । मनासी लावावा ध्यास । तरीच साध्य होय पूर्णत्वे ॥ ११ ॥ तनमन प्रेमे करुनि । अखंड लावावे ईश्वर चरणी । तरीच होय शुद्ध खाणी । मनाची सत्वर चित्त करुनिया स्थिर । मनाचे चंचलत्व करावे दूर । जखडोनि लावावे श्रीचरणावर । तेथे स्थिरता करावी ॥ १३ ॥ येणे परी क्रमाने । रिझवावे



मतासी नेमाने । श्रीगुरुकृपा अवलोकने । साध्य होय तत्वता ॥ १४ ॥ जंव बरी नाही गुरुकृपा । तववरी सर्व उपाय वृथा । श्रीगुरुकृपेची अगाधता । गुरुपुत्र जाणती ॥ १५ ॥ यालागी श्रीगुरुसी । शरण रिघावे अनन्य भावेसी । कृपाळू निज भक्तासी । उपेक्षीना कदापी ॥ १६ ॥ असो गताध्यायी कथन । केशव स्वामी भागानगरी जाण । स्वामीचे होता कीर्तन । यवन राजे परिसले ॥१७॥ कीर्तनी दाविला चमत्कार । मोहुनि गेला नृपवर । सप्रेमे करुनिया सत्कार । स्वामी आले निज धामा ॥१८॥ निगडीग्रामी रहिवास । करितसे जगन्निवास । बोलावुनि सांप्रदायास । गुज गोष्टी सांगतसे ॥१९॥ चातुर्मास आला सन्निध । अखंड श्रीहरी सेवेत । क्रमावा काळ निवांत । ऐसे मनी वाटत ॥ २० ॥ नित्य श्रीहरी भजन पूजन । ध्यान धारणा हरि कीर्तन । करावे वाटते जाण । पुण्य देखोनि ॥ २१ ॥ या लागी विचार योजिला । चातुर्मास करावा पंढरीला । संत समाज त्या स्थानाला । जमला असे अपूर्व ॥ २२ ॥ तव नगरवासी लोक म्हणत । चातुर्मास करावा येथ । सेवा करितो आम्ही यथार्थ । भक्तीभावे स्वामीचो ॥ २३ ॥ तेव्हा बोलती गुरुनाथ । आम्हा जाणे पंढरीते । बोलाविले

समर्थें । चातुर्मासासी ॥ २४ ॥ म्हणुनि जाणे उचित । चातुर्मास क्रमूं तेथ । तुम्ही स्वस्थ करुनियाचित्त । श्रीहरीसी आळवावे ॥ २५ ॥ म्हणुनि चालले पंढरीसी । क्रमी जाती त्वरेसी । आषाढ दशमिसी । श्रीक्षेत्री पातले ॥ २६ ॥ चातुर्मास द्वाद्वशीस । कीर्तन उभे राऊळात । रामदासादी सर्वत्रास । आनंद झाला कीर्तनी ॥ २७ ॥ रामकृष्ण हरी । कीर्तनी गर्जना करी । प्रत्यक्ष पांडुरंग भीमातीरी । येऊनिया नाचतसें ॥२८॥ संतजननिवासा । कृपार्णवा राजहंसा । भक्तगौरवा राजसा । भक्तमहात्म्य वाढवीतसे ॥ २९ ॥ रामदास बोले रंगोबास । पहा कीर्तनी रमाविलास । भक्तांच्या कार्यास । निरंतर धावतसे ॥ ३० ॥ भक्तकाम कल्पद्रुम । जगन्निवास परब्रह्म । उच्च नीच करी काम । भक्ताधीन म्हणोनि ॥ ३१ ॥ अर्जुनाचे धुतले घोडे । द्रौपदीचे बांधिले बिरडे । उद्धवाचे पुरविले कोड । भक्तलीला वाढविली ॥ ३२ ॥ नामदेवाचे कीर्तनी । प्रेमे नाचतसे चक्रपाणी । श्रीहरी भक्ताधीन म्हणोनि । अखंड तिष्ठत राहतसे ॥ ३३ ॥ तैसेचि तुझे कीर्तनी । अखंड उभा चक्रपाणी । प्रेमे करी कीर्तन श्रवणी । अत्यादरे करुनिया ॥ ३५ ॥ कार्तिक एकादशी । स्वामी निघे



प्रदक्षिणेसी । अति गजर परिवारेसी । नामस्मरण करितसे ॥ ३६ ॥ तव तेथे आनंदीबाई नामेबाई । अति भाविक सद्भावी । मनी इच्छा धरिली पाही । ब्राह्मण द्वादशीस सांगावा ॥ ३७ ॥ तीही करितसे प्रदक्षिणा । विचार करीतसे मना । ब्राह्मण सांगावा भोजना । आजसी कोणवरे ॥ ३८ ॥ इतक्यात भेटती रंगनाथ । पाहुनि स्वामीसी नमित । महाराजा माझा मनोरथ । पूर्ण करावा स्वामीराया ॥ ३९ ॥ मी अनाथ दरिद्री पूर्ण । ममगृही येऊनि आपण । द्वादशीस करावे भोजन । पुरवी इच्छा दीनाची ॥ ४० ॥ आपण एकटे यावे । समागमे कोणास न आणावे । ऐसा जाणोनि भाव । बरे बोले गुरुराज ॥४१॥ आनंदीसी वाटला आनंद । येतो म्हणतो श्रीरंगसिद्ध । भिक्षी मागुनी प्रसिद्ध । पाक केला द्वादशीचा ॥ ४२ ॥ दोन प्रहर समयासी । पाक केला त्वरेसी । बोलावुनि रंगमूर्तीसी । आसन दिधले सप्रेमे ॥ ४३ ॥ शोडषोपचारी पूजा । स्वस्थाना बैसविले गुरुराजा । पात्र वाढोनिया ओबा । म्हणती करावे भोजन ॥ ४४ ॥ इतक्यात रघुवीर नामे गर्जत । समर्थ पातले अवचित । देखोनिया समर्थाप्रत । बाई वदली तेधवां ॥ ४५ ॥ बाई म्हणे रंगमूर्तीस । हे कोण न

कळे आम्हास । स्वामी म्हणती समर्थ रामदास । तव पुण्ये आलासे ॥ ४६ ॥ बाई तयासी बोलावे । तुझे पुण्य बहु बरवे । न सांगता स्वभावे । रामदास पातले ॥ ४७ ॥ स्वामी असती महासमर्थ । तुजसी लाभ झाला अवचित । अनायासे श्रीसमर्थ । तव गृहा पातले ॥ ४८ ॥ या म्हणुनि तयासी । पत्रावळ वाढिली प्रेमेसी तव जयरामस्वामी ते समयासी । केशवस्वामीसह पातले ॥४९॥ अहो आम्हा ब्राह्मणासी । भोजन घाला त्वरेसी । आजि आहे द्वादशी । बहू पुण्य लागेल ॥ ५० ॥ बाई फार उदार । म्हणोनि धुंडीत आलो घर । भोजन घालावे सत्वर । हीच इच्छा झालीसे ॥ ५१ ॥ रंगमूर्ती वदती बाईसी । दोन प्रहर समयासी । ब्राह्मण आले भोजनासी । द्यावे तयासी भोजन ॥ ५२ ॥ ती कांही एक बोलेना । मी तरी दरिद्री जाणा । लाज कशी वाटेना । या म्हणावयासी ॥ ५३ ॥ आज द्वादशी कारणे । भिक्षा मागुन मिळविले धान्य । दळण कांडण करुन । पाक सिद्ध केलासे ॥ ५४ ॥ दोघा पुरता स्वयंपाक । करुनिया बैसले देख । या ब्राह्मणा सकळिक । घर कोण दावितसे ॥ ५५ ॥ म्या रांडेने कासयासी । स्वामी बोलाविला भोजनासी । घरात नाही संचयासी ।



मी आता काय करुं ॥ ५६ ॥ साधु म्हणती तयास । यासी समजेना मम मानस । व्यर्थ लागले संगतीस । या बुवाच्या ॥५७॥ कोणी मिळविता नाही । आता मी करू काई । धाव पाव विठाबाई । संकट निवारी दासीचे ॥ ५८ ॥ तव ते दोघे येऊनि । बळे बैसले तयास्थानी । पत्रावळी पुढे घेऊनि । वाढा म्हणती त्वरीत ॥ ५९ ॥ तीन भाकरी बाईनी । ठेविल्या होत्या पाकस्थानी । रागेरागे उठोनि । अर्धीअर्धी वाढिली ॥ ६० ॥ इतक्यांत बोलती रामदास । आनंदमूर्ती या समयास । येतील तरी विशेष । शोभा उत्तम येईल ॥ ६१ ॥ बाईस पडला धाक । म्हणे माझा स्वयंपाक । काय करूं मी हतभागी देख । सत्व किती पहातसा ॥ ६२ ॥ तव येती आनंदमूर्ती । श्रीगुरुदत्त उच्चारिती । बळे द्वार उघडिती । स्तब्ध राहिली बाई ती ॥ ६३ ॥ सत्व पाहता किती । एका मागे एक येती । कैसी लाज न वाटती । अगंतुकी लाविता ॥ ६४ ॥ थोर साधु म्हणोनि । मी सांगीतले भोजनी । फटफजिती याचे मनी । कराविसी वाटते ॥ ६५ ॥ पूर्वीच मी सुचविले होते । एकटेच यावे भोजनाते । आग्रह

धरिता दुसऱ्याते । काय कैसे करावे ।। ६६ ।। रंगोबा म्हणती बाईला । ब्राह्मण दिसतो भला । भोजन समयी आला । यासी काही म्हणू नका ।। ६७ ।। तितकीच भाकरी खाऊन । उठा तुम्ही अवघेजण । आता दुसरीकडे जाऊन । पोटभर जेवावे ।। ६८ ।। घरात पाहे जाऊन । तीन भाकरी मागुतेन । पाहून आनंदी झाले मन । वाढावयासी येतसे ।। ६९ ।। ऐसे ऐकुनी उत्तर । पात्र वाढिले सत्वर । तया वेळी गुरुवर । पंचायतन जेवितसे ।।७०।। स्वामी आपले दये करुन । तीन भाकरी आहेत जाण । स्वस्थ करावे भोजन । म्हणोनि वाढीतसे ।। ७१ ।। पुनः गेली घरात । तीन भाकरी आणखी पहात । आता होऊ द्या स्वस्थ । संकोच मनी करुं नका ।। ७२ ।। हर्ष झाला बाईसी । आग्रह करुनि वाढी भोजनासी । सद्‌गुरु महिमा न कळे तिजसी । माया विंदान दाविले ।। ७३ ।। भोजन समस्ता झाले । हस्त प्रक्षालन केले । मुखशुद्धीस तांबूल दिधले । बैसले सर्व एके ठायी ।। ७४ ।। आनंदमूर्ती बाईसी । सांगे एक वचन । समर्थ वदता माग वरदान । मुक्तकरा म्हणे तू ।। ७५ ।। ती म्हणे

मजसी । वस्त्र नाही नेसावयासी । कृपाकरुन आम्हासी एक वस्त्र देववावे ।। ७६ ।। मजला कोणी नाही । मी अनाथ दरिद्री पाही । भिक्षा मागून नित्यही । पोट भरीतसे ।।७७।। इतक्यात रामदास । प्रेमे बोलती आनंमूर्तीस । काय आपले मनास । द्यावे बाईसी ।। ७८ ।। म्हणती रंगनाथ । पंचायतन महासमर्थ । जन्म मरणातीत । करावे तियेसी ।। ७९ ।। कृपादृष्टी सर्वांनी । आशिर्वचने देऊनि । समाधी सुखी प्रेमाने । तियेसी करावे ।। ८० ।। संतमहिमा सर्वात सार । जीवन उद्धरिती अपार । ऐसा करुनि चमत्कार स्वस्थाना जाते जाहले ।। ८० ।। केशवस्वामी भागानगरासी । आनंदमूर्ती ब्रह्मनाळासी । जयस्वामी वटग्रामासी । जाते जाहले ।। ८२ ।। श्रीसमर्थ रामदास । निघते झाले त्या समयास । रंगनाथ परिगमनास । निगडीग्रामी पातले ।। ८३ ।। तेथे एक रात्र राहून । निघते झाले समर्थ आपण । रंगनाथासी प्रेमाने । वारंवार भेटती ।। ८४ ।। साताऱ्याहून सज्जनगडास । जाती तेव्हा रामदास । आनंद वाटे कल्याणास । गुरुमूर्ती पाहुनि ।। ८५ ।। स्वस्ति श्रीरंगलीलामृत

ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदास कृत । एकविंशतमो अध्याय गोड हा ॥ ८६ ॥

॥ श्रीरंगनाथर्पणमस्तु ॥

॥ श्री सद्गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ एकविंशतमोध्यायः समाप्तः ॥



## ॥ अध्याय २२ वा ॥

॥ ॐनमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री रंगायनमः ॥ श्री रंगमूर्तयेनमः ॥

॥ जयजयाजी श्रीरंगा । निगुणपुरा नटरंगा । लीलावतारी गुणभृंगा । काय महिमा वर्णू मी ॥ १ ॥ अज्ञान पंकी रुतलो । विषय वासने भ्रमू । लागलो । आधी व्याधीनें ग्रासलो । न सुचे कांहीं स्वहित ॥ २ ॥ प्रपंच मायेचा बाजार । विषय वस्त्रू अपार । देखोनि भुलती नारी नर । मोहे गुंग होतात पै ॥ ३ ॥ विवाद मदे उन्मत्तपणे । नाठवे परमार्थ भोग भोगणे । लालुचीमन

झाले ओढणे । भ्रमवू लागले ।। ४ ।। तया भ्रमामाझारी । गुंतली ऐहिक वैभवे सारी । आपआपणाते विसरी । होऊनिया गेलीसे ।। ५ ।। ईश्वराधना नाठवे मनीं । लुब्धून गेला अहंपणी । तन्मय झाला विषयानी । स्वहित मार्ग नाठवे ।। ६ ।। यापरी झाली अवनती । परी न होय प्रवृत्ती । परमार्थ न सुचे कल्पांती । येणे परी वेडावला ।। ७ ।। यासी सदुपाव एक । सद्गुरु सेवा अलौकिक । तरीच होय जीवनन्मुक्त । आन उपाय नसेचि ।। ८ ।। सेवा करावी अहर्निश । मनाचे मोडावे सर्व पाश । देह ममता आहे । तोवरी काहींच कार्य नो हे । तुटलीया जाण लवलाहे । शुद्धि होय तत्काळीच ।। १० ।। मन रमवावे सद्गुरुपायी । चित्तासी रंगवी सद्गुरुठायी । इंद्रिये लावावी सेवेपायी । सार्थकता होय तत्काळ ।। ११ ।। येणे परी सेवा करिता । तनमन प्रेमे वेचिता । गुरु कृपा होय तत्वता । काळ वेळ न लगेची ।। १२ ।। गुरु कृपेची अगाधता । काय वर्णावी अलौकिकता । श्रीगुरु कृपार्णवे विलोकिता । मुक्तची जाण तो प्राणी ।। १३ ।। येणे रीती शिष्य जनार्दन । श्रीगुरु सेवेसी प्राण । मुखी श्रीगुरु नामःस्मरण । अन्य नठावे मनासी ।। १४ ।। शरीर श्रीगुरुसी विकले ।



जिव्हेनें श्रीगुरुनाम वरिले । मनी श्रीगुरु चरण धरिले । दुजे न ठावे तयासी ।। १५ ।। सेवाकरी अहर्निशी । तन्मय झाला गुरु चरणाशी । इंद्रिये श्रीगुरु सेवेसी । रात्रंदिन वेंचिती ।। १६ ।। जनार्दनाचा देखोनि भक्तिभाव । संतोषला श्रीगुरुराव । सत्य भक्त जनार्दन अभिनव । पाचारिले तयाते ।। १७ ।। श्रीगुरु आज्ञा होताची जाण । नम्रपणे करी नमन । स्वामी विचारी आज्ञापन । करद्वय जोडोनि ।। १८ ।। स्वामी संतोषले मनी । यासी कथावे आत्मज्ञान । बोधावे निजतत्व जाणून । अधिकारी झाला हा ।। १९ ।। कृपेने द्रवली गुरुमूर्ती । अमृत नेत्रे अवलोकिती । किंचित होती भ्रांती । उडाली जाण तेधवा ।।२०।। सद्गुरु म्हणती तयासी । ऐक बापा शिष्य राशी । पिंड ब्रह्मांडाची तुलना कैसी । झाली असे ऐक्य रुपे ।। २१ ।। ईश्वर असे सर्व व्यापी । स्थावर जंगमात्मक स्वरुपी । भरुनि उरलासे निजात्मरुपी । कैसी स्थिती अघटित ।।२२।। जीव आणि शीव । दोन्ही पक्षी अभिनव । हृदयगाभारी वास्तव्य । करिताती जाण पा ।। २३ ।। जीव म्हणजे देह ममता । जे का षड्रिपुचे अधिनता । त्याची लोभे तत्वता । वर्तती रात्रंदिन ।। २४ ।। जन्मजन्मांतरीचे दोष । षड्रिपुनें

भरले विशेष । खेचताती बळे लावूनि आस । विषय कर्दमा माझारं ॥ २५ ॥ विषय म्हणजे देह ममता । माझे माझे जे तुम्ही वदता । मी कोण न कळे तत्वता । व्यर्थची बडबड ती साक्षेपे ॥ २६ ॥ औट हाताचा देह । अस्थी चर्मे व्यापिला आहे । मी कोण हे तुमचे पाहे । भ्रमुनिया गेलासी ॥ २७ ॥ अहंकार वाढला अपूर्व । गर्वोन्मदे भरले सर्व । क्षणभंगुरतेचा विसर । झाला जाण तयासी ॥ २८ ॥ जैसा जळावरी बुडबुडा । क्षण मात्रे नष्ट होय बापुडा । तैशीच देहाचि धडपड । व्यर्थ असे जाण पा ॥ २९ ॥ मी देह माझा देह । मी कोठे जातसे ॥ ३० ॥ मी कोण कोठील आहे । याचा विचार कधीच नोहे । मी म्हणणार कोण आहे । हे हि न जाणे कदापी ॥ ३१ ॥ मी म्हणजे जीव । मी म्हणजे शीव । मी म्हणजे शरीर नांव कोण मी हे न कळेचि ॥ ३२ ॥ याची संदेहे गोवुन । भ्रमोनि गेले प्राणी जाण । अहं ममते वाचुनिया जाण । कांहीं न सुचे तयासी ॥ ३३ ॥ जिवासी दुःख होता जाण । तळमळूनि म्हणे धांव करुणाघन । तो करुणाघन आहे कोण । याचा विसर होतसे ॥ ३४ ॥ जीवाची अंतःस्फूर्ती । आपोआप उगवे ज्योती । वरी जीव संगे भ्रमती ।



मनोवृत्ती तेधवा ॥ ३५ ॥ तया जीवासी क्रमाने । रमवावे शुद्ध मनानें । शिव स्वरुपी प्रेमाने । गुंगवावे तयासी ॥ ३६ ॥ शिवासी होता संलग्न । जीवपण जाय मावळोन । जीव-शीव ऐक्य होऊन । जातसे तेधवा ॥ ३७ ॥ शिवस्वरुपी मिळता । देह ममता नष्ट होय तत्वता । यासीच म्हणती आत्मज्योता । निजारंगी तल्लीन ॥ ३८ ॥ साधन मन चतुष्ठय श्रेष्ठ । त्यासी द्यावेत अमित कष्ट । भ्रमवुनि करावे स्पष्ट । शिवस्वरुपी तल्लीन ॥३९॥ मनाचे चंचलत्व । अन्य प्रकारे विचरत परो चित्त करुनिया स्वस्थ । अवलोकावे मनाते ॥ ४० ॥ ज्या ज्या ठायी मन जाय । ते ते ठायी परतवावे सदुपाय । वळवुनी लावावे श्रीहरी ठाय । तेथेचि वसो द्यावे त्या ॥ ४१ ॥ मन जाय जरी अन्य ठायी । शरीर स्वस्थ ठेवावे हरिपायी । मनाची चंचलता पाई । आपोआप रमले ॥ ४२ ॥ येणेंचिया अभ्यासे । इंद्रिया लावावे श्रीहरीपासी । हेचि साधन चतुष्टय असे । श्रीहरी सन्निध या नांव ॥ ४३ ॥ प्रेम भक्ती होताच जाण । सख्य भक्ती पुढे तेथोन । तद्रुपता होय न लागता क्षण । तव नवविध भक्ती साध्य होय ॥४४॥ जीव शीव ज्यासी म्हणती । यासीच प्रकृति पुरुष वदती ।

उभयताची एकची साम्य ती । असे जाण शिष्यवर्या ॥ ४५ ॥ सत्चित् आनंद । या नांव ब्रह्मानंद । यासीच म्हणती आत्मानंद । स्वस्वरुपी तल्लीनता ॥ ४६ ॥ ब्रह्मांडाची जी रचना । तेचि पिंडी असे जाणा । उलटचा करुनि नयना । हृदय गाभारी अवलोकावे ॥ ४७ ॥ जीवशीव परमहंस । दिसती तेथे स्वयंप्रकाश । ऐक्य रुपे उभयास । देखती या नांवपूर्णब्रह्म ॥ ४८ ॥ मग षड्विकार तये वेळी । आधीन होती तत्काळी । तयासी लावावे चरण कमळीं । श्रीहरीच्या तेधवा ॥ ४९ ॥ संकल्प विकल्प जाय हारपून । मनाचे मावळते मनपण । द्वंद्व जाय खुंटोन । ऐक्यरुपी तल्लीनता ॥ ५० ॥ यासीच म्हणती योगसमाधी । उडोनि जाय आधि व्याधी । नाठवे आणिक उपाधी । मौनत्वे जाण वर्ततसे ॥ ५१ ॥ या नांव ब्रह्मस्थिती । संत महात्मे प्रेमे डुलती । अखंड लावोनिया ज्योती । तन्मय राहती स्वानंदे ॥ ५२ ॥ ऐसे वदुनि श्रीगुरुमूर्ती । कृपादृष्टी अवलोकिती । जनार्दनासी झाली उपरती । ब्रह्मस्थिती जाणवली ॥ ५३ ॥ वाचा झाली सद्‌गद । निःशेष सुटला अनुवाद । तुटले निर्द्वंद्व झाला स्तब्ध । ऐक्य रुपे मिळाले ॥ ५४ ॥ स्वामी संतोषती मानसी । उल्हास न



माये चित्तासी । सावध करुनियां तयासी । पूर्व क्रम चालिला ॥ ५५ ॥ तो जनार्दन शिष्य विख्यात । गुरु कृपे बलवंत । आत्मानात्म विचार करित । नित्य काशीस जाई स्नानासी ॥५६॥ दोन प्रहर होताच जाण । स्वामी स्नानाकारणे । तीर्थ देत आणून । भागीरथीचे ॥ ५७ ॥ एके दिनी रामदास । भेटो आले रंगोबास । आनंद झाला उभयास । क्षेमालिंगन दिधले ॥ ५८ ॥ त्या समयी रामदास । बोलती प्रेमे रंगोबास । जनार्दन तुझा काशीस । नित्य जातसे ॥ ५९ ॥ तरी माझे कांही कार्य असे । होईल जाण अनायासे । भागीरथीस असे । द्रव्य देणे त्याचे आम्हासी ॥ ६० ॥ जनार्दना आज्ञापून । रक्कम देईजे मोजून । रशीद घेवोनि त्वरेने । येई गे झडकरी ॥ ६१ ॥ ऐकोनि म्हणे जनार्दन । मजला कांही काम जाण । मी स्वच्छंदे स्नान करुन । तैसाच येतसे ॥६२॥ उशीर लागेल कार्यास । तीर्थ पाहिजे स्नानास । बरोबरी कल्याणास । दोघे आम्ही जातसे ॥६३॥ समर्थ म्हणती तयासी । कल्याण नाही समयासी । बापा हे कार्य निश्चयेसी । त्वांचि करावे ॥ ६४ ॥ अवश्य म्हणोनि निघाले । तेथेच अदृश्य झाले । रामदासा आश्चर्य वाटले । बोलो आरंभी रंगमूतीसी ॥६५॥

सिद्ध पुरुष जनार्दन । त्यासी तुझी कृपा पूर्ण । सूक्ष्म देही प्रवेशून । मार्ग क्रमीतसे ।। ६६ ।। रामदास स्नान करून । पूजा विधी संपवून । श्रीरामासी आळवून । समाधिस्थ बैसले ।। ६७ ।। दिवस आला दोन प्रहर । जनार्दन आले सत्वर । रंगमूर्तीस म्हणे त्वरे । उठावे स्नानासी ।।६८।। स्नान केले स्वामीनें । पितांबर परिधान करून । आसनी बैसले येवोन । तव रामदास पाहातसे ।।६९।। म्हणे आलें काय जनार्दन । येरी करुनिया नमन । रशीद पुढे ठेवोन । सांगती वर्तमान तेथीचे ।। ७० ।। ऐकोनिया वचन । रामदास गेले हर्षोन । कृपेने द्रवले मन । प्रेमे त्यासी आलिंगीती ।। ७१ ।। धन्य भक्त तू जगती । वैराग्यशाली क्षमा शांती । सद्गुरु कृपा तुजप्रती । झाली असे जनार्दना ।। ७२ ।। बापा जनार्दना । काय इच्छा सांग मना । तुजवरून काया जाण । ओवाळावी वाटतसे ।। ७३ ।। हस्त जोडून जनार्दन । समर्थासी घाली लोटांगण । गुरु भक्ती सेवा करीन । हेचि वरदान मज द्यावे ।। ७४ ।। एक क्षण ही अंतर । न पडावा साचार । ऐसा द्या जी वर । म्हणोनि प्रार्थितसे ।। ७५ ।। समर्थ कृपे कुरवाळीती । धन्य तुझी गुरुभक्ती । तुज न विसंबे रंगमूर्ती । चरणी ठाव



देतील ।। ७६ ।। उठोनि तेव्हा गुरुनाथ । जनार्दनासी भेटत । मस्तकी हस्त ठेवीत । जनार्दनासी सप्रेमे ।। ७७ ।। गुरुशिष्य ऐक्य जाहले · द्वैताद्वैत विसरले । जेवी जलासी लवण मिळाले । ऐक्यरुपी तन्मयता ।।७८।। येणे परी रामदास । निरोप घेऊनि रंगोबास । पातले सज्जनगडास । सप्रेमे करूनिया ।। ७९ ।। श्रीरंगमूर्ती निगडीग्रामी । श्रीदत्त सेवा नित्यनियमी । जनार्दन शिष्य प्रेमी । प्रेमानंदे वर्तती ।।८०।। स्वस्तिश्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंगकृष्णदास कृत । द्विविंशतितमोध्याय गोड हा ।। ८१ ।।

।। श्रीसद्गुरु निजानंद रंगनाथस्वामीर्पणमस्तु ।।

।। श्रीसद्गुरुनाथार्पणमस्तु ।।

।। इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ द्विविंशतीतमोध्यायः समाप्तः ।।

# ।। अध्याय २३ वा ।।

।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।

।। श्रीगणेशायनमः ।। श्रीसरस्वत्यैनमः ।। श्रीरंगमूर्तयेनमः ।।

।। जय श्रीगुरु जयरामा । अगाध रूपा निरुपमा । भक्तकाम मनविश्रामा । जयराम स्वामी गुरुवर्या ।।१।। पंचायतन महाश्रेष्ठ । भूवरी अवतरले वरिष्ठ । गुरुभक्त जयराम स्वामी बलिष्ठ । स्वानंद सुखे वर्ततसे ।। २ ।। वटग्रामी वस्ती । श्रीगुरुसेवा प्रेमे करिती । तव तेथे अवचिती । बादशहा आले भेटीसी ।। ३ ।। राजा करी अज्ञापन । दूतासी बोले प्रेमे करुन । जयरामस्वामी



महानिधान । भेटी कारणे पाचारी ।। ४ ।। माझा सांगोनी नमस्कार । घेऊनि येईजे सत्वर । भेटीसी मन होय आतुर । जाऊनि निरोपा ।। ५ ।। आज्ञा वंदुनि शिरी । दूत गेला झडकरी । प्रवेशला वटग्रामा माझारी । जयराम स्वामीसी शोधीतसे ।। ६ ।। लोकासी पुसे समाचार । दाविती जयराममंदिर । प्रवेशला मठ द्वार । वंदन करुनि वदतसे ।।७।। कर जोडोनि बोले वाणी । राये धाडिले मज लागुनि । भेटीची आस झाली मनी । म्हणुनि गुरुवर्या पाचारिले ।। ८ ।। ऐकूनिया दूत वार्ता । स्वामी बोले पाचारिले वृथा । श्रीगुरुसेवी तल्लीनता । आनंद आम्हा होतसे ।। ९ ।। तया वेळी जयराम । कृष्णापाची समाधी उत्तम । झाडीत होते सप्रेमे । आनंद मनी वाटतसे ।। १० ।। भेटीचे नसता कारण । कां पाचारिले मज लागून । मजसी नसे विवंचना । श्रम कासया का घ्यावे ।। ११ ।। आम्ही निरिच्छ निःसंग । आम्हा नलगे व्यासंग । श्रीगुरुसेवे प्रेम रंग । यातचि आनंद आम्हासी ।। १२ ।। इतक्यात शिबिका घेऊन । मुख्य आला पुढे प्रधान । चला म्हणूनि करी नमन । जयराम स्वामीसी तेधवा ।।१३।। दिवाण बोले कर जोडुनि । स्वामी चरणी असे विनवणी । राये पाठविले मज

लागुनि । भेटी लागी स्वामीया ।। १४ ।। स्वामी कीर्तीचा परिमळ । दुमदुमत राहिला निर्मळ । राव भेटी लागी उतावीळ । झालासे गुरुराया ॥ १५ ॥ राये जरी येथे यावे । तरी कार्य नव्हे बरवे । सेवेमाजी व्यत्यय । म्हणुनी स्वामीनी चलावे ।। १६ ।। ऐकोनिया दिवाण वचन । स्वामीस झाले समाधान । देऊनिया उत्थापन । बोलते झाले तेधवा ।। १७ ।। शिबिका पाहुनि जयराम । हे वाहन दिसे उत्तम । म्हणोनि हातातील झाडणी घेऊन । शिबिकेमाजी ठेविली ।।१८।। सर्वत्रास बोले प्रेमे करून । जरी मजला नेणे तुम्हा लागून । तरी झाडणीस शिबिकारोहण । घेऊनिया चलावे ।। १९ ।। हे जरी वाटे अनुचित । तरी परत जावे त्वरीत । नका पडू व्यर्थ भ्रमात । सांगावे राजयासी ।। २० ।। नाही तरी आम्हासी । येणे नाही या समयासी । जाऊनि सांगारायासी । सद्गुरु आज्ञा ऐसी आहे ।। २१ ।। तव दिवाण बोले कर जोडुन । जैसे स्वामीचे इच्छित मन । आज्ञेप्रमाणे वर्तन । हा दास करीतसे ।। २२ ।। महाराज आपण चलावे । शिबिकेत खराटा घालावे । आपले विरुद्ध न होये । कांही स्वामी महाराजा ।। २३ ।। म्हणुनि करी प्रार्थना । बरे म्हणती त्या वचना । सद्गुरु समाधीस



प्रदक्षिणा । करुनि निघती जयराम ।। २४ ।। पुढे शिबिका चालली । मागे चाले गुरुमाऊली । राज सभेभीतरी । येऊनि उभे राहिले ।। २५ ।। दुरोनि देखे राजा । दिवाणासी बोले सहजा । शिबिकेमाजी गुरुराजा । बसवुनि कां न आणिले ।। २६ ।। शिबिका पाठविली आदरे । श्रीगुरुसी प्रेम पुरस्करे । ऐसे असता अविचारे । वृथा आणिले पायीच ।। २७ ।। करुनिया नमस्कार । राजा पुसे वारंवार । खराटा केर झाडणार । त्यासी शिबिका प्राप्त कैसी ।। २८ ।। ऐकुनि राजाचे वचन । श्रीगुरु बोलती हासोन । अधिकार त्याचा न जाणोन । व्यर्थ भाषण करितसा ।। २१ ।। नित्य श्रीगुरुचे काजासी । अखंड झिजवी देहासी सेवा करी अहर्निशी । ऐसा अधिकारी तो आहे ।। ३० ।। काया वाचा मने । सेवा करी आनंदाने । ऐसी आज्ञा पुराणे । सांगताती ।। ३१ ।। ऐशापरी हा वर्तत । मल सर्व धुवूनि काढीत । आपला देह झिजवीत । परोपकारी महात्मा ।। ३२ ।। परोपकारालागी जीवित । वेची ते धन्य होत । हीच स्थिती खराटयात । आहे जाण राजया ।। ३३ ।। तरी एक दोन महिन्यात । सर्व खराटा होतो मुक्त । ऐसा सेवाधारी सतत । सद्गुरु काज करीतसे ।।३४।।

नित्य मठात जाण । सूर्योदयी सर्वांगण । झाडीतसे आनंदाने । सर्व करे ॥३५॥ त्याचा देह झिजत । मासी दोमासी जीर्ण होत । निःशेषता झालिया प्राप्त । तया मग टाकीतसे ॥ ३६ ॥ सद्गुरुसी उष्ण जीवन । स्नाना लागी कारण । करिता एके दिनी जाण । अग्नी प्रदीप्त होईना ॥ ३७ ॥ तेव्हा तो निःशेष खराटा । पडला होता रस्त्यावरता । आणुनि घातला मागुता । अग्नीमध्ये ॥ ३८ ॥ मग तयासी प्रदीप्त करता । पाणी तापले अवचिता । स्नान घालिता सद्गुरुनाथा । तयासी आनंद वाटला ॥ ३९ ॥ कृष्णापा म्हणती मजला । योग भ्रष्ट उदय झाला । पाहता खराटा जाहला । समूळची अग्निरूप ॥ ४० ॥ अनुतापी तापुनि आपण । मजला घातिले स्नान । धन्य गुरुभक्ती जाण । तया खराटयाची ॥ ४१ ॥ जयराम बापा । यावरी करी कृपा । विसरूं नको दीनरुपा । या खराटयासी ॥ ४२ ॥ ऐसे सांगोनि गुरुमाऊली । मजवरी बहु कृपा केली । तेचि माझी माऊली । वटग्रामी अद्याप आहे ॥ ४३ ॥ त्यांची सेवा करिता । शिबिका आली अवचिता । आज्ञा तुमची जाणोनि आता । खराटयासी बैसविले ॥ ४४ ॥ मी गुरु भक्त म्हणून । मज बोलाविले आपण ।





पुण्यश्लोकी मजहून । हा खराटा जाणावा ॥ ४५ ॥ सर्वांग त्याचे झिजत । ऐसा परोपकारी अत्यंत । जगात पाहता सत्य । दुसरा कोणी दिसेना ॥ ४६ ॥ ऐसी गुरुभक्ती करावी । तेव्हा ब्रह्मपदीमिरवी । ऐसी ऐकता युक्ती वरवी । अनुताप झाला राजासी ॥ ४७ ॥ खराटयामिषे करुन । परस्पर बोधिला राजा जाण । जयरामस्वामी गुणनिधान । विंदान तया दाविलें ॥ ४८ ॥ परोपकाराचे महात्म्य । विवंचिले राजासी सत्य । पश्चाताप झाला तया प्रत । जयरामस्वामी महात्मा ॥ ४९ ॥ तयासी उद्देशून । शांत केले मन जाण । पश्चात्ताप होता पूर्ण । गुरु भक्ती थोर वाटे ॥ ५० ॥ प्रेमे घाली लोटांगण । धावूनी धरिले दृढ चरण । महाराज कृपा करुन । दासासी उद्धरावे ॥ ५१ ॥ राज्यमदे उन्मत्त । होवूनि गेले मम चित्त । नाठवे हितानहित । कृपाकरी सद्गुरुनाथ ॥ ५२ ॥ खराटयाची कथुनि मात । जागृत केलें आजि सत्य । उपदेश हाचि मम होत । श्रीगुरुराजया ॥ ५३ ॥ तयानी जयरामासी । दोन गांवे दिधली त्यासी । सनद करुनि वेगेसी । पालखीत ठेवीतसे ॥ ५४ ॥ जोडोनि दोन्ही हस्त । श्रीगुरुराज समर्थ । म्हणूनि घाली दंडवत । करी

अंगिकार दासाचा ॥ ५५ ॥ वैभव हे क्षणैक । जाणार आयुष्य अमूप । सद्गुरु चरणी पुष्प । वाहिले भक्ती भावार्थे ॥ ५६ ॥ प्रसन्नरुपे स्वामीनी । मस्तकी हस्त ठेवोनि । शिबिके माजी बैसवूनि । वटग्रामी चालिले ॥ ५७ ॥ जयराम स्वामी येऊनि । कृष्णापासी यमुनी । खराटद्यानी मिळविली जागीर । आता मठ बांधवा सत्वर । ब्राह्मण संतर्पण अहोरात्र सदैव चालवावे ॥ ५९ ॥ गुरुमूर्तीचा उत्सावो । प्रतिवर्षी करीत जावो । माझे पंचायतन भूदेव । प्रतिवर्षी येतील ॥ ६० ॥ धन्य महात्मा गुरुभक्त । अद्यापि असे वटग्रामात । ब्राह्मण भोजन अखंडीत । निरंतर चालतसे ॥ ६१ ॥ पुढे रसाळ निरुपण । श्रोती व्हावे सावधान । वक्ता श्रीरंगपूर्ण । त्याचा तोचि वदवितसे ॥ ६२ ॥ स्वामी श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंग कृष्णदास कृत । त्रिविंशतीतमोध्याय गोड हा ॥ ६३ ॥

॥ श्री सद्गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्गुरु नाथार्पण मस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ त्रिविंशतीतमोध्यायः समाप्तः ॥

## ॥ अध्याय २४ वा ॥

॥ ॐनमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥ श्री रंगमूर्तयेनमः ॥

जयजयाजी सद्गुरु पूर्णब्रह्मा । अनंतरुपा निरूपमा । त्रिगुण अवतारी आरामा । सच्चिदानंदा जगद्गुरु ॥ १ ॥ दशावताराचा खेळ । खेळसी प्रेम कल्लोळ । जयासी दाविला मार्ग सुपळ । भवसिंधू तारावया ॥ २ ॥ विश्वकर्ता विश्वहर्ता । माया चालका विश्वभरिता । संतहृदयी गुण भरिता । आदिनाथा श्रीगुरु ॥३॥ प्रेम पान्हा पाजुनी । निजानंदी रमवोनी । ममहृदयी प्रकाशोनी ।

ग्रंथ आदरे वदवितसे ॥४॥ महाराज तव कृपा महिमान । तेवीस अध्यायपर्यंत जाण ग्रंथ करविला लिखाण । श्रीगुरुरंगराया ॥ ५ ॥ पुढे कथा चालली । श्रोती पाहिजे परिसिली । श्रवणे मुक्तता वहिली । ऐसे महात्म्य ग्रंथाचे ॥६॥ एके दिनी जयराम । पूजा करीत सप्रेम । कृष्णापा गुरु परब्रह्म । त्याचे सेवेसी बैसले ॥ ७ ॥ आत्मानात्म विचार । करितसे वारंवार । गुरुभक्ती निरंतर । बहुप्रिय जयरामा ॥ ८ ॥ श्रीसमर्थ एकनाथ । त्यांचा अवतार जाण सत्य । गुरुभक्ति यथार्थ । अति आदरे करितसे ॥ ९ ॥ सद्गुरु माझा मायबाप । सद्गुरु माझा ज्ञानरुप । सद्गुरु माझा आत्मादेख । म्हणुनि सद्गुरु तुज नमो नमो ॥ १० ॥ सद्गुरु तुम्हावाचून । एक क्षण युगासमान । मजवाटे तुजवीण । मजकोणी तारीना ॥ ११ ॥ दीन जनाची माय । भक्ताची कामधेनु होय । कृपेची करुनी माव । उद्धरसी दीना ते ॥१२॥ एसे स्तवन करिता । शंकराचार्य तत्वता । वटग्रामासी येता । बोलाविती जयरामा ॥ १३ ॥ दोन ब्राह्मण येऊन । जयरामासी बोलती जाऊन । पाचारिले आचार्ये जाण । जयरामा तुम्हा असे ॥ १४ ॥ जगाचे जगद्गुरु । महाराज गुरुवरु । आपले ग्रामी सत्वरु ।



आलेसी महाराजा ॥ १५ ॥ चला त्वरित आता । म्हणोनि ओढिती तत्वता । जयराम म्हणे सद्गुरु परता । दैवत मज नसेची ॥ १६ ॥ एक सद्गुरु समर्थ । आदिदैवत मन सत्य । त्याविण दुजे किमर्थ । दैवत जगी नाही ॥ १७ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष । श्रीगुरु कृपे प्रत्यक्ष । धावूनि येती समक्ष । श्रीगुरुकृपे तत्वता ॥ १८ ॥ ऐसा महाराज गुरुवर्य । कृपा घन ज्ञान सूर्य । सेवेने साधे कार्य । या विण दुजे श्रेष्ठ नसे ॥१९॥ जाऊनि सांगा आचार्यासी । बोलाविता कासयासी । सेवा सोडोनि मजसी । येणे नाही ॥ २० ॥ ऐसे ऐकोनिया वचन । संतप्त झाले ब्राह्मण । जगद्गुरु आज्ञा उल्लंघन । ठीक नोहे कदापी ॥ २१ ॥ जाऊनि ब्राह्मण तये वेळे । आचार्यासी कथिते झाले । आपली आज्ञा गुरुभक्तो पुढे । तुच्छ मानी जयराम ॥ २२ ॥ ऐकोनिया वचन । क्रोधावले जगद्गुरु जाण । रागे बोलती वचन । तये वेळी शिष्यासी ॥ २३ ॥ आज्ञा केली स्वामीनी । या समयी तुम्ही जाऊनि । जयरामासी घेऊनि । सत्वर यावे की ॥ २४ ॥ आज्ञा वंदुनी आचार्याची । निघाली टोळी ब्राह्मणाची । जयरामापुढेसाची । श्रीस्वामी आज्ञा सांगती ॥ २५ ॥ ब्राह्मण कुळी जन्मोन । आचार्य आज्ञा

प्रमाण । न मानसी मूढा जाण । तरी यज्ञोपवीत देई आम्हा ॥ २६ ॥ जगद्गुरु आज्ञा भंग करिती । त्याची बरी नव्हे गती । हे तुमजे तुजप्रती । मदांधे पूर्ण ग्राससी ॥ २७ ॥ घ्यावे लागेल प्रायश्चित । हेचि असे तुजउचित । इतरासी तुच्छ लेखीत । त्याचेच फळ हे असे ॥ २८ ॥ ऐकून जयराम हसत । जावे घेऊनि यज्ञोपवीत । शिखा उपटोनि सूत्र । देय हस्तकी ब्राह्मणाच्या ॥ २९ ॥ देखोनि तयाचे वर्तन । आश्चर्यकरिती ब्राह्मण । काय म्हणावे या लागुन । पिशापरी वर्ततसे ॥३०॥ ब्राह्मण येवोनिया त्वरित । नमस्कारोनि आचार्याप्रत । शिखा सूत्र यज्ञोपवित । स्वामी सन्निध ठेविले ॥३१॥ हस्त जोडोनि सांगती । जयराम दर्शना न येती । अखंड करितसे गुरुभक्ती । कृष्णापा गुरुची ॥ ३२ ॥ ऐकोनिया शिष्यवचन । स्वामीसी खेद झाला पूर्ण । व्यर्थ पाचारिला ब्राह्मण । सामान्य जाण तो नव्हे ॥३३॥ स्वामी स्तब्ध राहिले । काय म्हणावे ये वेळे । व्यर्थ त्यासी छळिले । साधु जनासी ॥ ३४ ॥ जे कां निरपेक्ष निःसंग । गुरु भजनी सदारंग । ब्रह्मानंदी सदादंग । साधु तयासी म्हणावे ॥३५॥ असामान्य सामर्थ्य तयाचे । परब्रह्मी अखंड साचे । उपाय कुंठित आमुचे । तया साधु



जनासी ॥ ३६ ॥ समस्ताचे सारुनि भोजन । भेटीस जाऊ आपण गुरुभक्त जयराम पूर्ण । नयनी आज देखेन मी ॥ ३७ ॥ ऐसी आज्ञा जाणून । स्नाने करिती ब्राह्मण । तव शिखा सूत्र जाण । गुप्त जाहले सर्वांचे ॥ ३८ ॥ चहुकडे पाहती हुडकुन । परी यज्ञोपवीत नदिसे जाण । कपडे पाहतो धुंडोन । न दिसे यज्ञोपवीत ॥ ३९ ॥ सर्वास आश्चर्य वाटोन । स्वामीसी सांगती येवोन । शिखा पवित्र जाण । अदृश्य जाहले सर्वांचे ॥ ४० ॥ कैसे जाहले कळेना । यज्ञोपवीत शिखा जाणा । कैसे सेवावे उदकपाना । चिंतातूर जाहले ॥ ४१ ॥ ब्रह्म कर्म सर्व राहिले । संध्या तर्पण बंद झाले । द्विजत्व जाण भंगले । कैसे करावे स्वामीराय ॥ ४२ ॥ स्वामी बोलती अघटित । वर्तमान झाले विपरीत । साधु छळाचे प्रायश्चित । मिळाले जाण सर्वांसी ॥४३॥ तुम्ही जयरामासी छळिले । तयाचे प्रायश्चित मिळाले । चमत्कार तुम्हासी दाविले । शरण तयासी रिघावेगी ॥ ४४ ॥ शरण तयासी जाल जरी । शिखा यज्ञोपवीत झडकरी । देईल सद्गुणी गुरुभक्ती करी । क्षमा तुम्हासी करील ॥ ४५ ॥ स्वामीसह विचार करित । जयराम भेटीसी निघत । शांतवू तो गुरुभक्त । विचार सर्वां

पै केला ।। ४६ ।। येऊनि· जयरामापासी । स्वामी बोलती तयासी । धन्य गुरुभक्त अवतरलासी । या भूमंडळावरी ।। ४७ ।। तूं गुरुभक्त पुण्यवान । गुरु सेवेसी अर्हनिशी तल्लीन । न जाणून तव महिमान । व्यर्थ छळण पै केले ।।४८।। क्षमा करी सर्वासी । पावन करी ब्राह्मणासी । उपवासी जाण सर्वासी । ठेऊ नको गुरुभक्ता ।।३९।। जयरामस्वामी तये वेळा । स्वामी चरणी ठेवी भाळा । कृपा करी दयाळा । या दीन ब्राह्मणासी ।। ५० ।। आजिचा दिवस धन्य । पाहिले स्वामीचरण । जगदोद्धारा कारण । अवतरलासी गुरुवर्या ।। ५१ ।। सद्गुरु तुजवीण । भजसी कोणी तारीना ।। ५२ ।। ऐसे स्तवन करीत असता । श्रीशंकराचार्य तत्वता । वट ग्रामासी येता । बोलावितसे जयरामा ।। ५३ ।। प्रसन्न वदनी स्वामी । म्हणे बारे तुज सांगतो मी । देई सूत्र शिखा आणोनि । या द्विजयासी ।।५४।। तव म्हणती जयराम । पैल तीर्थ उत्तम । स्नान करिता सप्रेमे । शिखा सूत्र मिळेल ।। ५५ ।। ऐसे सांगता सद्भक्त । सर्व जाऊनि स्नान करित । शिखा सूत्र समस्त । ज्याचे त्यासी प्राप्त जाहले ।। ५६ ।। कोणाच्या यज्ञोपवितासी । पेट्या यंत्रे होती त्यासी । तैसेच पाहुनि जयरामासी ।



लोटांगण घालीतसे ।। ५७ ।। धन्य महिमा संत कृपेसी । पाहुनि आनंद वाटे यतिसी । म्हणती अवतरले हृषिकेशी । या भूमंडळी ।। ५८ ।। धन्य पंचायतन अवतार । रामदास रंगनाथ गुरुवर । जयरामस्वामी भक्त थोर । केशव आनंदमूर्ती पै ।। ५९ ।। उद्धरिले भक्त लोक । काय महिमा वर्णू असंख्य । ऐसे म्हणोनि जयरामासी देख । प्रेमालिंगने भेटती ।। ६० ।। भेटले तेव्हा हरिहर । धन्य धन्य ते क्षेत्र थोर । वटग्रामी भूमी पवित्र । जेथे जयराम राहतसे ।। ६१ ।। स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । जयराम चरित्र अद्भूत । सहजरंगकृष्णदास कृत । चतुर्विंशती अध्याय गोड हा ।। ६२ ।।

।। श्रीरंगनाथर्पणमस्तु ।।

।। श्रीसद्गुरु निजानंद रंगनाथस्वामीर्पणमस्तु ।।

।। इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ चतुर्विंशती अध्यायः समाप्तः ।।

# ।। अध्याय २५ वा ।।

।। ॐ नमोभगवते वासुदेवाय ।।

।। श्रीगणेशायनमः ।। श्रीसरस्वत्यैनमः ।। श्रीगुरुभ्योनमः ।। श्रीरंगमूर्तयेनमः ।।

।। जय जय श्रीसद्‌गुरु । महिमा तुझा अपारु । करिसी मला उपकारु । नाम नौका देवूनि ।। १ ।। ते नाम जपता हृदयी । पावन झाला ध्रुव पाही । अढळपद लवलाही । श्रीगुरुदये प्राप्त झाले ।। २ ।। ऐसी कृपा बहु थोर । जाहला जयाचा उद्धार । मोक्ष मार्ग दुर्धर । सुलभ करुनि दाविला ।। ३ ।। या मार्गे जे जाती । ते अक्षय वैकुंठ पावती । जन्म मरणा चुकविती । सद्‌गुरु



प्रसादे ।। ४ ।। प्रसाद तुमचा उत्कृष्ट । चुकती जन्मांतरीचे कष्ट । त्यासी प्राप्त होय अभिष्ट । स्वर्ग सुख ।। ५ ।। सुख झाले सर्वाठायी । आता काय होऊ उत्तराई । गुरुराया तव दायी । नमन माझे ।। ६ ।। असो गताध्यायी कथन । जयराम स्वामी वटग्रामी जाण । स्वामीसी दाविला चमत्कार पूर्ण । ब्राह्मण गर्व हरिला ।।७।। पुढील कथेचे अनुसंधान । ऐका श्रोते सावध मन । वदविता सद्‌गुरु रंगनाथ पूर्ण । तोची प्रेमे वदवितसे ।। ८ ।। एके दिनी रामदास । जाऊनि शहर दिल्लीस । दोन प्रहर समयास । जाऊनि उतरले मशीदीत ।।९।। औरंगजेब बादशहा तेथीचा । ब्रह्म द्वेषी जाण साचा । भ्रष्ट करी लौकिक ऐसा । तयाचा पसरला ।। १० ।। तो राज्य करी दिल्लीस । तयाच्या देखोनि प्रतापास । भ्रष्टविले बहुत हिंदूस । बलात्कारे करुनिया ।। ११ ।। तया नगरी रामदास । येऊनि उतरले मशिदीस । तेथील मुसलमान लोकांस । आश्चर्य सर्वा वाटले ।। १२ ।। रात्र क्रमिली तया ठायी । दुजे दिनी शुक्रवार पाही । यवन जमले लवलाही । प्रार्थनेस्तव तया ठाया ।। १३ ।। पाहुनिया रामदासासी । ये स्थानी का आला ।। १४ ।। हे तव प्रार्थनामंदीर । तुम्हासी योग्य नसे घर ।

अन्य स्थानी व्हावे स्थिर । तेचि स्थान योग्य तुम्हा ।। १५ ।। तुम्ही दिसता साधु मुनी । सांगा आला कोठुनी । विचारिती सन्मानोनी । रामदास स्वामी प्रती ।। १६ ।। तुम्ही हिंदु म्हणता । आमचे मशिदीत राहता । काय मानस आता । आम्हा लागी कथावे ।। १७ ।। कांही न बोले रामदास । ध्यानस्थ बसले त्या समयास ऐसे जाणोनि सर्वास । आश्चर्य बहुत वाटले ।।१८।। केवढा धीट हा पुरुष । औरंगजेब बादशहास । कळता भ्रष्ट करील यास । सत्य जाणा निश्चये ।। १९ ।। चुकूनी स्वामी आलेती । आताची जावे पुढती । नाही तरी बरी गती । नसे तुमची ।। २० ।। ऐकोनी बोले रामदास । शिवाजी राजा पुण्य पुरुष । त्यासी माझाच उपदेश । राजगुरु म्हणती मज ।। २१ ।। जाऊनि सांगा बादशहासी । श्रीगुरु आले भेटीसी । रामदास म्हणती मजसी । भेटी घ्यावया पातलो ।। २२ ।। ऐकोनी स्वामी वचना । आश्चर्य वाटले यवना । केवढा धीट पुरुष जाणा । मनी भीति कांही नाही ।। २३ ।। ऐसे जाणोनि वर्तमान । तत्काळ धावले सकलजन । राजासी सांगती वर्तमान । शिवाजी गुरु आले असे ।। २४ ।। नांव सांगती रामदास । भेटीसी या म्हणती आपणास । ऐकोनि एसे



बादशहास । अत्यानंद जाहला ।। २५ ।। बरे झाले आमचे कार्य । भ्रष्ट करुं यासी पाहे । म्हणुनि स्वयंपाक लवलाहे । मांसमिश्रित केला असे ।। २६ ।। करुनिया पाकासी । सामोरे धाडिले दिवाणासी । भेटुनिया समर्थासी । भोजना चला म्हणतसे ।। २७ ।। आपल्या कारणे राजाने । पालखी पाठविली प्रेमाने । मध्ये बसोनि आनंदाने । भोजनासी चलावे ।। २८ ।। तव म्हणती रामदास । चला चला वेगी भोजनास । आज्ञा करी मशिदीस । तात्काळ ती चालवी ।।२९।। आश्चर्य करिती नारीनर । अघटित घडले अपूर्व । मशीद चालली सत्वर । स्वामी आज्ञा घेऊनि ।। ३० ।। हाटी चौहाटी ओलांडून । राजमंदोरा समीप जाण । मशीद आली न लागताक्षण । टकमक सर्व पाहताती ।। ३१ ।। येऊनि राजगृहा पासी । उभी टाकली ते समयासी । ऐसे पाहुनिया राजासी । परम आश्चर्य वाटले ।। ६२ ।। सामोरा येऊनि भूपती । प्रेमे रामदासासी भेटती । क्षेम कुशल उभयता प्रती । प्रेमे आदरे बोलती ।।३३।। हस्त धरुनि समर्थासी । राजा नेत मंदिरासी । भोजन घालुनि तयासी । भ्रष्ट करावे योजिले ।।३४।। ऐसा विचार करुनी । बैसवी तया भद्रासनी । मांसमिश्रित पदार्थ आणोनि ।

समर्थासी वाढती ।। ३५ ।। समर्थ स्मरती रामराया । सांभाळी ब्रीद या ठाया । उदक घेऊनि लवलाह्या । सिंचन केले तयावरी ।।३६।। राजा बैसे भोजनास । बसावे म्हणे स्वामीस । पात्री पाहता तयास । पदार्थ पुष्पे जाहलासे ।। ३७ ।। गुलाब जाई जुई । शेवंती मोगरा पाही । करवीर जपा कुसुमही । मांदारादि पुष्पे बहु ।। ३८ ।। कमल पुष्प सर्वात थोर । शतपत्रे तया विस्तार । केतकी मोगरा गंभीर । चंपक बिल्व पत्रादी ।। ३९ ।। राजा ऐसे पाहुनि । विस्मय वाटे तया मनी । म्हणे ईश्वर अवतार अजुनि । आहेत या जगती ।। ४० ।। घरांत जाऊनि पहात । सर्वा ठायी पुष्पे दिसत । येऊनि तेव्हा आनंदात । स्वामीस घाली लोटांगण ।।४१।। गुरुराया समर्था । अपराध क्षमा करी आता । दशसहस्त्र घेऊनि पुढता । घालीतसे नमस्कार ।। ४२ ।। प्रतिवर्षी द्रव्य घेऊन । करा तुम्ही ब्राह्मण भोजन । प्रार्थुनिया सनद जाण । रामदासासी दिधली ।। ४३ ।। सन्मानुनि राजाने । निरोप देत स्वामी कारणे । समर्थ बरे म्हणून । तेथेच गुप्त जाहले ।। ४४ ।। येऊनि राजगडास । राहते झाले रामदास । निरोप धाडी शिवाजीस । भेटी सत्वरी ये वेगी ।। ४५ ।। येऊनि शिवाजी



आपण । गुरुसी घाली लोटांगण । जाहले जे वर्तमान । समर्थ सांगती राजासी ।। ४६ ।। आतां येथे स्थापना करावी । रामपंचायतन मूर्ती बरवी । आज्ञा होता ते समयी । मुहुर्ते केली स्थापना ।। ४७ ।। तया खर्चा करिता । जहागीर दिधली समर्था । अद्यापी असे पाहता । समर्थ वंशजाकडे ।। ४८ ।। बादशहाची देणगी । चालू असे या युगी । दास नवमी प्रसंगी । सर्व जमा होतसे ।। ४९ ।। ब्राह्मण भोजन उत्तम । साधु सत्पात्र अधम । अबालवृद्धा अन्नदान । प्रसाद सर्वास भेटतो ।। ५० ।। दास नवमीचा सोहळा । अखंड दिसतसे डोळा । धन्य त्या समर्थाला । नमन माझे अखंडीत ।। ५१ ।। नऊ दिवसपर्यंत । उत्साह होतो आनंदात । संतर्पण चाले आनंदात । तया समर्थाचे ।। ५२ ।। दशमी दिवशी काला । भक्त आळविती रामाला । लळीत करुनि समर्थाला । आज्ञा मागती ।। ५३ ।। ( या अध्यायात श्रीरंगनाथस्वामीचा कीर्तनात प्रथम मान एवढाच संबंध येतो. ) कीर्तनाचा मान । श्रीरंगाचा असे जाण । श्रीफल तया देऊन । नंतर प्रसाद वाटती ।। ५४ ।। अद्यापी सज्जनगडी । परंपरा चालली निर्धारी । समर्थ असती तया स्थळी । पंचायतनासहित ।। ५५ ।। इति

श्रीरंगलीलामृत ग्रंथ । श्रवणे रामदास कथा अद्‌भुत । सहजरंगकृष्णदासकृत । पंचर्मांविशतीतमोध्याय गोड हा ॥ ५६ ॥

॥ श्रीसद्‌गुरु निजानंद रंगनाथ स्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरु नाथार्पणमस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ पंचर्मांविशतीतमोध्यायः समाप्तः ॥



# ॥ अध्याय २६ वा ॥

॥ ॐनमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वत्यैनमः ॥ श्री रंगमूर्तयेनमः ॥ श्री गुरुभ्योनमः ॥

॥ एके दिनी रामदास । निघती शिवाजी भेटीस । वाटेत येता ते समयास । ब्राह्मण एक पातला ॥ १ ॥ समर्थास करूनि । बोलता जाहला तो ब्राह्मण । वेदाध्यायी परिपूर्ण । तव दर्शना पातलो ॥ २ ॥ वादविवाद करावा । शास्त्र वेदांत बरवा । मजसवे वाद करावा । म्हणोनि आलो तव दर्शना ॥३॥ तुम्ही राजगुरु समर्थ । तव भेटीची धरुन आर्त । जयपत्र घ्यावे हा हेत ।

म्हणोनिया पातलो ।। ४ ।। रामदास म्हणती तयास । कोणे ग्रामी रहिवास । तव तो सांगे समर्थास । ग्राम आमचे कनेरखेड ।। ५ ।। शास्त्र अभ्यास केला बहुत । अध्ययन झाले अपरमित । चर्चा करावी बहुत । या इच्छेने पातलो ।। ६ ।। वाई क्षेत्रीहुन । जिंकीत आलो ब्राह्मण । जंबद्विपाहुन । जयपत्रे मिळविली ।। ७ ।। तुम्ही राजगुरु म्हणविता । चर्चा करावी मजसी आता । ना तरी जयपत्र द्यावे तत्वता । महाराज गुरुवर्या ।। ८ ।। एकोनि समर्थ बोलती । वादविवादी मती । अहंती माजी बुद्धि नाडती । व्यर्थ बुडसी कासया ।। ९ ।। तुम्ही विद्वान बहुश्रुत । आत्मानात्म विचार जाणीत । हरिचरणी व्हावे रत । जेणे चुके जन्ममरण ।।१०।। ऐसे साधन करावे । जये हा परलोकी बरवे । चित्तासी समाधान होय । तरीच सार्थक जन्माचे ।। ११ ।। ऐसे ऐकता ब्राह्मणा । क्रोध आला तया जाणा । मी वेदांती पंडित शहाणा । हे काय मज सांगता ।।१२।। जे मूढ अज्ञानी जन । त्यासी तुमचा उपदेश पूर्ण । आम्ही ज्ञाते निधान । वेदांत मताचे ।। १३ ।। तुम्ही बंड माजविले । ते मज पुढे न चाले । वाद करावा अतिबळे । ना तरी जयपत्र देईजे ।। १४ ।। समर्थ म्हणती



परमात्मा । सर्वाभूती तोच आत्मा । त्याचा तोची ज्ञानात्मा । होऊनि विचरे भूमंडळी ।। १५ ।। आत्माजाण निर्विकार । तयासी नाही बडिवार । स्वयंसिद्ध ज्ञानसागर । होऊनिया राहिला ।। १६ ।। अहंकार अति वरिष्ठ । तया मदे जाहला बलिष्ठ । परी विचार वदता स्पष्ट । आपोआप कळेल ।। १७ ।। वेदांताचे सार । याचा नाही केला विचार । उन्माद वाढला अपार । अति हव्यास वाढला ।।१८।। तुम्ही जो शास्त्रार्थ कथिता । अर्थ विवरा पाहे पुरता । जगदात्मा स्वयं प्रकाशता । सर्वाभूती भरला असे ।। १९ ।। दुसऱ्याशी विवाद करिता । स्वतःची पहावी विद्वत्ता । विचार करावा भावार्था । आपोआप उमजेल ।। २० ।। वेदांतशास्त्र म्हणजे काय । परमात्म्याची प्राप्ती होय । हे विसरोनिया जाय । दंभ व्यर्थ वाढविला ।। २१ ।। तुम्ही अहंकारे करुनि । जयपत्रे आणिली जिंकोनी । परी या जीवाची सोडवणी । कांही न केली जाण पा ।। २२ ।। ऐसा बोध करित । तव रंगोबा आले तेथ । पाहोनि हास्य करी समर्थ । बोलतसे रंगनाथ ।।२३।। कृपा उपजली मनी । पाहुनिया अज्ञान खाणी । प्रेमे वदतसे मधुर वचनी । रंगोबासी तेधवा ।। २४ ।। वारे सखया रंगोबा ।

जयपत्र मागती बुवा । वाद करुनि बरवा । यासी आता उद्धरावे ।। २५ ।। ऐकूनी समर्थाची वाणी । हास्य करी रंगमुनी । स्वामीचा भावार्थ जाणोनि । काय करिते जाहले ।। २६ ।। तव एक अंत्यज तया स्थानी । स्नाना लागी आला धावोनि । प्रेमे तयासी अवलोकुनि । काय वदतसे ।। २७ ।। कृष्णा वाहे परिपूर्ण । स्नान करी अंत्यज जाण । तयासी जवळ बोलावून । स्वामी प्रेमे बोलतसे ।। २८ ।। कृपादृष्टी अवलोकून । म्हणे चर्चा करावया सर्व जाण । शास्त्रार्थ करी विवरण । या ब्राह्मणासवे ।। २९ ।। तव जाहले प्रश्नोत्तर । तीन दिवस अहोरात्र । चर्चा होता सत्वर । हरला तो ब्राह्मण ।। ३० ।। शास्त्र सांख्य वेदांत । उपनिषदाचे ज्ञान अगाध । चर्चा केली अत्यद्‌भुत । तया ब्राह्मणासवे ।। ३१ ।। उत्तर न सुचे ब्राह्मणा । दिग्मूढ झाला तो जाणा । कांही न सुचे उपाय जाणा । हरुनिया गेला असे ।। ३२ ।। निस्तेज जाहला ब्राह्मण । स्वामीसी घाली लोटांगण । अपराधी मी पापी पूर्ण । आता उद्धार करावा ।। ३३ ।। पतिताचे मुखी वाद । तुम्ही करविला संवाद । अधिकार तुमचा अगाध । श्रीगुरुमूर्ती ।। ३४ ।। माझा करा उद्धार । मी पापी अति



दुर्धर । अपमान अपार घडला असे । मम हाते ।। ३५ ।। पावन करा स्वामीराया । अनन्य भावे लागे पाया । कृपा करा रंगराया । तया द्विजा उठविले ।। ३६ ।। देखोनि तयाचा भाव । कृपा उपजली तव । ब्राह्मण उद्धारास्तव । कृपादृष्टी अवलोकिती ।। ३७ ।। मस्तकी हस्त ठेवुन । निवविले तया जाण । तयासी वर देऊन । आत्मरुपी मिळविले ।। ३८ ।। तयासी वर दिधला । इतक्यात महार पातला । कृपा करी दयाळा । म्हणोनि विनवीतसे ।। ३९ ।। समर्थे तया उपदेशून । मुक्त केले तया लागुन । सांप्रदायांत गुरु परिपूर्ण । अंत्यज जातीचा ।। ४० ।। तया दिवसापासून । महार गोसावी जाण । स्वरुप सांप्रदायी पूर्ण । श्रीसमर्थे केला असे ।। ४१ ।। ब्राह्मणासी दिधला वर । दास नवमीस तू सपरिवार । एवोनि उत्साह थोर । प्रतिवर्षी करावा ।। ४२ ।। तू आलिया जाणा । निघेन मी प्रदक्षिणा । श्रीरामासी भेटणे । हेचि वरदान तुज दिधले ।। ४३ ।। अद्यापि त्यांचे वंशज । प्रतिवर्षी येती उत्सवास । मूर्ती घालिती पालखीत । प्रदक्षिणेसी ।। ४४ ।। त्याचा मान अद्याप चालत । धन्य धन्य गुरु भक्त । त्याचे वंशी वरदहस्त । श्रीसमर्थे

ठेविला ॥ ४५ ॥ स्वस्ति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । रामदास कथा अद्‌भुत । सहजरंगकृष्णदास कृत । षष्ठविंशती अध्याय गोड हा ॥ ४६ ॥

॥ श्रीसद्‌गुरु निजानंद रंगनाथस्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्‌गुरु नाथार्पणमस्तु ॥

॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ षष्ठविंशती अध्यायः समाप्तः ॥



# ॥ अध्याय २७ वा ॥

॥ ॐनमो भगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीरंगमूर्तयेनमः ॥

॥ जयजयाजी पांडुरंगा । विश्वोद्धारका अनंता । चैतन्य स्वरुपी सत्संगा । श्री गुरुराया तू ॥ १ ॥ सद्‌गुरु राया तू ब्रह्म । ऐक्यस्वरुपी दाविसी खंब्रह्म । मायोपाधी निरसूनी शुद्धब्रह्म । चराचरा दाविसी ॥ २ ॥ तव कृपा अतिश्रेष्ठ । सहज पावलो वैकुंठ । भक्तिज्ञाने पुष्ठ । तव कृपे गुरुराया ॥ ३ ॥ गुरुस्मरण करता । हरे भवभय व्यथा । दूर करी सर्व चिंता । मोक्ष मार्गची पै ॥ ४ ॥

यज्ञ नारायण स्वरुपा । अद्वय समिधाची घृता । स्वाहा स्वधा निजरुपा । तुझा तूंची करिसी ।। ५ ।। जय जय श्रीविजया । अरुपा रुपा प्रकाशया । दयार्णवा करुणालया । श्रीरंगमूर्ते ।। ६ ।। तुझे कृपाबळे समस्त । सहवीस अध्यायपर्यंत । कथिला सविस्तर ग्रंथ । तव अगाधलीला ।। ७ ।। आता कळस अध्याय जाण । श्रीगुरु सांगती एक वचन । एकात्मता दृढ करून । कथार्थ चालिला ।। ८ ।। श्रीसमर्थ रामदास । सज्जनगडी रहिवास । आनंदमूर्ती ब्रह्मनाळ क्षेत्रास । राहतसे ।। ९ ।। केशवस्वामी भागानगरी । निरंतर रहिवास करी । वटग्रामी निर्धारी । जयराम स्वामी राहिलें ।।१०।। त्यापरी रंगनाथ । निर्गुण पुरी रहात । योगवासिष्ठ ग्रंथ । समाप्त केला ।। ११ ।। शके सोळाशे सहास । रक्ताक्षी नामसंवत्सरास । मार्गशीर्ष वद्य दशमीस । प्रातःकाल रविवार ।।१२।। सद्गुरु स्मरण करून । निजरंगरंगले पूर्ण । अक्षय वस्ती जाण । समाधिस्थ जाहले ।। १३ ।। बंधू विठ्ठल तयाचे । स्वप्नी जाणविले साचे । मम अवसान देहाचे । पतन पावले ।। १४ ।। तरी तूं येई वेगे । मम अनुजा लगबगे । येवोनिया सन्मार्गे । जगा लावी ।। १५ ।। प्रातःकाली उठोन । गजबजले बंधूमन । म्हणे



रंगनाथ माझा पूर्ण । मज टाकोनि गेला हो ।। १६ ।। विजापूरी बादशहासी । बोलावुनि तयासी । आम्हा लागी जाणे त्वरेसी । निर्गुणपुरासी सत्वरी ।।१७।। तुमचे काम दिवाणगिरी । सांभाळावी निर्धारी । स्वामी आज्ञा झडकरी । असे जाणे आम्हाते ।। १८ ।। ऐसे सांगोनिया तयासी । निघाले अति त्वरेसी । निर्गुणपूर नगरासी । लाग वेगे पातले ।। १९ ।। स्वामी कारणे विलाप । करुनि आले चित्ते समीप । प्रेम भावे पूर्वक । स्तवन करिती स्वामीचे ।। २० ।।

## ।। पद ।।

।। येई येई वो श्रीरंगे । माझे आंतर रंगे ।।

।। करुणा कल्लोळे । निजसखये । निष्ठूर झालीस माय ।। धृ. ।।

।। रविशशीविण जैसी–दिनरजनी । शोभा न पवे माय ।।

।। वाचुनी धन बिंदु–क्षीर सिंधू । टाकुनि चातक जाय ।।

।। मीना जल नाही–तरी पाही । दधी मधु सेविल काय ।।

।। तैसे तुजविण हो – निजसखये । उपायते अपाय ।। १ ।।

॥ कंठी कृष्ण मणी–न विराजे । कुंकुम न वसे भाळी ॥
॥ यांविण वधू सर्व शृंगारास । लेऊनि काय जाळी ॥
॥ मंगलदायक ते–अति हरुषे । मिरवे जैसी बाळी ॥
॥ तैसे तुजविण हो या जगी कां;विधीनें । लिहिलेसे कपाळी ॥ २ ॥

ऐसी करुणा भाकिता । प्रसन्नरुपे तत्वता । ध्वनी उमटे अवचिता । येई येई वो ॥२१॥

॥ पद ॥

॥ करुणा परिसोनि चित्‌गगनी । बोले मंजुळ शब्द ॥
॥ सखया सावध रे सावध रे । कां करिसी हा खेद ॥
॥ सत्ता एक जगी विलसतसे । तुजमज कैसा भेद ॥
॥ वियोग भंगला – रंगला । अवघा निजानंद ॥
॥ विचरे सहसुखे चित् भुवनी । जीवन जैसे जीवनी ॥ ३ ॥

ऐसी ध्वनी उमटता । आनंद झाला विठ्ठल चित्ता । स्मरोनिया सद्‌गुरुनाथा । जयजयकार करीतसे ॥ २२ ॥ चित्ता भरता जाण । प्रसाद दिधला तया



निज स्वरुप दाऊन । समाधिस्थ जाहले ॥ २२ ॥ निर्गुणपुरी आनंद । समाधि तेथे प्रसिद्ध । श्रीरंगनाथ अगाध । निरंतर राहताती ॥ २३ ॥ ऐसे पंचायतन । अवतार पुरुष भगवान । अवतरोनि नारायण । स्वधर्म स्थापिला ॥ २४ ॥ शिवाजी नृपवर । महेशाचा अवतार । अवतरोनि हरि हर । जड जीव उद्धरिले ॥ २५ ॥ स्वामीचा घोडा मनोहर । तीन दिवस निराहार । अन्नोदक ने घे साचार । स्वामी वियोगे ॥ २६ ॥ विठ्ठल स्वामी येऊन । अश्वास करिती नमन । प्रेमकरे कुरवाळून । प्रार्थना करिती तयासी ॥ २७ ॥ म्हणे दयाळा खगपाळा । उदक सेवी दयाळा । वदोनि नेती कृष्णेला । स्नाना कारणे ॥२८॥ तव आश्चर्य वर्तले जाण । घोडा निघे तेथून । समाधीस प्रदक्षिणा करुन । कृष्णा तटी पातला ॥ २९ ॥ तया विठ्ठलस्वामी म्हणती । हय न मानु तुम्हाप्रती । तुम्ही प्रत्यक्ष रंगमूर्ती । आम्हावरी कृपा करिजे ॥ ४० ॥ म्हणोनि घालती नमस्कार । चलावे ग्रामासी सत्वर । रक्षू तुम्हा निरंतर । रंगमूर्ती म्हणोनिया ॥ ३१ ॥ तुम्हा पृष्टी अखंडीत । रंग बैसे आनंदात । समाधी समीप नगरात । अखंड असावे ॥ ३२ ॥ ऐसी प्रार्थना करिता जाण । मान

हलविली अश्वाने । त्रयोदशीस माध्यान्ही । उडी टाकिली कृष्णेत ॥ ३३ ॥ कृष्णेत जाहला गुप्त । सर्वजण आश्चर्य करित । धन्य गुरु श्रीरंगनाथ । महिमा त्याचा कळेना ॥ ३४ ॥ विठ्ठलस्वामी गुरुभक्त । आनंद सांप्रदाय चालवीत । गुरुलीला भगवद्भक्त । लीलावर्णन वर्णिली ॥ ३५ ॥ आनंद सांप्रदाय मूळ जाण । परमात्मा आदिनारायण । त्यानी बोधिला चतुरानन । तेथुनी चालली परंपरा ॥ ३६ ॥ वसिष्ठापासोनि साचार । अत्रीसी कथिले ज्ञानसार । तया विस्तार । दत्तात्रेय अवतरले ॥ ३७ ॥ दत्त शिष्य सदानंद । रामानंद यती प्रसिद्ध । अमलानंद अगाध । तयाने ज्ञान साधिले ॥ ३८ ॥ तेथूनी गंभीरानंद यति । ब्रम्हानंदा ज्ञान कथिती । सहजानंद महायती । कल्याणी वस्ती तयाची ॥ ३९ ॥ तयापासोनि पूर्णानंद । महाज्ञानी अगाध । तयापासोनि निजानंद । निज स्वरुपी रंगला ॥ ४० ॥ निजानंदापासून । श्रीरंगनाथ अवतार जाण । अवतरले श्रीभगवान । पूर्ण ज्ञानी योगीराज ॥ ४१ ॥ रंगमूर्ती कृपापूर्ण । विठ्ठलस्वामी कारण । तेथुनि विस्तार गहन । तया विठ्ठलाचा ॥ ४२ ॥ विठ्ठल वंशी जाण । अवतरले केशव आपण । तयानी ब्रह्मज्ञान । कथिले





कृष्णासी ॥ ४३ ॥ शके अठराशे अठ्ठावन । धातृष्ट संवत्सर जाण । मार्गशीर्ष गुरुवार जाण । ग्रंथ समाप्त जाहला ॥ ४४ ॥ कर्ता करविता ग्रंथ । एक जाणे रंगनाथ । जनार्दन रुपे व्यक्त । तव कृपे जाहला असे ॥ ४५ ॥ एकनाथ नामे पिता । भागिर्थी नामे माता । तयाचा सूत कृष्णनाथ । सद्गुरुनाथ दयाळू हा ॥ ४६ ॥ ग्रंथ लिहिणे मनांत । जाणूनि आज्ञा करीत । विस्तार करावा बहुत । इथे ग्रंथाचा ॥ ४७ ॥ नाही शास्त्र अभ्यास । नेणे व्याकरण शुद्धास । श्रीगुरुकृपा विशेष । तये ग्रंथ वदविला ॥ ४८ ॥ श्रीगुरु कृष्णराज समर्थ । कृपावलोकने वदवी ग्रंथ । समर्थ रंगराज सिद्ध । ग्रंथ समाप्त तये केला ॥४९॥ तेर ढोकीं गावा नाम । गार्ग्य गोत्री शाखा माध्यान्ह । लक्ष्मण पिता गीता माता जाण । तयाचा सूत दास शंकर ॥ ५० ॥ श्रीगुरुने आज्ञापिले । श्रीगुरु कृपे कार्य जाहले । कर्ता करविता श्रीगुरु भले । तया चरणी वंदन असो ॥ ५१ ॥ नमन श्रोतिया सज्जनी । शुद्धाशुद्ध या जाणे । क्षमा करावी संत सज्जनी । म्हणोनिया विनवीत ॥ ५२ ॥ समर्थ रंगराज पूर्ण । तया चरणी अर्पण । सद्भावे घालोनि लोटांगण । ग्रंथ जाण संपविला ॥ ५३ ॥ स्वस्ति

श्रीरंगलीलामृतग्रंथ । श्रवणे पातक दग्ध होत । सहजरंग कृष्णदास कृत । द्विसप्तमोध्याय गोड हा ॥ ५४ ॥

॥ श्रीनिजरंगार्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्गुरु निजानंद रंगनाथस्वामीर्पणमस्तु ॥

॥ श्रीसद्गुरुनाथार्पणमस्तु ॥

॥ इतिश्रीरंगलीलामृत ग्रंथ द्विसप्तमोध्यायः समाप्तः ॥



# ॥ अध्याय २८ वा ॥

॥ ॐ नमोभगवते वासुदेवाय ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥

॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णो गुरुर्देवो महेश्वरः गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवेनमः ॥

॥ गुरु माऊली ज्ञान प्रकाशे सुरस । या ग्रंथाचे अध्याय संपविले सत्तावीस । आणखी वाटतसे उल्हास । चरित्र गुरुचे वर्णावया ॥ १ ॥ परी माझी मती झाली गुंग । चरित्र गुरुचे किती वर्णू अव्यंग । हृदय भरुन गेले निःसंग । मन झाले सद्गद ॥ २ ॥ आता इच्छा हीच मानसी । ग्रंथाचे

सांगावे अवतरणिकेसी । जेणे समाधान होय चित्तासी । श्रवणे ग्रंथाची जागृती होय ।। ३ ।। प्रथमाध्यायी मंगलाचरण । मुख्य देवतांचे स्तवन । सद्गुरुसी ग्रंथ रिघूसी अळवून । प्रथमोध्याय संपविला ।। ४ ।। द्वितीयोध्यायी दत्तात्रय मूर्ती । काशी क्षेत्री अवतार घेसी । नामे सदानंद निश्चिती । शिष्य रामानंद वशिष्ठ पैं ।। ५ ।। कल्याणनगरामाझारी । निबिड गहन स्थळी ते अवसरी । अेकांत स्थळीं निर्धारी । गुहा करुनि राहिले ।। ६ ।। तृतियोध्यायी रामानंद । येऊनि भेटती सदानंद । उठवूनी प्रेत करिती आनंद । राजपुत्राचे तेधवा ।।७।। चतुर्थोध्यायी राजसुत । अज्ञान होता मठ बांधत । परी ते सवेचि गुप्त होत । तीन वेळा परियेसा ।। ८ ।। आज्ञा घेऊनि गुरुची । मठ बांधी त्वरेची । विनंती करी सवेची । अवलोकना कारणे ।। ९ ।। पंचमी रामानंद । गुरुचा ऐकुनि बोध । मठी स्थापुनी अमलानंद । आपण गेले काशीसी ।। १० ।। अमलानंद विख्यात । शिष्य परिवार त्यासी बहुत । सहजानंदासी स्थापुनी येथ । आपण समाधिस्थ ।। ११ ।। सहजानंदानी केले कौतुक अमुप । विधवा स्त्रीस दिधले पुरुषरुप नाम देऊनि पुर्णानंदस्वरुप । स्थापिले मठासी ।। १२ ।। शेष्टी पुर्णानंद



नाझरेसी येत । बापूजी व त्याचे स्त्रीसी अनुग्रहित । तीन पुत्राचा वर देत । एक पुत्र घेती भिक्षेसी ।। १३ ।। सप्तमी पुत्राचे लग्न करु पाहती । श्रीरंग त्याना भाक स्मृती देती । आपण कल्याणनगरी जाती । गुरुचे दर्शना कारणे ।। १४ ।। माता करी चिंता बहुत । तुळसीची सेवा करीत । त्यासी पूर्णानंद स्वामी सांगत । पुत्र तुझा भेटेल पैं ।। १५ ।। अष्टमी श्रीरंगनाथ । योग साधने जाती ब्रद्रिकाश्रमांत । श्रीहरी त्याना व्याघ्ररुपे भेटत । मस्तकी हस्त ठेवितसे ।। १६ ।। श्रीहरी आज्ञे रंगराणा । निघाले आपल्या स्थाना । हरी राजाचे नगरा जाणा । पावते झाले तत्काळ ।। १७ ।। राजाने सत्कार करुन । नीलवर्ण घोडा दिधला जाण । तयावरी आरोढून । पंढरपुरासी पातले ।।१८।। पंढरीसी आले रंगनाथ । कीर्तन करिती राऊळात । तेथे अकस्मात मातापिता भेट होत । जाते झाले स्वगृहा ।। १९ ।। नवमाध्यायी बयाबाई माता जाण । वृद्धापकाले झाली पतन । बापूजीस वियोग सहन न होऊन । उदासीन झाले तेधवा ।। २० ।। श्रीरंगरायमुर्ती । बापूजीस कल्याणास आणिती । पूर्णानंद दीक्षा देती । संन्यास मार्गाची ।। निजानंद नाम ठेविती । पूर्णानंद रंगरायासी

म्हणती । आज सुदिन सुमुहुर्ती । उपदेश घेई निजानंदाचा ।। २२ ।। गुरु आज्ञा मानून प्रमाण । उपदेश घेतला रंगराये जाण । तेथून उभयता करिती प्रयाण । कृष्णा पश्चिम तीरासी समाधिस्थ झाले निजानंद ।। २३ ।। तेथुनि रंगराय नाझरे येती । रामदासासी भेटती । निर्गुणपुरीस येऊनि मठ स्थापिती । शिवरायाचे साह्याने ।। २४ ।। दशमाध्यायी शिवाजी नृपती । रंगरायाचे भ्रष्टाचाराचा संशय घेती । त्यासी निरसुनी निश्चिती । दाविती कौतुक अभिनव ।। २५ ।। एकादश अध्यायी कथन । मोरया स्वामीस अहंकार वाढला जाण । त्यासी अद्भुत चमत्कार दाखवून । अहंकार त्याचा गाळिला ।। २७ ।। द्वादश अध्यायी कथा । मोरया स्वामीस अहंकार वाढला जाण । हयमृत होता जाण । जयरामस्वामी उठविती कौतुके ।। २७ ।। त्रयोदशी रहिमतपुरची कथा सुरस । देशलेखकाचे स्त्रीस होता सर्पदंश । त्याते करिती निर्विष । सावध करिती तत्काळ ।। २८ ।। दांपत्य म्हणती मागा इच्छित जाण । श्रीरंगमागती पुत्र निधान । तये हर्षोनि देता जाण । नांव ठेविती जनार्दन ।। २९ ।। चतुर्दश प्रसंगात । रामदास, रंगनाथ यात्रेसी निघत । समागमे शिष्य परिवार बहुत ।



कमी करावे इच्छिती ।। ३० ।। यवनाचे रुप घेऊन । दत्तात्रये केलें अतिगहन । सर्व शिष्य गेले पळोन । सद्भक्त दोन राहिलें ।। ३१ ।। पंचदश प्रसंगात । रंगराय सातार्‍यासी कीर्तन करित । तो अकस्मात होत समाधिस्थ नृप कारण पुसतसे ।। ३२ ।। स्वामी सांगती नृपासी । वैश्य जहाज बुडत ते समयासी । त्यास जाऊनि वेगेसी । समुद्रातून काढले ।। ३३ ।। तोच वैश्य येऊन । स्तवन करी स्वामी लागुन चतुर्थांश द्रव्य देऊन । स्वामी चरणी लागतसे ।। ३४ ।। शोडष अध्यायी कथा सुरस । स्वामीस पंढरपुरी कीर्तनास । उशीर होता म्हणती रामदास । खंडोबा प्रवचन तूं करी ।। ३५ ।। स्वामीचे वचन ऐकोन । खंडोबा लाजला मनीं जाण । मी असे बुद्धिहीन । प्रवचन काय करूं ।। ३६ ।। खंडोबा होऊनि खिन्न । रंगस्वामी पाशी आला जाण । म्हणे मीं भीमेत देतो प्राण । रामदासानी मजला लाजविले ।। ३७ ।। खंडोबाची मात ऐकिली । स्वामीस दया आली । जिव्हाग्री श्री लिहली । खंडोबाचे तेधवा ।। ३८ ।। खंडोबा आला राऊळात । कीर्तनासी उभा ठाकत । कीर्तनी गुंगले सर्वश्रोत । नवल बहु वर्तलेसे ।। ३९ ।। तोच खंडोबा स्वामीचा किंकर । पुढे झाला

ग्रंथकार । नावाने स्वामी श्रीधर । बहुत ग्रंथ रचियेले ।। ४० ।। सप्तदश अध्यायी कथासुरस । स्वामी निघती भागीर्थीस । वाटेत राहुनि देहूस । भेटती तुकारामा ।। ४१ ।। बोहगावी म्हशीचे पारडू जाण । वाघाने टाकले खाऊन । भक्त संकटी पडला म्हणोन । म्हशीचे दूध काढविले ।। ४२ ।। भागीर्थीस जाऊन । विश्वनाथास केले वंदन । तुकारामाची पत्रिका नेऊन । भागीर्थीस दिधली ।। ४३ ।। प्रतिउत्तर दिधले भागिर्थी । ते आणूनी दिधले तुकारामा प्रती । यात्रा करुनि पूर्ती । स्वस्थानी पातले ।। ४४ ।। अष्टदश अध्यायी निरुपण । स्वामी निघती वेरुळा लागून । घृष्णेश्वर दर्शन घेऊन । राजपुरीस पातले ।। ४५ ।। राजपुरीत करिती कीर्तन । राजा कीर्तनी झाला तन्मय जाण । म्हणे दाखवा आनंदघन । म्हणुनी आडविले स्वामीया ।। ४६ ।। रामदासे तये वेळा । स्वप्नी जाऊनी राजाला । अंतर्यामी बोध केला । त्याने क्षमा मागीतली ।। ४७ ।। एकोनवीस अध्यायी घडले नवल परी । रंगराय समर्थ भेटले कृष्णेवरी । कृष्णाभरुनि चालली अनिवारी । मार्ग तत्काळी बंद झाला ।। ४८ ।। समर्थे केला चमत्कार । आसन टाकले जळावर । कृष्णेच्या



पैलपार । जाते झाले तेधवां ।। ४९ ।। रंगराये तये अवसरी । अश्व घातला जळावरी खूर न भिजे तरी । पैलतीरा गेले जाणा ।। ५० ।। आणिक एक नवल घडले जाण । रंगराये घारीस मारिला बाण । ती पावली पतन । सन्मुख पडली समर्थांच्या ।। ५१ ।। समर्थ रायासी म्हणत । कर्म केले अनुचित । यासी घ्या प्रायश्चित । ब्राह्मण बोलाविले त्या कारणे ।। ५२ ।। रंगराय ब्राह्मणासी म्हणत । जरी प्रायश्चित्ते घार होय जिवंत । अैसे प्रायश्चितात असे सामर्थ्य । तरी प्रायश्चित घेतो ।। ५३ ।। ब्राह्मण म्हणती तये वेळी । घार जिवंत न होय कदाकाळी । मग रंगराये तत्काळी । हात फिरविला घारीवर ।। ५४ ।। घार झाली जिवंत । उडून गेली आकाशात । सर्व लोक जयजयकार करित । महा आनंद प्रवर्तला ।।५५।। विसाध्यायी कथासुरस । स्वामी जाती भागानगरास । तेथे केशवस्वामी आळवीत । कीर्तन करावया तेधवा ।।५६।। अवश्य म्हणूनी रंगनाथ । राधाविलास कथा लावित । तव तेथील राजा अवचित । पातला असे कीर्तना ।। ५७ ।। रंगराधाविलास अैकून । राजा गेला आनंदून । म्हणे

या परी कृती नयनी देखू जाण । तरीच मानू सत्य हे ॥ ५८ ॥ नातरी व्यर्थ अबंड । त्या विषयी करु दंड । ऐसी ऐकुनी मात बंड । सर्व श्रोते चिंतावले ॥५९॥ तव दत्तकृपे तये अवसरी । चित्रित बाहुल्या विलास करिती परोपरी । पाहुनी राजा हर्षनिर्भरी । क्षमा मागी राया ते ॥ ६० ॥ एकविशंती अध्यायी कथा जाण । स्वामी जाती पंढरीसी चातुर्मासा कारण । तव तेथील आनंदीबाई जाण । स्वामीस भोजना सांगतसे ॥ ६१ ॥ बाई भिक्षुक असे जाण । एका पुरते शिजवी अन्न । स्वामीस म्हणे एकटे आपण । यावे भोजनासी तेधवा ॥ ६२ ॥ दोन प्रहर समयासी । पाक केला त्वरेसी । बोलावुनी रंगमुर्तीसी । आसन घातले भोजना ॥ ६३ ॥ रंगराय बसले भोजना । तव तेथे आले सर्व पंचायतना । म्हणती वाढावे भोजना । आज आहे द्वादशी ॥ ६४ ॥ तेथे वर्तले नवल परी । बाईने केल्या तीन भाकरी । ते वाढता नेऊन करी । पुन्हा तीन भाकरी शिल्लक ॥ ६५ ॥ द्वाविशंती अध्यायी कथा जाणा । स्वामी तत्व ज्ञान बोधती जनार्दना । जनार्दन नित्य पाणी आणी स्नाना । भागिर्थीचे नेमेसी ॥६६॥



समर्थ त्याचे परीक्षण । करु म्हणती ते क्षण । म्हणती जनार्दना सज्जना । काशी द्रव्य पोहचवून रसीद आणावी ॥ ६७ ॥ जनार्दने काय केले । दोन प्रहर न होता ते वेळे । भागीर्थीचे स्नानासी पाणी आणिले । रसीद दिधली समर्थांसी ॥ ६८ ॥ त्रिविंशती अध्यायी कथा जाण । बादशहा बोलावी जयरामा लागुन । खराटचाचे मिषे करून । परोपकाराचे महात्म बिंबविले ॥ ६९ ॥ चतुर्विशंती अध्यायी निरुपण । जयरामस्वामीस म्हणती ब्राह्मण । शंकराचार्यांनी पाचारिले जाण । सत्वर तेथे चलावे ॥ ७० ॥ जयराम म्हणती ब्राह्मणासी । जाऊनि सांगा आचार्यासी । बोलाविता कासयासी । सेवा सोडून येणे नाही ॥ ७१ ॥ जाऊनि ब्राह्मण तये वेळे । आचार्यासी कथिते झाले । आपली आज्ञा गुरुभक्ती बळे । तुच्छ मानी जयराम ॥ ७२ ॥ आचार्य म्हणती ब्राह्मणासी । जयरामा आणा शीघ्रेसी । ब्राह्मण येऊन म्हणती त्यासी । यावे की यज्ञोपवीत द्यावे ॥ ७३ ॥ जयरामाने सत्वर । काढून दिधले शिखासूत्र । ब्राह्मणे आणून सत्वर । आचार्यासी दिधले ॥ ७४ ॥ पुढे काय वर्तले नवल

जाण । ब्राह्मण करिती स्नान । तव शिखासूत्र जाण । गुप्त झाले सर्वांचे ।। ७५ ।। ब्राह्मण बहु चिंतावले । आचार्यासह येते झाले । जयराम म्हणती तये वेळे । तीर्थी स्नान करिता मिळेल ।। ७६ ।। स्नान करिता तये वेळे । सर्वत्रासी शिखासूत्र आले । ब्राह्मण बहु आनंदले । म्हणती धन्य गुरुभक्त जयराम ।। ७७ ।। पंचविंशती अध्यायी कथा अघटित । समर्थ जाती दिल्लीत । राहती जाऊनी मशिदीत । ध्यानस्थ बसताती ।। ७८ ।। बादशहास वर्तमान समजले । येरु म्हणे बरे झाले । अनयासे सापडले । भ्रष्ट करूं यासी ।। ७९ ।। करुनिया मांसमिश्रित अन्नासी । सामोरे धाडिले दिवानासी । पालखी धाडिली समर्थांसी । आणावया कारणें ।। ८० ।। समर्थांनी केला चमत्कार । मशिदीस म्हणती चल लवकर । मशीद चालली सत्वर । राजद्वारा उभी राहिली ।।८१।। भोजनास मांसमिश्रित अन्न आणत । तव ते सर्व पुष्पे होत । बादशहा पाहुनि विस्मित । म्हणे अवतारी पुरुष ।। ८२ ।। शट्विंशती अध्यायी कथन । कनेरखेडचा अहंकारी ब्राह्मण । समर्था पुढे करी समर्थन । म्हणे मी



वेदांती ।। ८३ ।। समर्थ म्हणती बा रंगनाथ । ब्राह्मणाचा पुरवी अर्त । रंगनाथे पाचारुनि अंत्यज त्वरित । वादविवाद करविला ।। ८४ ।। उत्तर न सुचे ब्राह्मणा । हरुनि गेला जाणा । स्वामीस घाली लोटांगणा । म्हणे मी अपराधी समर्था ।। ८५ ।। अंत्यजावरी कृपा करून । समर्थे उपदेश केला जाण । म्हणती तूं गुरु पूर्ण । अंत्यज जातीचा ।। ८६ ।। सप्तविंशती अध्यायी कथा सुरस । रंगस्वामी झाले समाधिस्थ निगडीस । शके सोळाशे सहा । रक्ताक्षी नाम संवत्सरे ।। ८७ ।। ही अवतरणिका माला वाचून । श्रोत्यास होईल कथेचे स्मरण । इतरा इच्छा होईल मनी । ग्रंथ श्रवण करण्याची ।। ८८ ।। अवतरणिकामाला वदवून । श्रीगुरुने केले पावन । ग्रंथ केला संपूर्ण । श्रीगुरु प्रसादे ।। ८९ ।। हा ग्रंथ जों नेमेसी । श्रवण पठण करी भावेसी । त्याचे घरी अहर्निशी । श्रीरंगस्वामी वसतील ।। ९० ।। त्यासी नाही यमाचे भय । सदा सर्वदा लाभ होय । अंती सद्गतीस जाय । पुस्तक लिहिता सर्व सिद्धी ।।९१।। पुत्रपौत्रादी धन गोधन । ग्रंथवाचने होतील जाण । जरा व्याधी न पिडिती

त्यालागुन । लक्ष्मी वसे अखंड ॥ ९२ ॥ श्रीदत्तगुरुचे करुनी स्मरण । दास माधव घाली लोटांगण । मम हृदयी वसनेसी अळवुन । अवतरणिका संपविली ॥९३॥ इति श्रीरंगलीलामृत ग्रंथ । संत पंचायतन सार अमृत । सदा परिसोत प्रेमळ भक्त । अष्टाविंशति अध्याय गोड हा ॥ ९४ ॥

॥ श्री दत्तात्रयार्पणमस्तु ॥

॥ श्री कृष्णार्पणमस्तु ॥

॥ समाप्त: ॥